

संध्या पेडणेकर

# सुज्ञकथा

# सुज्ञकथा

संध्या पेडणेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सुज्ञकथा (Sudnyakatha)

संध्या पेडणेकर

sandhyaship@gmail.com

Arambh26112.blogspot.in

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : १२ सप्टेंबर २०१४

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# अनुक्रम

प्रस्तावना

1. विसोबा खेचर
2. भीती कुणाची?
3. स्वतःपासून सुरवात
4. वैराग्यातील उणीव
5. जुगाराचा अड्डा आणि स्मशान
6. जाळं आपलं न् शिकारही स्वतःचीच
7. जैशी व्यक्ती तैशी सजा!
8. कबीराचे गुरु
9. भाग्याची हाक ओळखा
10. संवेदनशीलता हवीच
11. श्रद्धा आणि तर्क
12. रिकामे हात
13. तत्वमसि श्वेतकेतु
14. जीवनाचे गणित
15. काल्पनिक बंधनात अडकलेले मन
16. साचलेलं ज्ञान म्हणजे कचरा
17. या शरीराची किंमत काय?
18. पराजित नेपोलियन
19. दान काय देणार?
20. चाणाक्ष गाढव
21. क्षमा
22. क्षण मुक्तीचा
23. बरी अद्दल घडली
24. परोपकारी लिंकन
25. सोंगाड्या
26. जगाचं कल्याण हाच खरा धर्म
27. मडक्याचा मोह तरी का बाळगा?
28. गुरुमहात्म्य
29. स्वप्न, सत्य आणि न्याय
30. इंद्र-वृत्रासुर युद्ध
31. एकाग्रता
32. राजा भर्तृहरी
33. ब्रह्मज्ञानाची परीक्षा
34. सहानुभूती
35. बिन बुडाचं भांडं
36. छोटीशी चूक
37. इतरांचंही भलं चिंता
38. ईश्वराला ओळखणं कठीण आहे
39. दीर्घायुष्याचं रहस्य
40. डोळे आणि भ्रम
41. मन लावून काम करावं
42. महामूर्ख कोण?
43. चाणक्याने दिलेला तर्क
44. सूडाची आग
45. शाश्वत सुखच खरं
46. शांती
47. अंगुलीमाल
48. मिथ्या अभिमान
49. श्रद्धा आणि तर्क
50. अलेक्झांडर अणि संन्यासी
51. सत्कर्म टाळू नका
52. दोन पैशांचा चमत्कार
53. द्रौपदीला हसू का आलं?
54. बुखारा समरकंदची कुरवंडी केलीच कशी!
55. थोडं आइस्क्रीम.. आत्म्यासाठी!
56. गुरूविना कोण दाखविल वाट...
57. एकनाथांची आस्तिकता
58. कंदिलाची किमया
59. ब्रह्मर्षी विश्वामित्र
60. जीवनसंगीत
61. इप्सितसाध्यासाठी नेमकेपणा हवाच

# एक तरी कथा अनुभवावी

सुज्ञकथांना प्रस्तावना ती काय असणार!

सुज्ञांस अधिक सांगणे न लगे.

ज्ञ आणि सुज्ञ यातला फरक ज्याला कळतो तो सुज्ञ.

ज्ञानाचं प्रदर्शन करता येतं. पण सुज्ञपण सुज्ञालाच जाणवतं.

ऑक्सिजनहूनही अधिक मुबलक उपलब्ध असणारी गोष्ट म्हणजे सल्ला, शहाणपण, उपदेश. पण त्यातलं घ्यायचं काय आणि सोडून काय द्यायचं हे ठरवणारं इंद्रिय म्हणजे सुज्ञपण. अशा सुज्ञांच्या सुज्ञपणाच्या या गोष्टी. सुज्ञ संग्राहिका संध्या पेडणेकर यांनी शब्दबद्ध करून सुज्ञ वाचकांसाठी विनामूल्य दिल्या. म्हणून हे पुस्तक दुर्मिळ आणि संग्राह्य आहे.

ई पुस्तकाचं एक बरं असतं. संग्राह्य असलं तरी वाटता येतं. आणि जितकं वाटाल तितकं ते अधिक जपलं जातं. तेव्हा , जाऊ द्या हे पुस्तक तुमच्या सर्व मित्र, नातेवाईकांपर्यंत. खुश करून टाका सर्वांना. होऊ द्या त्यांचाही थोडा टाईमपास.

जरी वरवर टाईमपास करणारं हे पुस्तक वाटलं, तरी वाचता वाचता काही ना काही शहाणपण झिरपणारच. एक, अगदी एक जरी शहाणपण योग्य वेळी सुचलं तरी त्याची किंमत करता येणार नाही. ज्ञानेश्वरीतील ओव्यांबद्दल जसं म्हणतात की “एक तरी ओवी  अनुभवावी” तसं आम्ही शुभेच्छा देतो, की वाचकांनी यातली एकतरी कथा अनुभवावी.

बाकी...सुज्ञांस...

*आपले नम्र*
*ई साहित्य प्रतिष्ठान*
१२ सप्टेंबर २०१४

# विसोबा खेचर

संत चरित्रांमध्ये विसोबांचे नाव विसोबा खेचर कसे पडले याबद्दल एका घटनेचा उल्लेख येतो.

आळंदीत रहाणाऱ्या दुष्ट विसोबा ब्राह्मणाला ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ताबाईबद्दल नेहमी द्वेष वाटायचा.

एकदा मुक्ताबाईला मांडे खायची इच्छा झाली. मांडे बनविण्यासाठी मातीच्या तव्याची गरज होती. ज्ञानेश्वर तवा आणण्यासाठी कुंभाराकडे निघाले. रस्त्यात त्यांना विसोबा भेटले. ज्ञानेश्वर कुंभाराकडे कशासाठी चालले आहेत हे कळले तेव्हा तेही त्यांच्यासोबत निघाले. त्यांनी कुंभाराला ज्ञानेश्वरांना तवा देऊ दिला नाही. दुःखी मनाने ज्ञानेश्वर घरी परतले. मुक्ताबाईनं विचारलं, 'भांडं कुठाय?' ज्ञानेश्वर तिला म्हणाले, 'तू तयारी कर, माझ्या पाठीवर मांडे भाज.'



तवा न मिळाल्याने घरी परतल्यानंतर होणारी भांडणे पाहाण्यासाठी ज्ञानेश्वरांमागोमाग विसोबासुद्धा येऊन लपून उभे होते. मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांच्या पाठीवर मांडे थापले, भाजले हे पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. हा  चमत्कार पाहून विसोबा आमूलाग्र बदलले. पुढे येत त्यांनी ज्ञानेश्वरांचे पाय धरले आणि माफी मागितली.

तवा न मिळण्यामागे विसोबांचं कारस्थान होतं हे  मुक्ताबाईला समजलं. रागानं ती म्हणाली, 'दूर हो खेचरा! आधी तवा मिळू दिला नाहीस आणि आता मांडे बनू देणार नाहीस का?' ज्ञानेश्वरांनी मुक्ताईला शांत केलं. पण तेव्हापासून विसोबा झाले विसोबा खेचर. आजही त्यांना याच नावानं ओळखलं जातं.

# भीती कुणाची?

एकदा टॉलस्टॉय भल्या पहाटे उठून चर्चमध्ये गेले. आपण दरवेळी जातो तेव्हा देव भक्तांच्या गर्दीत असतो, आज आपण देवाला एकट्याला भेटू असा विचार त्यांनी केला. पण ते जेव्हा चर्चमध्ये पोहोचले तेव्हा तेथे आधीच एक माणूस गुडघे टेकून बसला होता आणि देवाच्या मूर्तीबरोबर काहीतरी बोलत होता. तो बोलत असलेले काही शब्द टॉलस्टॉयच्या कानांवर पडले. तो म्हणत होता, 'देवा मला माफ कर... सांगतानासुद्धा शरमिंधं व्हावं इतकी मी पापे केली आहेत. माफ कर मला...' टॉलस्टॉयला वाटलं, किती महान व्यक्ती आहे ही. अगदी खुल्या दिलाने देवाकडे आपल्या हातून घडलेल्या पापांसाठी क्षमा मागतेय. पश्चातापानं बहुधा पोळून निघालेला दिसतोय.

तेव्हढ्यात त्या व्यक्तीची नज़र या माणसावर पडली. गोंधळून गेल्यासारखा वाटला तो क्षणभर. मग टॉलस्टॉयना म्हणाला, 'महाशय, देवाशी माझा जो संवाद चालला होता तो आपण ऐकला तर नाही?' टॉलस्टॉय म्हणाले, 'हो, मला आपलं बोलणं ऐकू आलं आणि खरं सांगतो, धन्य वाटलं मला अगदी. आपल्या अपराधांची कबूली दिलीत आपण, मला आदर वाटतो आपल्याबद्दल.' तो माणूस म्हणाला, 'ते सगळं ठीक आहे, पण कृपा करून आपण या गोष्टी इतर कुणाला सांगू नका. खरं तर या केवळ माझ्या आणि देवामधल्या गोष्टी. आपण ऐकल्या म्हणता तर ठीक आहे, पण कृपया इतर कुणालाही सांगू नका. आणि सांगितल्या तर गाठ माझ्याशी आहे हे लक्षात ठेवा... '




टॉलस्टॉयनी आश्चर्यानं विचारलं, 'पण आत्ता आपण देवासमोर आपल्या अपराधांबद्दल पश्चाताप व्यक्त करत होतात, आणि आता...'

तो माणूस म्हणाला, 'त्या केवळ माझ्या आणि देवामधल्या गोष्टी होत्या. जगासाठी नव्हत्या त्या.' टॉलस्टॉयना वाटलं, असं आहे तर, म्हणजे लोक इतर लोकांनाच घाबरतात, देवाला नाही!

# स्वतःपासून सुरवात

युद्धाचे दिवस. राजाचे सैनिक सगळीकडे विखुरलेले होते. ते ज्या गावात जात त्या गावातल्या लोकांना इच्छा असो वा नसो त्यांच्या राहाण्या-खाण्याची व्यवस्था करावी लागे. लोकांमध्ये देशभक्तीची उणीव होती असे नव्हे. सैनिकांचे वागणे, त्यांचा क्रूरपणा आणि अकारण नासधूस करण्याची सवय यामुळे लोक त्यांच्यापासून चार हात लांब रहाणेच पसंत करीत असत.

एके दिवशी सैनिकांच्या अधिकाऱ्यानं एका शेतकऱ्याला विचारलं, 'गावात कुणाच्या शेतात पीक चांगलं उभं आहे ते सांग. आता आठवडाभरापर्यंत आमचा येथेच मुक्काम रहाणार आहे. आम्हाला आपल्या खाण्या-पिण्याची आणि घोड्यांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करायचीय.'

शेतकरी पेचात पडला. सांगितले नाही तर सैनिकांच्या तावडीत सापडणार, ते आपल्याला यथेच्छ बुकलणार आणि सांगायचं तर ज्या शेतकऱ्याबद्दल सांगायचं त्याच्या संपूर्ण शेतावर सैनिकांचा नांगर फिरणार. वर्षभर मग त्याच्या घरातले लोक काय खाणार? त्यांच्या इतर गरजा कशा पूर्ण होणार?

चालता चालता त्याने मनाशी एक निर्णय घेतला. गावकऱ्यांच्या शेतांतून ते फिरत होते. सैनिकांनी बऱ्याच शेतांकडे बोट दाखवून तेथील पीक चांगले असल्याचं सांगितलं पण दरवेळी आपल्याला इथली जास्त माहिती असल्याचं सांगत त्या शेतकऱ्यानं त्यांना पुढे नेलं. दरवेळी तो म्हणायचा, 'यापेक्षा चांगलं पीक कुठे उभं आहे ते मला ठाऊक आहे, पुढे चला.' शेवटी सगळे एका शेतापाशी पोहोचले. समोर उभ्या पिकाकडे बोट दाखवून शेतकरी म्हणाला की, या शेतातलं पीक सर्वात चांगलं आहे.

सैनिक अधिकारी भडकला. म्हणाला, 'वेड लागलं का रे तुला? यापेक्षा कैक पटींनी चांगल्या पिकांची शेतं आपण मागे टाकून आलो की. असं का केलंस?'

शेतकरी सैनिकांच्या अधिकाऱ्याला म्हणाला, 'शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाची किंमत तुम्ही देणार नाही हे मला ठाऊक होतं. अशावेळी मी इतर कुणाचं नुकसान कसं करणार? हे पीकच शेतकऱ्यांची वर्षभराची कमाई. यावरच ते आपल्या संसाराचा गाडा रेटतात. त्यांची ही कमाई मी कशी काय हिरावू देणार? आणि मी खोटं बोललो नाहीय. हे माझं शेत आहे. माझ्या दृष्टीनं याच शेतातलं पीक सर्वात जास्त चांगलं आहे.'

शेतकऱ्याचं बोलणं ऐकून सैनिक अधिकारी शरमिंधा झाला. त्याने शेतकऱ्याला त्याच्या पिकाची किंमत तर दिलीच, शिवाय, न घाबरता त्याने जी उत्तरे दिली त्यासाठी त्याला बक्षीसही दिले.

# वैराग्यातील उणीव

पुराणात राजा भर्तृहरींबद्दल एक कथा आहे. त्यांना वैराग्य आलं तेव्हा त्यांनी आपल्या राज्याचा त्याग केला. त्यावेळी पार्वतीने शंकरासमोर त्यांच्या त्यागाची वाखाणणी केली. पण शंकर म्हणाले, 'त्यांच्या त्यागात उणीवा आहेत.' पार्वतीनं विचारलं, 'कोणत्या उणीवा?' शंकर म्हणाले, 'भर्तृहरीनं राज्याचा त्याग भले केला असेल, पण संन्याशाच्या जीवनाची सुरवात करताना त्यांनी काही वस्तू सोबत घेतल्या. राजमहालातून निघताना त्यांनी पाण्याचं भांडं, उशी आणि हवा ढाळण्यासाठी पंखा सोबत घेतला.' यावर पार्वती निरुत्तर झाली.

काही काळानंतर साधनेच्या क्रमात वैराग्याची खोली वाढत गेली हळूहळू या तिन्ही वस्तूंची त्यांना असलेली गरज संपली.

पार्वतीने त्यांच्या वैराग्याबद्दल विचारलं तेव्हाही शंकर म्हणाले, 'अजूनही उणीव आहे.'

पार्वतीनं विचारलं, 'आता कुठली उणीव आहे? वैराग्याबद्दलचे आपले अनुभव लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ते वैराग्यशतक लिहिताहेत, भिक्षा मागणंही त्यांनी सोडून दिलंय. मिळालं तर खातात, नाही मिळालं तर काही खातही नाहीत.  बराच काळपर्यंत खायला काही मिळालं नाही तर पिंडदानासाठी आलेल्या पिठाच्या भाकऱ्या थापून त्या चितेच्या आगीवर भाजून खातात. अजून त्यांच्या वैराग्यात उणीव आहे असं म्हणता तर ती कोणती ते सांगा.'

ही गोष्ट सांगून समजण्यासारखी नाही हे शंकराच्या लक्षात आलं होतं. ते म्हणाले, चला आपण प्रत्यक्षच पाहू. मग दोघेही वेष पालटून भर्तृहरीसमोर आले. शंकरानं वृद्धाचा आणि पार्वतीनं वृद्धेचा वेष घेतला होता. त्यांनी भर्तृहरीकडे भिक्षा मागितली. भर्तृहरींना गेले तीन दिवस भिक्षा मिळाली नव्हती. त्यादिवशी त्यांना थोडं पीठ मिळालं होतं त्याच्या भाकऱ्या ते भाजत होते. त्यांनी या वृद्ध जोडप्याला बसवलं आणि साऱ्या भाकऱ्या त्यांना दिल्या.

यावर त्यांच्या वैराग्याच्या पूर्ततेबद्दल पार्वतीने नजरेनंच शंकराला विचारलं. त्यावर शंकर नजरेनंच उत्तरले, 'नाही'.

वृद्ध दांपत्यामध्ये चाललेली नजरेच्या खुणांची देवघेव भर्तृहरींच्या नजरेतून निसटली नव्हती. त्यांनी कुतूहलानं विचारलं तेव्हा पार्वतीनं केलेल्या पृच्छेबद्दल सांगताना शंकर म्हणाले, 'या विचारताहेत की, यानं सगळया भाकऱ्या आपल्याला दिल्या. आता हा काय खाणार? आपण याला काही भाकऱ्या देऊया.'

ते ऐकलं आणि भर्तृहरींचा अहंकार डिवचला गेला. ते म्हणाले, 'आपण मला ओळखत नाही. एवढ्या मोठ्या साम्राज्याचा मोह बाळगला नाही तर या चार भाकऱ्यांचा मोह मी काय बाळगणार? न्या सगळया भाकऱ्या, आणि अगदी शांत चित्तानं आपली भूक भागवा. यातच माझा संतोष सामावलेला आहे.'



शंकर काही बोलणार त्याआधी पार्वती म्हणाली, 'आलं माझ्या लक्षात. भर्तृहरीनं लौकीक वस्तूंचा त्याग केला पण त्यांच्या मनात अजूनही यशाची आसक्ती आणि अहंकार ठाण मांडून आहेत. भगवन्, बरोबर आहे आपलं, यांच्या वैराग्यात उणीवा आहेत.'

# जुगाराचा अड्डा आणि स्मशान

एकदा चीनचे प्रसिद्ध तत्ववेत्ते कन्फ्यूशियस यांना भेटायला एक माणूस आला. तो त्यांना म्हणाला, 'मला तपस्या करायचीय.' कन्फ्यूशियस त्याला म्हणाले, 'ठीक आहे. पण मला असं वाटतं की ध्यानधारणा शिकण्याआधी तू दोन ठिकाणांना भेट द्यावीस. असं कर, तू जुगाराच्या अड्यावर जा. तेथे लोक काय करतात ते लक्ष देऊन पाहा. स्वतः काहीही करायचं नाही, फक्त पाहायचं. आणि ते पाहून तुला काय वाटलं ते मला सांगायचं.'

दोन महिन्यांनंतर तो माणूस कन्फ्यूशियसना भेटायला आला. म्हणाला, 'लोक वेडे आहेत.'

कन्फ्यूशियस त्याला म्हणाले, 'ठीक आहे, आता मी साधनेचं दुसरं सूत्र तुला देतो. आता पुढचे दोन महिने तू स्मशानात जाऊन बस. तेथे जळणारी मढी पाहा.'

दोन महिन्यांनंतर तो माणूस पुन्हा परतला. म्हणाला, 'आपण माझ्या डोळ्यात झणझणीत अंजन घातलं. माझे डोळे उघडले. हे जीवन एक मोठा जुगार आहे आणि त्याचा शेवट स्मशानात होतो, हे मला समजलं.'



कंन्फ्यूशियस त्याला म्हणाले, 'जीवनाचं रहस्य तू जाणलंस. आता तू ध्यानधारणेच्या अंतर्यात्रेसाठी निघू शकतोस.'

# जाळं आपलं न् शिकारही स्वतःचीच

एकदा एक म्हातारा एका खेडेगावातील रस्त्यावरून हळूहळू चालला होता. त्याचा लांब-ढगळ झगा, शुभ्र पांढऱ्या आणि लांबलचक दाढी-मिश्या, सुरकुत्यांनी भरलेला चेहरा तिथल्या लहान मुलांना गमतीदार वाटला असावा. एक-एक करत चांगला दहा-बारा मुलांचा घोळका म्हाताऱ्याच्या मागे मागे चालू लागला. मुलांमध्ये आणि वानरांमध्ये तसा फारसा फरक नसतो. मुकाट चालतील तर ती मुलं कसली? हळूहळू त्यांचा वात्रटपणा जागा झाला. त्यांनी म्हाताऱ्याला हैराण करायला सुरवात केली. शेवटी जेव्हा ते म्हाताऱ्यावर रस्त्यावरचे खडे उचलून फेकू लागले तेव्हा म्हाताऱ्यानं ठरवलं की खूप झालं.

म्हाताराही बनेल होता. मुलांनी पिच्छा सोडावा म्हणून त्यानं मुलांना एक लोणकढी थाप ठोकली. मागे वळून त्यानं मुलांना जवळ बोलावलं आणि म्हणाला, 'मी कुठे निघालोय ते तुम्हाला ठाऊक आहे का? अरे बाळांनो, आज आपला राजा सगळयांना मेजवानी देतोय. तुम्हाला ठाऊक नाही का? मी असा हळूहळू चालत निघालोय, पोहोचेपर्यंत मेजवानी संपू नये म्हणजे झालं!' मग जिभल्या चाटत म्हाताऱ्यानं मागल्या वेळी राजानं मेजवानीत काय काय पक्वान्नं खाऊ घातली होती त्याचं रसभरीत वर्णन केलं. त्या पक्वान्नांचा सुगंध, तेथील एकूण थाटमाट, मिठाया, सरबतं वगैरेंचं त्यानं केलेलं वर्णन ऐकून मुलांनी त्याचा पिच्छा सोडून तेथून पोबारा केला. म्हाताऱ्यानं सुटकेचा श्वास सोडला आणि तो पुढे निघाला.

वयोमानामुळे तो अगदी हळूहळू चालत होता. थोडं अंतर चालून गेला असेल-नसेल तो गावातली काही मंडळी लगबगीनं राजमहालाच्या दिशेनं चालल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यानं सहज विचारलं तेव्हा गावकऱ्यांनी त्याला सांगितलं की राजा मेजवानी देतोय म्हणून आम्ही सगळे त्या मेजवानीत सामील होण्यासाठी निघालो आहेत.

आणखी थोडं पुढे गेल्यावर त्याला आणखी काही लोक राजमहालाच्या दिशेनं जाताना दिसले. राजा खरोखर मेजवानी तर देत नसेल ना? –असा विचार त्या म्हाताऱ्याच्या मनात आला. आणखी थोडं अंतर चालल्यानंतर त्याला राजमहालाकडे निगालेले आणखी काही लोक भेटले. ते सगळे मेजवानीत सामील होण्यासाठी निघाले आहेत हेही त्याला समजलं.

म्हातारा बावचळला. त्याला वाटलं, खरंच राजा मेजवानी देत असणार. नाहीतर इतके लोक राजवाड्याकडे का बरं गेले असते? आपणही जाऊन पाहावं. बरेच दिवस झाले पक्वान्नं खाऊन. नसेल मेजवानी देत राजा तरी फार फार तर काय होणार? तर, माझी फेरी फुकट जाणार. आपल्याला असं काय मोठं महत्वाचं काम करायचंय सध्या? यावेळच्या मेजवानीचा काय थाटमाट आहे ते तरी पाहू की!

म्हाताऱ्याची पावलं आपसुक राजवाड्याच्या दिशेला वळली.

# जैशी व्यक्ती तैशी सजा!

एका राज्याच्या तीन अधिकाऱ्यांनी राज्यकारभारात मोठा घोटाळा केला. राजानं तिघांनाही बोलावलं.

त्यांच्यापैकी एकाला राजा म्हणाला, 'मला तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती.'

दुसऱ्या व्यक्तीला राजानं एका वर्षाच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

तिसऱ्या व्यक्तीला नगरातून धिंड काढून फटके लगावण्याची आणि वीस वर्षे कारावासाची शिक्षा फर्मावली.

दरबारी गोंधळले. एकाच गुन्ह्यासाठी तीन व्यक्तींना तीन प्रकारची शिक्षा? त्यांनी बिचकत बिचकत राजाला विचारलं, 'एकाच अपराधासाठी तिघांना तीन प्रकारच्या शिक्षा हे न्यायसंगत नाही.'

राजा त्यांना म्हणाला, 'शिक्षा देताना मी- जशी व्यक्ती तशी शिक्षा - हेच तत्व समोर ठेवलं होतं. पहिली व्यक्ती अतिशय सज्जन होती. त्याला मी कोणतीही शिक्षा दिली नाही तरी त्यानं घरी गेल्यानंतर आत्महत्या केली. दुसरी व्यक्ती थोड्या जाड चमडीची होती म्हणून तिला मी एक वर्षाची शिक्षा सुनावली.' एक दरबारी म्हणाला, 'महाराज, तिसऱ्याला मात्र आपण खूपच कठोर शिक्षा दिलीत.'

त्याचं बोलणं ऐकून राजा हसला, म्हणाला, 'कारागृहात जाऊन तुम्ही एकदा त्या व्यक्तीला भेटा. म्हणजे त्याला दिलेल्या शिक्षेचं औचित्य तुमच्या लक्षात येईल.' काही दरबारी मग त्याला भेटण्यासाठी कारागृहात गेले. शिक्षा मिळालेल्या आपल्या पूर्व सहकाऱ्याला ते भेटले. मिळालेल्या शिक्षेचं त्याच्या चेहऱ्यावर अजिबात वैषम्य नव्हतं. नगरातून धिंड काढल्याचं, कोडे खाल्याचं त्याला काहीही वाटलं नसावं, कारण तो तिथेही अगदी मजेत होता. भेटायला आलेल्या दरबाऱ्यांना तो म्हणाला, 'फक्त वीस वर्षांचीच तर बाब आहे! शिवाय मी इतकं कमावून ठेवलंय की माझ्या सात पिढ्यांनी जरी हात-पाय हालवले नाहीत तरी काही एक कमी पडणार नाही. आणि, या कारागृहातही तसा कुणाचा त्रास नाहीच. आरामात आहे मी अगदी. '

दरबाऱ्यांनी विचारलं, 'शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी, सगळयांसमोर तुम्हाला कोडे मारले गेले, सगळीकडे तुमची बदनामी झाली...' त्याला मध्येच अडवत ती व्यक्ती म्हणाली,'बदनामी झाली म्हणून काय झालं? शेवटी मला प्रसिद्धीच मिळाली ना? आज शहरभर माझ्याबद्दलच चर्चा करत असतील लोक!'

राजानं योग्य निवाडा केला होता हे दरबाऱ्यांना पटलं.

# कबीराचे गुरु

कबीरानं गंगेच्या घाटावर स्वामी रामानंदांकडून दीक्षा मिळवल्याबद्दल सांगितलं जातं. सकाळच्या वेळी ज्या वाटेनं स्वामी रामानंद गंगास्नानासाठी जात असत त्या वाटेवर निजून कबीरानं दीक्षा मिळविली होती. चुकून रामानंदांचा पाय कबीराला लागला आणि त्यांच्या तोंडून 'राम, राम' हे शब्द निघाले. अशा प्रकारे,  नकळत कबीराला रामानंदांकडून दीक्षा मिळाली होती.

दीक्षा घेतल्यानंतर कबीराला ज्ञानप्राप्ती झाली. त्यांच्या वाणीत विशेष गोडवा आला. गंगेकाठी ते जेव्हा कीर्तन करत तेव्हा लोक आपसूक त्यांच्या कीर्तनाला येऊन बसत. त्यांच्या कीर्तनाला गर्दी वाढू लागली.

हे पाहून काशीचे पंडित नाराज झाले. त्यांच्यापैकी कित्येकजणांनी वेदाभ्यास केलेला होता, पण त्यांचं कीर्तन ऐकायला कुणीही येत नसे. त्यामुळे कबीरानं केलेल्या कीर्तनाला लोक जमलेले पाहून त्यांना कबीराचा हेवा वाटू लगला.

पंडितांनी मग कबीरांना समजावण्याचा प्रयत्न केला, 'तू गृहस्थ आहेस, मुलं-बाळंही आहेत. शिवाय तुझा कुणी गुरूही नाही. म्हणून तू कथा सांगू नयेस.' कबीर म्हणाले, 'माझे कुणी गुरू नाहीत असं आपलं जे म्हणणं आहे ते चुकीचं आहे. मी ही विद्या गुरूकडूनच शिकलो. गुरूकृपेविना ज्ञानप्राप्ती होणं शक्य तरी आहे का?' कबीराचं म्हणणं ऐकून पंडित मंडळींना आश्चर्य वाटलं. त्यांनी कबीरांना त्यांच्या गुरूचं नाव विचारलं. कबीरांनी सांगितलं की स्वामी रामानंद माझे गुरू आहेत.


पंडित मग स्वामी रामानंदांकडे गेले. स्वामी रामानंदांकडे त्यांनी विचारणा केली की, आपण वैष्णव संप्रदायाचे कट्टर समर्थक आहात. कबीराचा धर्म कोणता हे सुद्धा कुणाला धड ठावूक नाही. त्याला आपण दीक्षा दिलीत हे कसं काय? हे आचरण धर्माविरुद्ध नव्हे काय?

रामानंदांना याबद्दल काहीही माहिती नव्हतं. त्यांनी विचारलं, 'कोण कबीर? त्याला मी दीक्षा दिली? कधी?'

संपूर्ण काशी शहरात मग- 'गुरू खरं बोलतोय की शिष्य खरं बोलतोय?' याबद्दल उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या. वृत्त रामानंदांच्या कानावर आलं आणि ते तापले. त्यांनी कबीराला बोलावलं न् विचारलं, 'तुझे गुरू कोण?'

कबीरानं सांगितलं, 'आपणच माझे गुरू!'

स्वामी रामानंदांनी हे ऐकलं आणि पायीची खडाऊ हातात घेऊन कबीराच्या डोक्यावर हाणली. त्यांना मारता मारता ते बोलू लागले, 'मी तुला दीक्षा दिली का? मला खोटं पाडतोस? राम राम राम!....'



कबीरानं स्वामी रामानंदांच्या पायांवर लोटांगण घातलं. म्हणाला, 'गुरुदेव, गंगेच्या काठी आपण दिलेली दीक्षा जर खोटी तर मग आत्ता आपण देत असलेली दीक्षा तरी खरी आहे ना? आपले हात माझ्या डोक्यावर आशिर्वादांची बरसात करत आहेत. आपल्या मुखातून माझ्यासाठी रामनामाचा मंत्र मला मिळत आहे.' कबीराचं बोलणं ऐकून रामानंदांना संतोष झाला. कबीराला त्यांनी आपला शिष्य मानलं.

# भाग्याची हाक ओळखा

सूफी संत हुजबिरी नेहमी म्हणत, 'माणूस हाती आलेल्या संधी दवडत असतो आणि मग उगीच भाग्याला दोष लावत बसतो.'

एकदा एक माणूस त्यांना म्हणाला, 'मी नाही मानत असं. आता माझंच उदाहरण घ्या ना. जन्म गेला माझा, भाग्याच्या हाकेकडे कधीपासून कान लावून बसलोय मी. भाग्यानं जर संधी दिली असती तर मी ती कधीही दवडली नसती, पण आमचं कुठलं आलंय एवढं भाग्य.'

हुजबिरी त्याला म्हणाले, 'असं आहे गड्या, मी आता जरा नदीच्या पलीकडच्या गावी चाललोय. संध्याकाळी नदीकाठच्या पारावर बसलेला असेन मी. तू ये तिकडे, आपण या विषयावर बोलू.' संध्याकाळी भेटण्याचं कबूल करून तो माणूस निघून गेला. हुजबिरींनी मग आपल्या शिष्यांना त्याच्या येण्याच्या मार्गावर सोन्याच्या नाण्यांनी भरलेलं मडकं ठेवायला आणि स्वतः आसपास रहायला सांगितलं.

ठरल्याप्रमाणे संध्याकाळी तो माणूस पुलावरून चालत पलीकडे नदीकाठच्या झाडाखाली लोकांशी बोलत बसलेल्या हुजबिरींना भेटायला आला. गंमत अशी की पुलावर जिथे मडकं ठेवलेलं होतं त्याआधी दहा पावलं त्यानं चक्क डोळे मिटून घेतले. पुलावरचं उरलेलं अंतर त्यानं डोळे बंद ठेवूनच ओलांडलं. हे पाहून तिथे उभे असलेले इतर लोकही चकित झाले. सगळयांना वाटलं, कमाल झाली. अगदी त्या मडक्याजवळ आल्यावरच याला नेमकी डोळे बंद करायची बुद्धी कशी सुचली? तो माणूस हुजबिरींसमोर आला तेव्हा त्याच्या मागोमाग सोन्याच्या नाण्यांनी भरलेलं ते मडकं घेऊन हुजबिरींचे शिष्यही आले.

हुजबिरींनी त्या माणसाला विचारलं, 'तू असे चालता चालता अचानक डोळे का बंद केलेस?' तो माणूस म्हणाला, 'तसं खास काही नाही, मला वाटलं, डोळे बंद करून पुलावरून चालताना कसं वाटतं ते जरा पाहावं, म्हणून...'

हुजबिरी त्याला म्हणाले, 'सोन्याच्या नाण्यांनी भरलेलं हे मडकं पाहिलंस का? केवळ तुला मिळावं म्हणून मी ते तुझ्या रस्त्यात ठेवलं होतं. उचललं असतंस तर तुझ्या सगळया आर्थिक विवंचना मिटल्या असत्या. पण माझं मन मात्र साशंकच होतं. जन्मभर चालून आलेल्या संधी तू दवडल्यास तर आता या संधीचं तू काय सोनं करणार असं वाटलं होतं मला. आणि तू तेच सिद्ध केलंस. काय तर म्हणे, डोळे बंद करून चालून पाहावं!

# संवेदनशीलता हवीच

फार मोठं नव्हतं, पण समीरचा उदरनिर्वाह त्याच्या छोट्याश्या गॅरेजच्या कमाईवरच चालायचा. लहानपणापासून समीरला वेगाचं भयंकर वेड. थोडा हात चालला तेव्हा त्यानं एक मस्तपैकी गाडी खरेदी केली स्वतःसाठी. अगदी वाऱ्याबरोबर शर्यत लावायची त्याची गाडी. आपल्या गाडीची तो खूप काळजी घेत असे.

समीरचा लहानपणीचा एक मित्र रघू एकदा अचानक त्याला भेटायला आला. समीरच्या गाडीचं त्यालाही खूप कौतुक वाटलं, पण राहून राहून त्या गाडीला पडलेली छोटीशी खोक आणि तेथील उडालेला रंग त्याला बुचकळयात टाकत होता.


शेवटी त्यानं समीरला विचारलंच. म्हणाला, 'समीर, अरे किती प्रेम आहे तुझं स्वतःच्या गाडीवर. हे गॅरेजही तुझंच आहे. मनात आणलं तर पटकन ही खोक तू भरून काढू शकशील. गाडीला लागलेलं हे गालबोट तू तसंच का ठेवलंयस?'

समीर म्हणाला, 'मला वाटलंच होतं तू हा प्रश्न विचारशील असं. अरे यामागे एक छोटीशी गोष्ट आहे.'

ते दोघे जेव्हा त्या गाडीत बसून फेरफटका मारायला निघाले तेव्हा समीरनं रघूला ती गोष्ट सांगितली. 'अरे, तेव्हा मी ही गाडी नवीनच खरेदी केली होती. असा सुंसाट निघालो होतो तिला पळवत. दूरवर रस्त्याजवळच्या झुडुपात काहीतरी हालतंय असं मला वाटलं. पण गाडीचा वेग कमी करून पाहायची मला अजिबात इच्छा नव्हती. मी भरधाव गाडी दामटत पुढे चाललो आणि तेवढ्यात एक वीट दाणकन् येऊन कारच्या दरवाजावर आदळली.' 'आपल्या नव्या गाडीला कुणी वीट फेकून मारलं हे लक्षात आलं आणि मी तिरमिरलो. त्याच तिरीमिरीत मी दार उघडलं आणि समोर रडत उभ्या असलेल्या मुलावर उखडलो, म्हटलं, काय रे ए गाढवा, का मारलीस ती वीट? माझ्या नव्या गाडीची काच फुटली आणि तिचा रंगही खरवडलाय पाहा...' 'रडत रडतच तो मुलगा मला म्हणाला, काका, मी काय करू? मी वीट भिरकावली नसती तर तुम्ही गाडी थांबवली नसतीत. कित्येक गाड्यांना मी हात दाखवला पण कुणीही गाडी थांबवली नाही. अहो, माझा मोठा भाऊ पांगुळगाड्यावरून पडलाय, मला पेलवत नाहीय त्याला उचलून पुन्हा व्हीलचेयरमध्ये बसवणं. प्लीज... मला थोडी मदत कराल का?'



'तेव्हा माझी नजर बाजूला गेली आणि मी थंड पडलो. रघ्या, खरं सांगतो रे, लाज वाटली मला त्याच्याकडे लक्ष न देता गाडी पुढे दामटल्याची. त्या घटनेची आठवण मनात कायम रहावी, इतरांनाही आपली गरज असू शकते हे नेहमी लक्षात असावं म्हणून मी गाडीला पडलेली खोक दुरुस्त केली नाही आणि त्या ठिकाणी उडालेला रंग परत लावला नाही.'



# श्रद्धा आणि तर्क

एकदा एक सिद्ध पुरुष आपल्या शिष्यावर प्रसन्न झाले. म्हणाले, 'आज मी तुला परिस देतो.' ते दोघेही परिस आणण्यासाठी निघाले. गावाबाहेर आल्यावर एका निर्जन ठिकाणी सिद्ध पुरुषाने शिष्याला एके ठिकाणी खोदायला सांगितलं. शिष्यानं जमीन खोदली तेव्हा त्याला तिथे लोखंडाची, गंज चढलेली एक छोटी डबी दिसली. याच डबीत परिस आहे असं सिद्ध पुरुषानं शिष्याला सांगितलं. शिष्य मोठा विद्वान होता. त्याला आपल्या ज्ञानाबद्दल सार्थ अभिमानही होता. त्याला वाटलं की, हा जर खरा परिस असता तर त्याच्या स्पर्शानं लोखंडाची ही डबी सोन्याची नसती का झाली? डबी अजूनही लोखंडाचीच आहे म्हणजे हा काही परिस नव्हे. डबी उघडून पहायचे कष्टही त्याने घेतले नाहीत. गुरुचा अनादर होऊ नये म्हणून त्यानं ती डबी स्वतःजवळ ठेवली पण गुरुबद्दलचा त्याच्या मनातील आदर थोडा उणावलाच होता.

गुरुपासून त्याची वाट वेगळी निघाली तेव्हा आधी त्यानं ती डबी भिरकावून दिली. तो पुढे निघणार तेवढ्यात त्याचं भिरकावून दिलेल्या त्या डबीकडे लक्ष गेलं. डबी सोन्याची झाली होती आणि झळाळत होती.

त्यानं डबी उचलून घेतली. ती उघडी होती. त्याच्या लक्षात आलं की डबीला आतून मखमलीचा अस्तर लावलेला होता आणि त्या अस्तरामुळेच परिसाचा लोखंडाच्या डबीला स्पर्श झालेला नव्हता.

त्यानं डबी भिरकावली तेव्हा ती उघडली असावी आणि परिसाचा डबीला स्पर्श झाला असावा.

त्यानं डबीत परिस शोधला पण तो घरंगळत कुठेतरी जाऊन पडला असावा. खूप शोधूनही शिष्याला परिस काही मिळाला नाही. अविश्वास आणि श्रद्धाविहीन तर्कामुळे तो परिसाला मुकला होता.

# रिकामे हात

अलेक्झांडरची शवयात्रा निघाली. त्याची शवयात्रा पाहाण्यासाठी लाखो लोक जमले होते. तिरडीच्या दोन्ही बाजूंनी अलेक्झांडरचे दोन हात लटकत होते. सगळयांनाच या गोष्टीचं खूप आश्चर्य वाटलं कारण अलेक्झांडर मोठा सम्राट होता, त्याची तिरडीसुद्धा लोकांनी इतक्या हलगर्जीपणानं बांधावी? असे कसे त्याचे दोन्ही हात अधांतरी लटकू दिले? कुणाच्याच कसं लक्षात नाही आलं?

पण मग हळूहळू लोकांना समजलं की हा हलगर्जीपणा नव्हता. खुद्द अलेक्झांडरचीच तशी इच्छा होती. त्यानं मरण्यापूर्वी सांगितलं होतं की माझी अंतीम यात्रा काढताना माझे दोन्ही हात लोकांना दिसतील असे तिरडीबाहेरच ठेवावे. त्यामुळे, जगज्जेता अलेक्झांडरसुद्धा शेवटी रिकाम्या हातीच गेला, जन्मभर विजयासाठी केलेला सगळा प्रपंच निरर्थकच होता हे लोकांना कळेल.

मरण्यापूर्वी काही वर्षांआधी अलेक्झांडर एका ग्रीक फकीराला डायोजनीसला भेटायला गेला होता. त्यावेळी डायोजनीसने अलेक्झांडरला विचारलं होतं, 'संपूर्ण जग जिंकून घेतल्यानंतर काय करायचं याबद्दल तू विचार केलायस का अलेक्झांडर?' डायोजनीसचा प्रश्न ऐकून अलेक्झांडरनं उदास स्वरात उत्तर दिलं, 'मला खूप चिंता वाटते. कारण, दुसरं जग नाहीय. तेव्हा, खरंच, हे जग जिंकून घेतल्यानंतर पुढे मी काय करावं?' खरं तर अजून त्यानं संपूर्ण जग जिंकलेलंच नव्हतं, पण तरीही, जग जिंकून घेण्याची महत्वाकांक्षा पूर्ण झाल्यानंतरही त्याची वासना बुभुक्षितच रहाणार होती!



मोठा जुगारी होता अलेक्झांडर. स्वतःजवळचं सगळं त्यानं डावावर लावलं आणि मोठमोठ्या लढाया जिंकून मोठमोठे ढीग लावले धन-संपदेचे. त्याच अलेक्झांडरला मृत्यूपूर्वी जणू साक्षात्कार झाला. रिकाम्या हाताने येतो आणि माणूस रिकाम्या हातीच जातो. आपल्याला झालेला साक्षात्कार लोकांपर्यंत पोहोचावा अशी त्याची इच्छा होती. लोकांनीही आपले रिकामे हात पाहावे, जाताना अलेक्झांडर सोबत काहीही घेऊन जाऊ शकला नाही हे लोकांना कळावं अशी त्याची इच्छा होती..... मरणातही बरंच काही जिंकून नेलं त्यानं.

# तत्वमसि श्वेतकेतु

बरीच वर्षे विद्यार्जन केल्यानंतर श्वेतकेतु घरी परतला. वडिलांनी त्याला विचारलं, 'विद्यार्जन पूर्ण झालं म्हणतोस तर मग ब्रह्मज्ञान मिळवलंस का? कारण त्याविना इतर सर्व विद्या व्यर्थच.'

श्वेतकेतु वडिलांना म्हणाला, 'माझ्या गुरुदेवांना जर त्याबद्दल माहिती असती तर त्यांनी मला अवश्य ब्रह्मज्ञान दिलं असतं. कारण ज्या ज्या विद्या त्यांना अवगत होत्या त्या सर्व त्यांनी मला दिल्या. ते स्वतः मला म्हणाले की, श्वेतकेतु, तुला शिकवण्यासारखं माझ्यापाशी आता काहीही शिल्लक राहिलं नाही. आता तू स्वगृही परतू शकतोस.'

श्वेतकेतूचं म्हणणं ऐकल्यावर उद्दालक - श्वेतकेतुचे वडील - त्याला म्हणाले, 'म्हणजे ही विद्या शिकवण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली म्हणायची. ठीक आहे, बाहेर जा आणि एक फळ तोडून आण झाडावरून.'

श्वेतकेतु झाडावरून फळ तोडून घेऊन आला. वडील त्याला म्हणाले, 'काप ते फळ.' श्वेतकेतूनं फळ कापलं. फळात खूप बिया होत्या. वडील त्याला म्हणाले, 'यातील एक बीज निवड.' श्वेतकेतूनं बीज निवडलं तेव्हा वडिलांनी त्याला विचारलं, 'एवढ्याश्या बीजातून प्रचंड वृक्ष बनू शकेल का?'

श्वेतकेतु म्हणाला, 'हो तर, बीजातूनच वृक्षाचा जन्म होतो.' वडील त्याला म्हणाले, 'म्हणजे, यातच वृक्ष लपलेला असायला हवा. तू ते बीज चीर. त्यात लपलेला वृक्ष आपण शोधून काढू.' श्वेतकेतूनं बीज कापलं पण त्यात काहीही नव्हतं. तिथे केवळ शून्य होतं.

श्वेतकेतू वडिलांना म्हणाला, 'यात तर काहीही नाहीय.'

उद्दालक त्याला म्हणाले, 'जे दिसत नाही, जे अदृश्य आहे त्यातूनच एक विशाल वृक्ष निर्माण होतो. आपणही अशाच शून्यातून जन्माला आलो.'

यावर श्वेतकेतूनं विचारलं, 'म्हणजे, मीसुद्धा त्या महाशून्यातूनच जन्माला आलो का?'

श्वेतकेतूच्या प्रश्नाला उत्तर देताना त्याचे वडील उद्दालक त्याला म्हणाले, 'तत्वमसि श्वेतकेतु - होय श्वेतकेतु, तू सुद्धा याच महाशून्यातून आला आहेस.तू त्याचाच एक भाग आहेस.'

वडिलांचं ते वाक्य ऐकलं आणि श्वेतकेतूला ज्ञानप्राप्ती झाली असं म्हणतात.

# जीवनाचे गणित

एक होती गोम. गोम म्हणजे शंभर पायांचा कीडा. ती वेगानं सरपटत कुठेतरी चालली होती. एका सशाची तिच्यावर नजर पडली. ससा पाहातच राहिला. त्याला वाटलं, ही गोम चालते तरी कशी? अबब! किती तिचे ते पाय. आधी कोणता पाय उचलायचा, मागनं कोणता पाय उचलायचा हे कसं कळत असेल तिला? भयंकर कठिण आहे बुवा. किती गणितं करावी लागत असतील हिला.

सशानं तिला हाक मारली. म्हणाला, 'अगं थांब. कुठे इतक्या लगबगीनं चाललीस? असं सांग, की तुझे इतके पाय आहेत तर त्यापैकी कोणता पाय कधी उचलायचा हे तुला कसं कळतं? चालताना कधी तुझी त्रेधा तिरपीट नाही उडत? कधी एकदम दहा पावलं उचलली असं वगैरे झालं का? तारांबळ होत असेल ना तुझी अगदी? खरं सांग, पायात पाय अडकून कधी पडली-बिडली होतीस की नाही? नाही? कम्मालचए. ए, मला शिकव ना हे गणित.'

खरं तर गोमेनं आपल्या पायांबद्दल असा आणि इतका विचार कधी केलाच नव्हता. ती सुर सुर चालायची. जन्मली तेव्हापासूनच. तिला आठवतं तेव्हापासूनच तिचे असे शंभर पाय होते. कधी तिच्या मनात हा प्रश्न उठलाच नाही की आपल्याला इतके पाय कसे काय? पहिल्यांदाच तिने खाली पाहिलं आणि ती घाबरली. तिला वाटलं - इतके पाय! शंभर! आपल्याला तर शंभरपर्यंत आकडेसुद्धा नीटपणे मोजता येत नाहीत.

ती सशाला म्हणाली, 'याबद्दल मी कधी विचारच केला नव्हता. आता तू लक्षात आणून दिलंयस तर करेन विचार. निरीक्षण-परीक्षण करेन आणि जो उलगडा होईल तो सांगेन तुला.' पण मग ती गोम पुन्हा पहिल्यासारखी चालू शकली नाही. थोडं अंतर कापलं आणि ती गळाठली. आता ती चालत कुठे होती, आता तर तिला शंभर पायांचं गणित सोडवायचं होतं.



एवढीशी गोम आणि शंभर पाय! एव्हढीशी तिची ती अक्कल आणि एव्हढं मोठं गणित! हे प्रचंड गणित ती सोडवणार तरी कशी?

# काल्पनिक बंधनात अडकलेले मन

एकदा वाळवंटातील एका सरायमध्ये एक मोठा काफिला आला. काफिल्यातील सारे प्रवासी दिवसभराच्या प्रवासानं खूप थकले होते. उंटांच्या मालकाने नोकरांना आज्ञा दिली आणि त्यानुसार उंटांच्या गळयात दोरखंड बांधले गेले. मग ते दोरखंड अडकविण्यासाठी खुंट्या गाडताना एकाच्या लक्षात आलं की एका उंटाचा दोरखंड आणि खुंटी दोन्ही हरवलेत. उंटाला मोकळं कसं सोडणार, कारण रात्री तो चालत दूर निघून जाईल आणि हरवेल असं त्याला वाटलं.

त्याने ही गोष्ट आपल्या मालकाला सांगितली. काफिल्याचा मालकाने सरायच्या मालकाकडे रात्रीपुरता दोरखंड आणि खुंटी मागितली. सरायच्या मालकानं दिलगिरी व्यक्त करत सांगितलं की, 'खुंट्या किंवा दोरखंड आमच्याकडे नाहीत. पण तुम्ही असं का नाही करत? - तुम्ही खुंटी गाडल्यासारखं करा, उंटाच्या गळयात दोरखंड अडकवल्याचा अभिनय करा आणि उंटाला झोपून जायला सांगा.'

हा उपाय लागू होईल हे त्या काफिल्याच्या मालकाला पटेना, पण दुसरा इलाज नव्हता त्यामुळे त्यानं सरायच्या मालकाचं म्हणणं मान्य केलं. त्यानं खुंटी गाडण्याचा, दोरखंड उंटाच्या गळयात अडकवण्याचा अभिनय तंतोतंत केला आणि इतर उंटांसारखंच त्या उंटालाही झोपायला सांगितलं.

आश्चर्य म्हणजे, तोवर ताटकळत उभा असलेला उंट मालकाची आज्ञा ऐकून खाली बसला आणि झोपी गेला. हे पाहून काफिल्याच्या मालकाला थोडं हायसं वाटलं. सकाळी पुढल्या टप्प्याच्या प्रवासासाठी निघताना इतर सर्व उंटांच्या गळयात अडकवलेले दोरखंड काढले गेले, खुंट्या उखडून काढल्या गेल्या. सगळे उंट पुढल्या प्रवासासाठी सज्ज झाले. पण काल्पनिक दोरखंडाने जखडलेला उंट ढिम्म उभा राहिना.

काफिल्याचा मालक त्रासला. सरायच्या मालकापुढे त्यानं तक्रारीच्या सुरात गाऱ्हाणं मांडलं. म्हणाला, 'काय चेटूक केलंत तुम्ही माझ्या उंटावर, आता तो उठून उभा राहायलासुद्धा तयार नाहीय. मी पुढच्या प्रवासाला निघणार कसा?'

सरायच्या म्हाताऱ्या मालकानं म्हटलं, 'आधी त्याच्या गळयात बांधलेला दोर काढा आणि तो दोर बांधलेली खुंटी जमिनीतून काढा.'

काफिल्याच्या मालकानं बुचकळयात पडत म्हटलं, 'पण त्याच्या गळयात कोणताही दोरखंड नाही आणि तो कोणत्याही खुंटीला बांधलेला नाही...' सरायच्या मालकानं म्हटलं, 'तुमच्या दृष्टीनं नाहीय. उंटाला मात्र आपण बांधले गेलेलो आहोत असंच वाटतंय. जा, खुंटी उपटा. दोरखंड काढा.'

काफिल्याच्या मालकानं मग उभे राहायला तयार नसलेल्या त्या उंटाजवळ येऊन त्याच्या गळयातील दोरखंड काढल्याचा अभिनय केला, खुंटी उपटल्याचा अभिनय केला. आश्चर्य! अंग झटकत तो उंट उठून उभा राहिला आणि इतर उंटांसोबत पुढच्या प्रवासाला निघण्यास सज्ज झाला.

काफिल्यातील लोकांना याचं खूप आश्चर्य वाटलं. त्यांनी सरायच्या मालकाला यामागील रहस्य काय असं विचारलं तेव्हा तो हसत त्यांना म्हणाला, ' बाबांनो, उंटच नव्हे तर माणसांचंही असंच असतं. काल्पनिक खुंट्यांना सगळे अडकलेले असतात. खरं तर, उंटांबद्दल मला काहीच अनुभव नाही, माणसांच्या अनुभवावरूनच मी तुम्हाला हा सल्ला दिला होता.'



# साचलेलं ज्ञान म्हणजे कचरा

झेन फकीर रिंझाईंशी संबंधीत एक घटना सांगितली जाते.

ते एका टेकडीवर रहात असत. एकदा एक पंडित त्यांना भेटायला आले. चढण चढण्याचा त्यांना सराव नसावा, कारण पोहोचले तेव्हा त्यांना चंगलीच धाप लागलेली होती. पण त्यांच्या मनात प्रश्नांनी नुसता धुमाकूळ माजवलेला होता. आल्या आल्या त्यांनी रिंझाईंवर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली - ईश्वर आहे की नाही हे मला जाणून घ्यायचंय. शिवाय, आत्मा आहे की नाही? ध्यान म्हणजे काय? बुद्धत्व म्हणजे काय? संबोधिची घटना... या सगळयाबद्दल मला जाणून घ्यायचंय.

त्यांचा उतावीळपणा पाहून रिंझाईंना मौज वाटली. ते म्हणाले, 'आपण नुकतेच पोहोचताहात. थोडी विश्रांती घ्या. मी आपल्यासाठी गरम चहा आणतो. चहा पिऊ, नंतर करू चर्चा, कसं?'

रिंझाई चहा घेऊन आले. पंडितांच्या हाती कप दिला आणि त्यात ते चहा ओतू लागले. कप भरला. पण रिंझाई थांबले नाहीत. चहा कपातून ओसंडू लागला.

पंडित म्हणाले, 'अहो थांबा. कप भरलाय. त्यात थेंबभर चहाची जागाही उरलेली नाही. आणखी चहा कपात रहाणार कसा?'

रिंझाई म्हणाले, 'मला वाटलं होतं तुम्ही पोपटपंची करणारे पोकळ पंडित असाल बहुतेक, पण नाही, तुमच्यात थोडी अक्कल आहे असं दिसतं. कप भरलेला असेल तर त्यात आणखी चहा ओतता येत नाही हे तुम्हाला समजतं. मग जरा विचार करून सांगा, आपला प्याला रिकामा आहे का? समजा भेटलाच ईश्वर, तर त्याला आत्मसात करू शकाल आपण? बुद्धत्वाला उगवू देण्यासाठी तुमच्या अंतःकरणाचं आकाश मोकळं आहे का? तुमच्या अंतःकरणात इतकं ज्ञान साचलंय की समाधीचा एखादा थेंबही त्यात सामावू शकणार नाही. साचलेलं ज्ञान म्हणजे कचरा, त्याचा निचरा झाल्याशिवाय स्वच्छ समाधी लागणार कशी? बुद्धत्व येणार कुठून? तुमच्या प्रश्नांची उत्तरं मी नक्की देईन, पण तुम्ही ती ग्रहण करू शकाल का?'



# या शरीराची किंमत काय?

एकदा प्रसिद्ध संत जलालुद्दीन रूमी यांना दरोडेखोरांनी पकडलं. त्याकाळी गुलामगिरीची पद्धत होती. रूमींना गुलामांच्या बाजारात विकण्यासाठी घेऊन निघाले. रूमी धट्टे-कट्टे आणि उंचे-पुरे होते. डाकूंना वाटलं की गुलामांच्या बाजारात या कैद्याची चांगली किंमत मिळेल.

बाजाराच्या रस्त्यात एक माणूस त्यांना भेटला. तो गुलाम खरेदी करायला निघाला होता. बाजारापर्यंत जाण्याचा त्रास वाचेल म्हणून दरोडेखोरांनी त्या माणसाला रूमींची किंमत काय द्याल असं विचारलं. तो माणूस म्हणाला, 'मी याचे दोन हजार दीनार द्यायला तयार आहे, बोला, विकणार का?'

डाकू खूश झाले. पण रूमी त्यांना म्हणाले, 'थांबा, घाई करू नका. थोडं पुढे चला. योग्य किंमत देणारा भेटेल.' डाकूंनी त्यांचं म्हणणं मान्य केलं. ते पुढे चालले.




पुढे त्यांना एक व्यापारी भेटला. रूमींना पाहून तो डाकूंना म्हणाला, 'मी याचे तीन हजार दीनार देईन. बोला, विकणार का?' आता त्या दरोडेखोरांच्या मनात खूप हाव निर्माण झाली. त्यांनी आपसात मसलत करत म्हटलं, 'हा फकीर अगदी खरं बोलला बरं.' त्यांनी मग काय करावं असं पुन्हा रूमींनाच विचारलं. पण रूमी त्यांना म्हणाले, 'आत्ता नाही.'

पुढे त्यांना एक सम्राट भेटला. तो पाच हजार दीनार द्यायला तयार होता. डाकूंनी

एवढ्या रकमेची कल्पनासुद्धा केली नव्हती. रग्गड झाली किंमत असं वाटून त्यांनी लगेच रूमींना विकायचं ठरवलं. त्यांना वाटलं,'सम्राटापेक्षा जास्त किंमत देऊन याला विकत घेणारा आपल्याला कोण भेटणार?'

पण पुन्हा रूमींनी त्यांना अडवलं. म्हणाले, 'नको, एवढ्यात नका विकू मला. अजून माझी खरी किंमत करणारा आला नाहीय. थोडा धीर धरा.' डाकूंना राहवत नव्हतं, पण लोभ आवरेना. शिवाय आतापर्यंत रूमींनी म्हटलेलं खरं ठरलं होतं. शेवटी त्यांनी रूमींचं ऐकायचं ठरवलं. ते पुढे चालले.

समोरून डोक्यावर गवताचा भारा घेऊन एक माणूस येत होता. डाकू फकीराला विकायला नेत आहेत हे समजलं तसं त्यानं डाकूंना विचारलं, 'विकणार का याला?' त्याला झिडकारत डाकू म्हणाले, 'हो, पण तू याची काय किंमत देणार? चल नीघ.' डोक्यावरचा भारा खाली टाकत तो म्हणाला, 'गवताचा हा भारा देईन याच्या बदल्यात.' ते ऐकून रूमी लगेच म्हणाले, 'ठीक. बरोब्बर किंमत लावली. या शरीराची हीच किंमत योग्य आहे. हा माणूस शरीराची खरी किंमत जाणतो, यालाच हे शरीर विका.'



# पराजित नेपोलियन

पराजित नेपोलियनला सेंट हेलेना नावाच्या एका बेटावर नजरबंदीत ठेवलं होतं. त्यांच्यासोबत त्यांचे खाजगी डॉक्टरही होते. विजयमोहिमेतही हे डॉक्टर नेपोलियनसोबत राहिले होते. साधारण कैदी बनून जीवन कंठावं लागणाऱ्या नेपोलियनला पाहून त्यांना खूप वाईट वाटत असे. एके दिवशी डॉक्टर आणि नेपोलियन बेटावर फेरफटका मारण्यासाठी निघाले. एका छोट्याशा पाऊलवाटेवरून ते दोघे चालले होते. तेवढ्यात समोरून डोक्यावर गवताचा भारा घेतलेली एक स्त्री आली. भारा एवढा मोठा होता की त्याखाली तिचा अर्धाअधिक चेहरा झाकला गेला होता. ती नीट पाहू शकत नव्हती.



डॉक्टर ओरडून तिला म्हणाला, 'दूर हो, दूर हो. पाउलवाटेवरनं कोण चाललंय याची कल्पना तरी आहे का तुला?' गवत वाहून नेणाऱ्या त्या स्त्रीच्या लक्षात काही येण्याअगोदर नेपोलियनने हात धरून डॉक्टरना थोडं बाजूला नेलं. ती स्त्री नेपोलियनच्या इतक्या जवळून पुढे गेली की तिच्य डोक्यावरच्या भाऱ्यातील गवताच्या काही काड्यांचा नेपोलियनच्या शरीराला स्पर्श झाला. डॉक्टरना खूप वाईट वाटलं, पण नेपोलियनवर याचा काहीही परिणाम झाला नाही. त्यांनी डॉक्टरांची समजूत घालत म्हटलं, 'गड्या, संपले ते स्वप्नभारले दिवस. आता जरा जागा हो. डोंगराला म्हटलं की सरक, नेपोलियन येतोय तर त्याला सरकावं लागलं असतं असे ते दिवस आता पालटले. आता गवत वाहून नेणाऱ्यांसाठीसुद्धा आपल्याला सरकावं हे लागेलच.' जय आणि पराजयाचा खरा अर्थ नेपोलियन जाणून होता. एका कामगार स्त्रीसाठी नेपोलियनना आपला मार्ग वळवावा लागला याची डॉक्टरना मात्र चुटपुट लागून राहिली.

# दान काय देणार?

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुद्ध घरी परतले. अकरा वर्षांनंतर ते घरी परतले होते. त्यांनी घर सोडलं त्यावेळी त्यांचा मुलगा राहुल एक वर्षाचा होता. ते परतले तेव्हा तो बारा वर्षांचा झाला होता. यशोधरा - गौतम बुद्धांची पत्नी - त्यांच्यावर खूप रागावलेली होती. गौतम बुद्धांवर नजर पडताच तिने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली - 'एवढासुद्धा भरंवसा वाटला नाही का तुम्हाला माझ्याबद्दल? 'मी चाललो', असं जर मला म्हटलं असतंत तर मी तुम्हाला रोखून ठेवेन असं तुम्हाला वाटलं होतं का? मी क्षत्राणी आहे हे तुम्ही कदाचित विसरला होतात तेव्हा. आम्ही जर पतीला टिळा लावून रणांगणावर पाठवू शकतो तर तुम्हाला सत्याचा शोध घेण्यासाठी पाठवू शकले नसते का मी? तुम्ही माझा अपमान केला.'

कित्येक लोकांनी बुद्धांना बऱ्याच प्रकारचे प्रश्न विचारले होते पण यशोधरेच्या प्रश्नांनी  बुद्धांना निरुत्तर केलं.  पुढे यशोधरेनं बुद्धांना विचारलं, 'जंगलात जाऊन तुम्ही जे मिळवलं ते तुम्हाला इथे राहून मिळालं नसतं का?' याचं उत्तरही बुद्ध होकारार्थी देऊ शकले नाहीत कारण सत्य तर सर्व ठिकाणी विद्यमान असतं.  पण यशोधरेनं त्यानंतर जे केलं ते वर्मी घाव घालणारं होता. यशोधरेनं आपल्या मुलाला - राहुलला पुढे केलं आणि ती त्याला म्हणाली, 'पाहा, हे समोर हातात भिक्षापात्र घेऊन जे उभे आहेत ना, तेच तुझे वडील आहेत. तू एक दिवसाचा होतास तेव्हा हे तुला सोडून पळून गेले होते. त्यानंतर हे आत्ता परतले. आता जातील तेव्हा देव जाणे पुन्हा कधी भेट होईल. तू त्यांच्याकडून आपला वारसा मागून घे. तुला देण्यासाठी यांच्याजवळ जे काय आहे ते मागून घे.'

बुद्धांजवळ त्याला देण्यासाठी काय असणार? यशोधरा सूड उगवून घेत होती, मनात साठलेला राग शब्दांवाटे व्यक्त करत होती. आपण विचारलेल्या प्रश्नामुळे परिस्थितीला अचानक वेगळी कलाटणी मिळेल याची तिला अजिबात कल्पना नव्हती.

तिचं बोलणं संपतं न संपतं तो बुद्धांनी आपलं भिक्षापात्र राहुलला दिलं. ते म्हणाले, 'बेटा, मला जे मिळालं ते मी तुला देतो. या व्यतिरिक्त तुला देण्याजोगं माझ्याजवळ काहीही नाही. तू संन्यासी हो!' ऐकलं आणि यशोधरेच्या डोळयांना आसवांची धार लागली. बुद्ध म्हणाले, 'समाधीच माझी संपदा आहे. संन्यास घेण्यानंच ती वाटता येते. खरं तर, तुलाही घेऊन जावं म्हणूनच मी आलो होतो. ज्या संपदेचा मी धनी झालो तिची तू ही धनी व्हावंस असं मला वाटतं.'

राहूलने पित्याची इच्छा पूर्ण केली आपण क्षत्राणी आहेत हे यशोधरेनंही सिद्ध करून दाखवलं. बुद्धांकडून दीक्षा घेऊन ती सुद्धा भिक्षुंमध्ये मिसळून गेली. इतकी, की त्यानंतर बौद्ध शास्त्रांमध्ये तिचा कुठेही उल्लेख आढळून येत नाही.

# चाणाक्ष गाढव

व्यवहारचातुर्याचं अतिशय उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल अशी ही ईसापनीतीतील एक गोष्ट. एकदा एक सिंह, एक लांडगा आणि एक गाढव एकत्र शिकारीसाठी निघाले. तिघांनी मिळून भरपूर शिकार केली आणि मांसाचा ढीग जमवला. मग सिंह लांडग्याला म्हणाला, 'तू या मांसाचे तीन समान वाटे कर. आपण तिघांनी मिळून शिकार केली तेव्हा प्रत्येकाला समान वाटा मिळायला हवा.'

लांडग्यानं सिंहाच्या म्हणण्याचं शब्दशः पालन केलं आणि मांसाचे तीन समान वाटे केले.

सिंहाला राग आला आणि त्यानं तत्क्षणी लांडग्यावर झेप टाकून त्याची मानगूट पिरगळली आणि मेलेल्या लांडग्यालाही मांसाच्या ढिगाऱ्यावर टाकलं. मग सिंह गाढवाकडे वळून म्हणाला, 'मांसाचे वाटे करायची जबाबदारी आता मी तुझ्यावर सोपवतो. समान दोन वाटे कर, आपल्या दोघांसाठी.' गाढवानं मेलेल्या जनावरांच्या मांसामधून एक कावळा



उचलला आणि बाजूला काढून ठेवला. मग मोठ्या ढिगाकडे इशारा करत तो सिंहाला म्हणाला, 'महाराज, हा आपला वाटा.'

सिंह एकदम खूश झाला. तो गाढवाला म्हणाला, 'वाः वाः, शहाणा आहेस. वाटण्या करण्याची कला कुठे शिकलास तू?' गाढवानं सिंहानं केलेल्या प्रशंसेचा मान तुकवून स्वीकार केला. मग मनोमन तो बोलला,'या मेलेल्या लांडग्यानं मला सिंहासोबत केलेल्या शिकारीची वाटणी कशी करायची ते शिकवलं.'

# क्षमा

कुरुक्षेत्रावर घडलेल्या युद्धानंतरच्या रात्री अश्वत्थाम्याने पांडवांच्या शिबिरास आग लावली. आगीपासून प्राण वाचविण्याच्या प्रयत्नात असलेल्यांचा त्याने बाण मारून वध केला. महाभारताच्या युद्धातून पांडवपक्षाचं जे काही सैन्यबळ वाचलं होतं त्याचा पार धुव्वा उडाला आणि पांडव वंशापैकी त्यावेळी जे कुणी शिबिरात होते ते सुद्धा मारले गेले. युद्धात विजय मिळाल्यानंतर पाच पांडव आणि सात्यकी यांना घेऊन कृष्ण इतर ठिकाणी गेला होता त्यामुळे ते तेवढे वाचले. पांडवांच्या सैन्यात आता एवढेच लोक उरले होते. सकाळी जेव्हा ते शिबिरात परतले तेव्हा तिथे त्यांना अर्धवट जळालेल्या प्रेतांचा खच पडलेला दिसला. महाराणी द्रौपदीच्या पाचही पुत्रांचे क्षतविक्षत मृतदेह तेथे पडलेले होते. द्रौपदीच्या व्यथेचं वर्णन काय सांगावं....

अर्जुनानं द्रौपदीला धीर दिला. तो म्हणाला, यांना मारणाऱ्या नराधमाचं - त्या अश्वत्थाम्याचं धडावेगळं शीर पाहिल्यानंतरच तू आज स्नान कर.' आपल्या रथात बसून श्रीकृष्णाबरोबर अर्जुन अश्वत्थाम्याला शोधण्यासाठी निघून गेला. अश्वत्थ्याम्यानं अर्जुनाला पाहिलं तेव्हा तो प्राणभयानं पळू लागला. पण अर्जुनानं त्याचा पाठलाग केला आणि त्याला बंदी बनवलं. त्यानं अश्वत्थाम्याला द्रौपदीसमोर आणून उभं केलं. अश्वत्थाम्यावर नजर पडताच भीम म्हणाला, 'तात्काळ याला ठार मारलं पाहिजे.' सगळयांचाच राग उफाळलेला होता.

पण द्रौपदीनं सगळयांना सबूरीनं घेण्यास सांगितलं. द्रौपदी म्हणाली, 'माझे पुत्र मारले गेले त्यामुळे पुत्रशोक म्हणजे काय हे मी चांगलं जाणते. याची माता कृपी आपल्या गुरुपत्नी आहेत. माझ्यासारखं पुत्रवियोगाचं दुःख त्याना सहन करावं लागू नये असं मला वाटतं. आपल्याला उत्तम शस्त्रविद्या देणाऱ्या गुरु द्रोणांचं त्यांच्या या पुत्रात आम्हाला दर्शन होतं. याच्याशी निष्ठूरपणानं वागणं आपल्याला शक्य नाही. सोडून द्या, जाऊ दे याला.' जिच्या पाच मुलांची प्रेतं समोर पडलेली असताना आणि त्यांचा वध करणारा समोर बंदी होऊन उभा असताना द्रौपदीनं त्याला केलेली क्षमा खरोखर धन्य होय.

# क्षण मुक्तीचा

नागार्जुन एक फकीर होते. एक राणी त्यांच्या व्यक्तीमत्वावर भाळली. एके दिवशी साहस एकवटून तिने नागार्जुनांना आपल्या महालात येण्याचे आमंत्रण दिले. त्यांच्या सानिध्यात काही क्षण घालविण्याची तिची इच्छा होती. त्यांचे अभाव दूर करण्यासाठी त्यांना काहीतरी देण्याचीही तिची इच्छा होती.

नागार्जुनांनी राणीचं आमंत्रण स्वीकारलं. राणीच्या महालात ते तिचा पाहुणचार स्वीकारण्यासाठी गेले. त्यांच्या येण्यानं राणी आनंदली. तिने त्यांचे स्वागत केले. त्यांची उत्तम सरबराई राखली. संध्याकाळ झाली तशी नागार्जुनांनी राणीचा निरोप घेतला. निरोप देताना राणी अत्यंत नम्रतेनं त्यांना म्हणाली,'महाराज, मला आपणाकडून काही हवंय.'

"काय हवंय?", असं नागार्जुनांनी राणीला विचारलं.

राणी म्हणाली, 'आपण आपलं भिक्षापात्र जर मला दिलंत तर' पटकन नागार्जुनांनी राणीला आपलं भिक्षापात्र दिलं. राणीनं मग त्यांना एक रत्नजडित स्वर्णपात्र दिलं. ती म्हणाली, 'त्या पात्राऐवजी आपण हे पात्र घ्या. मी दररोज आपल्या भिक्षापात्राची पूजा करेन.'

राजमहालातून बाहेर पडताच नागार्जुनांच्या हातातील त्या मौल्यवान पात्रावर एका चोराची नजर खिळली. तो त्यांचा पाठलाग करू लागला. एकांत मिळताच त्यांच्या हातून ते पात्र हिसकावून घेण्याचा त्याचा विचार होता. थोडं तर चालून गेल्यानंतर नागार्जुनांनी हातातील ते पात्र फेकून दिलं. तत्क्षणी चोरानं ते उचललं. त्याला वाटलं, काय माणूस आहे हा! एव्हढं बहुमूल्य पात्र यानं सरळ फेकून दिलं? काही का असेना, आपल्याला ते मिळालं ना, झालं तर. मग त्याच्या मनात विचार आला, आपण निदान यासाठी त्याचे आभार मानायला हवेत. पुढे होऊन त्यानं नागार्जुनांना रोखलं. म्हणाला, 'महाराज, मला आपले आभार मानायचे आहेत. आपल्यासारखे लोकही या जगात आहेत यावर आत्तापर्यंत माझा अजिबात विश्वास नव्हता. मला आपली पायधूळ घेण्याची परवानगी द्या. ' नागार्जुन हसतच त्याला म्हणाले, 'जरूर.'

चोरानं खाली वाकून त्यांच्या पायांवर हात ठेवला आणि तो आपल्या कपाळी लावला. त्या क्षणी त्याच्या कृतज्ञ हृदयात त्या पुसटशा स्पर्शानं जे भाव जागृत झाले त्यामुळे तो व्याकुळला. नागार्जुनांना त्यानं विचारलं, 'बाबा, मला आपल्यासारखं व्हायचं असेल तर किती जन्म घ्यावे लागतील?' नागार्जुन त्याला म्हणाले, 'किती जन्म? तुझी इच्छा असेल तर तसं आत्ता, या क्षणीही घडू शकतं.'

# बरी अद्दल घडली

रामकाकांच्या घरासमोर अंगणात एक खूप मोठं झाड होतं. त्या झाडामुळे घरावर आणि अंगणभर नेहमी सावली असायची. घराचं ते जणू छत्रच होतं. पण त्यांच्या एका शेजाऱ्याचं म्हणणं पडलं की घर आणि अंगणावर अशी छाया टाकणारी झाडं अशुभ असतात. त्याच्या अशुभ छायेमुळे काहीतरी अप्रिय घडण्याआधी ते झाड कापून काढणंच योग्य.

शेजाऱ्याचं बोलणं मानून रामूकाकांनी आपल्या अंगणातील घरादाराला सावली देणारा तो वृक्ष कापून टाकला. चुलीत जाळता येतील अशा त्या प्रचंड वृक्षाच्या छोट्या छोट्या ढलप्या पाडल्या. वृक्ष बराच मोठा होता. त्याच्या अर्ध्या लाकडांनी रामूकाकांचं घर भरलं. अंगणातही जागा उरली नाही साठवायला. तेव्हा मदत करण्याच्या बहाण्यानं तिथे आलेल्या त्यांच्या शेजाऱ्यानं त्यांच्या संमतीनं उरलेली अर्धी लाकडं स्वतःसाठी नेली.

काही दिवसांनी, थंडपणानं विचार करताना रामूकाकांना वाटलं की, आपली सरपणाची सोय करण्यासाठी म्हणूनच त्यांच्या त्या शेजाऱ्यानं त्यांना त्यांच्या अंगणातील झाड अशुभ असल्याचा आणि ते तोडण्याचा सल्ला दिला होता.

रामूकाकांना खूप वाईट वाटलं.

गावातल्या एका वयोवृद्ध व्यक्तीसमोर त्यांनी आपलं मन उघड केलं. विचारलं की, बाबा, झाड तोडलं ही माझ्या हातून चूक घडली का? असे प्रचंड वृक्ष दुर्भाग्याला आमंत्रण देतात का? बाबा हसत म्हणाले, 'तुझ्यासारख्या मुर्खाच्या अंगणात उगवला हे त्या वृक्षाचं दुर्भाग्यच म्हणायला हवं. म्हणूनच त्याची कत्तल घडली आणि आता त्याला जाळलंही जाईल.' ऐकलं आणि रामूकाकांना आपल्या हातून घडलेली चूक जाणवून रडूच कोसळलं.


वयोवृद्ध बाबांनी मग रामूकाकांना सांगितलं, 'जाऊ दे, चुका माणसाच्या हातूनच घडतात. हरकत नाही. आपण आता मूर्ख राहिलो नाही यातच समाधान मान. इतरांच्या सल्यावर अंमल करण्याआधी सल्ला देण्यामागे त्यांचा काय हेतू आहे याचा शोध घेऊन, सल्ला नीट उमगेल तेव्हाच आणि स्वतःही त्याच्याशी सहमत असल्यासच त्यावर अंमल करावा हे समजण्याची अक्कल एक झाड गमावून जरी तू शिकलास तरी खूप झालं. या गोष्टी नीट लक्षात ठेवल्यास तर पुन्हा अशी चूक घडणार नाही तुझ्याकडून.'

# परोपकारी लिंकन

अमेरिकेचे माजी राष्ट्रपती अब्राहम लिंकन अतिशय दयाळू व्यक्ती होते.

एकदा आपल्या मित्राबरोबर ते एका सभेत भाग घेण्यासाठी निघाले होते. रस्त्यात एके ठिकाणी चिखलाने भरलेला मोठा खड्डा होता आणि त्या खड्ड्यात डुकराचे एक पिल्लू पडले होते. चिखलातून बाहेर निघण्याचे त्या पिल्लाचे सर्व प्रयत्न निष्फळ चालले होते. पिल्लू घायकुतीला आले होते. लिंकनने आपली बग्घी थांबवली आणि स्वतः चिखलात उतरून डुकराच्या त्या पिल्लाला बाहेर काढले. या प्रयत्नांत त्यांच्या कपड्यांवर चिखल लागला. सभास्थळी पोहोचण्यास थोडा उशीरही झाला. थोडं पाणी घेऊन त्यांनी हात-पाय धुतले आणि ते सभास्थळी पोहोचले. सभेच्या ठिकाणी त्यांचे चिखलानं माखलेले कपडे पाहून लोकांमध्ये कुजबूज सुरू झाली. काही लोकांनी लिकनच्या मित्राला त्याबद्दल विचारले.

शेवटी लोकांची जिज्ञासा शांत करण्याच्या उद्देशाने सभा सुरू झाली तेव्हा आयोजकांनी त्यामागील कारण सगळ्यांना जाहीर रीत्या सांगितले. ते म्हणाले की, लिंकन इतके दयाळू आहेत की सभेच्या ठिकाणी येताना चिखलात अडकलेल्या डुकराच्या पिल्लाचे हाल त्यांना पाहावले नाहीत. त्याला चिखलातून बाहेर काढलं तेव्हाच ते सभेच्या ठिकाणी आले. यामुळेच त्यांना इथे पोहोचण्यास अंमळ उशीर झाला.



आयोजकांचं बोलणं ऐकून लिंकन लगेच उभे राहिले आणि म्हणाले की, आपला काहीतरी गैरसमज होतोय असं मला वाटतं. डुकराचं ते पिल्लू तडफडत होतं म्हणून मी त्याला चिखलातून बाहेर काढलं असं नव्हे, तर, चिखलात अडकल्यामुळे त्याचा जीव कासावीस होत असलेला मला पाहवेना म्हणून मी त्याला बाहेर काढलं. स्वतःच्याच दुःखभावनेवर मी फुंकर घातली. परोपकारही स्वान्तःसुखाय म्हणणारे लिंकन थोरच होते.

# सोंगाड्या

एका राजाच्या दरबारात एकदा एक सोंगाड्या आला आणि त्यानं दानस्वरूपात पाच स्वर्णमुद्रा मागितल्या. राजा त्याला म्हणाला,'सोंगाड्या आहेस असं म्हणतोस तर तुझ्या कलेचा काही नमूना दाखव. आम्ही तुला दान नव्हे, बक्षीस देऊ.' राजाचं बोलणं ऐकलं आणि सोंगाड्या दरबारातून बाहेर निघून गेला.

दुसऱ्या दिवशी पहाटे पहाटे शहराबाहेरच्या देवळासमोर एका साधूनं मुक्काम ठेवला. साधू मौनीबाबा होता. माळावर गुरं चरायला आणलेल्या गुराख्यांनी या मौनीबाबाबद्दल शहरात सगळयांना बातमी दिली. गुराख्यांनी त्या साधूच्या पायांवर डोकं टेकून आशिर्वाद मागितले होते, पण त्यांनी डोळे उघडले नव्हते. ध्यानधारणेत ते तल्लीन राहिले. त्यांचया आगमनाची बातमी शहरभर पसरली आणि दुसऱ्या दिवशी त्यांच्या दर्शनासाठी लोकांची गर्दी जमली. होता होता बातमी राजमहालापर्यंत पोहोचली. कित्येक दरबारी दान आणि फळं-फुलं घेऊन साधूच्या दर्शनाला आले. तरीही साधूनं डोळे उघडले नाहीत आणि कोणत्याही वस्तूचा स्वीकारही केला नाही. संध्याकाळपर्यंत या महान साधूच्या आगमनाची बातमी राजाच्या कानांपर्यंत पोहोचली. राजासुद्धा धन-धान्य, सोनं-नाणं घेऊन साधूच्या दर्शनाला आला. हात जोडून त्यानं साधूच्या विनवण्या केल्या पण साधूनं राजाच्या विनवण्यांनाही दाद दिली नाही.

परतताना राजानं तिथे उपस्थित असलेल्या दरबाऱ्यांना दुसऱ्या दिवशी सकाळीच दरबारात हजर रहाण्यास सांगितलं. या महान साधूला कोणत्याही प्रकारची तोसीस पडू नये म्हणून काय काय करता येईल या विषयावर त्यांना सल्ला-मसलत करायची होती.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे कामकाज सुरू होण्याआधीच सोंगाड्या पुन्हा दरबारात हजर झाला. राजाला तो म्हणाला, 'माझ्या कलेचा नमूना मी दिला आता मला पाच स्वर्णमुद्रा द्या.'

राजानं आश्चर्यानं त्याला विचारलं, 'आपली कला तू कधी दाखवलीस आम्हाला?' सोंगाड्या म्हणाला, 'दोन दिवस शहराबाहेरच्या मंदिरासमोर बसलेला तो मौनी साधू मीच तर होतो. साधूचं सोंग घेतलं होतं मी.'

राजानं त्याला विचारलं, 'काल तुझ्यासमोर वैभवाचे ढीग लागले होते. त्यातून तू काहीही घेतलं नाहीस आणि आज पुन्हा पाच स्वर्णमुद्रांसाठी तू दरबारात आलास. असं का?'

सोंगाड्या म्हणाला, 'महाराज, काल मी साधूचा वेष धारण केला होता. दान स्वीकारलं असतं तर माझ्या सोंगाचा मान राहिला नसता. शिवाय, मला फक्त पाच स्वर्णमुद्रांचीच गरज आहे. इतकं धन घेऊन मी काय करणार!' त्याचं म्हणणं ऐकलं आणि तो केवळ महान कलाकारच नव्हे तर एक महान व्यक्ती असल्याबद्दल राजाची खात्री पटली.

# जगाचं कल्याण हाच खरा धर्म

रामानुजाचार्यांना त्यांच्या गुरुंनी अष्टाक्षरी मंत्राचा उपदेश दिला आणि सांगितलं, वत्सा, हा कल्याणकारी मंत्र ज्याच्या कानावर पडेल त्याची सारी पापं नष्ट होतात. तयाला मोक्षप्राप्ती होते. म्हणूनच हा मंत्र अतिशय गुप्त राखला जातो. तू सुद्धा हा मंत्र कुणा अनधिकारी व्यक्तीच्या कानांवर जाणार नाही याबद्दल खबरदारी घे. गुरुंचं बोलणं ऐकून रामानुज पेचात अडकले. त्यांना वाटलं, हा मंत्र एवढा प्रभावशाली आहे तर तो गुप्त का ठेवायचा? हा तर प्रत्येक प्राणीमात्राला ऐकवायला हवा. त्यामुळे सगळयांच्या दुःखाचं हरण होईल. आणि सगळयांचीच पापं नष्ट होतील.

हा विचार मनात आला आणि लगेच त्यांना गुरुजींनी दिलेली ताकीदही आठवली. गुरुच्या आज्ञेचं उल्लंघन करणं म्हणजे महत्पापच. या द्विधा मनःस्थितीमुळे त्यांना रात्रभर झोप आली नाही. एका बाजूला संपूर्ण जगाचा उद्धार करण्याची संधी होती आणि दुसऱ्या बाजूला गुरुंची आज्ञा मोडण्याचं पातक होतं. शेवटी त्यांनी निर्णय घेतला. ब्रह्म मुहूर्तावर ते उठले आणि आश्रमाच्या छतावर चढले. संपूर्ण शक्ती आपल्या आवाजात ओतून त्यांनी अष्टाक्षरी मंत्राचा जप सुरू केला.

छतावर चढून मंत्रजाप करणाऱ्या रामानुजांना पाहाण्यास तिथे खूप गर्दी लोटली. थोड्याच वेळात गुरुही तिथे येऊन पोहोचले. रामानुजाला त्यांनी खाली उतरण्यास सांगितलं. रामानुज खाली आले. गुरुंनी त्यांना विचारलं, 'तू काय करतोयस हे तुला कळतंय का?'

रामानुजांनी विनम्रपणानं सांगितलं, 'गुरुदेव, क्षमा असावी. आपल्या आज्ञेचं उल्लंघन करण्याचं पाप मी केलंय. हे पाप केल्यानं मी नरकात जाणार हे ही मला ठाऊक आहे. पण याबद्दल मला वाईट अजिबात वाटत नाहीय. ज्या ज्या लोकांच्या कानांवर हा मंत्र पडला त्या सगळयांनाच आता मोक्ष मिळेल.' रामानुजांनी दिलेली प्रांजळ कबूली ऐकून रागावलेल्या गुरुजींचं मन थंडावलं. त्यांच्या डोळयांत आनंदाश्रु दाटले. रामानुजाला छातीशी कवटाळत ते म्हणाले, 'तूच माझा खरा शिष्य आहेस. ज्याला संपूर्ण प्राणीमात्रांच्या कल्याणाची चिंता वाटते, तोच खरा धार्मिक.'

# मडक्याचा मोह तरी का बाळगा?

बुखारातील शेख वाजिद अली एकदा आपला काफिला घेऊन प्रवासाला निघाले. त्यांच्या काफिल्यात जवळ जवळ हजारभर उंट होते. इतरही लवाजमा होता. सामान-सुमान होतं. प्रवास करता करता ते एका अतिशय चिंचोळ्या मार्गावर पोहोचले. मार्ग एवढा चिंचोळा की एका वेळी फक्त एकच उंट त्या मार्गाने जाऊ शके. त्यामुळे त्यांच्या सगळया उंटांना एकामागे एक चालावं लागलं आणि उंटांची एक मोठ्ठी रांग तयार झाली. सगळ्यात पुढे असलेल्या उंटावर स्वतः शेख स्वार होते.

उंटांचा हा तांडा पुढे पुढे चालला होता आणि अचानक एक ऊंट मेला. पूर्ण रस्ता अडवून त्या उंटाचं कलेवर अशा रीतीनं पडलं की मागले उंट पुढे जाऊ शकत नव्हते आणि पुढले उंट मागे येऊ शकत नव्हते. शेखपर्यंत बातमी पोहोचली तसा तो मेलेल्या उंटाला काय झालं ते पाहायला आला.

उंटाला पाहिलं आणि तो म्हणाला, 'हा मेला? याचे तर चारही पाय आहेत, पोट आहे, कान आहेत, शेपटीसुद्धा आहे!' शेखसाहेबांना मृत्यूबद्दल माहिती नव्हती हे स्पष्टच होतं.

सेवक त्यांना म्हणाला, 'हो, सगळं आहे खरं, पण त्याच्या आत असणारं जीवन संपलं.'

'म्हणजे आता हा उठून पुन्हा चालणारच नाही?' थोडंसं अविश्वासानं शेखनं विचारलं.

सेवक म्हणाला, 'मालक, आता हा पुन्हा कधीही चालणार नाही. याचे प्राण उडाले. आता यानंतर त्याचं शरीर सडेल... आणि मरण फक्त उंटालाच येतं असंही नव्हे. मरण सगळयांनाच येतं.'

शेखनं विचारलं, 'मलाही मरण येईल?'

सेवक म्हणाला, 'हो.'

धक्का फार मोठा होता. त्यातून शेख सावरू शकला नाही. त्यानं आपल्यासोबतचं सगळं सामानं माघारी पाठवलं. मातीचं एक मडकं फक्त स्वतःजवळ ठेवलं. त्याच मडक्यात तो स्वतःचं जेवण शिजवत असे आणि झोपताना ते मडकं तो डोक्याखाली उशीसारखं घेत असे.

एकदा एका कुत्र्याला त्या मडक्यात खाण्याचा वास आला आणि त्यानं त्यात तोंड घातलं. कुत्र्याचं तोंड मडक्यात अडकलं. काही केल्या बाहेर निघेना. बावचळलेला कुत्रा डोकं झटकत फिरू लागला आणि जवळच्या एका भिंतीवर मडक्यासह त्याचं डोकं आपटलं. मडक्यातून डोकं मुक्त झालं पण मडकं फुटलं.

वाजिद अलींच्या मनात आलं, 'चला, आता यातूनही सुटलो. सगळया गोष्टींचा त्याग केला पण या मडक्याचा मोह काही सुटत नव्हता. ज्या शरीराला शेवटी दफनच करायचं त्यासाठी मडक्याचा मोह तरी का बाळगा?'


# गुरुमहात्म्य

एकदा कौटिल्यांकडे एक तरुण आला. कौटिल्यांना तो म्हणाला, 'आपण महान अर्थशास्त्री आहात असं ऐकून मी आलो. कृपया मला श्रीमंत व्हायचं आहे. मला यासाठी काही धडे द्या.'

कौटिल्य त्याला म्हणाले, 'या जगात दोन प्रकारचे ज्ञान आहे– लौकिक आणि आध्यात्मिक. तुला ज्या प्रकारच्या ज्ञानाची गरज आहे त्या प्रकारचं ज्ञान मी तुला देईन. पण त्यासाठी तुला आधी एक परीक्षा द्यावी लागेल.' परीक्षा देण्यासाठी तो तरुण तयार झाला. कौटिल्य त्याला म्हणाले, 'आसपासच्या रेतीतून पांढरा आणि काळा असे दोन प्रकारचे गोटे निवड आणि तुझ्या झोळीत ठेव. माझा एक शिष्य न पाहाता तुझ्या झोळीतून एक गोटा निवडेल आणि त्यावरून तुला कशाप्रकारच्या ज्ञानदानाची गरज आहे ते मी ठरवेन. त्याने जर पांढरा गोटा काढला तर मी तुला धन-संपत्ती कमावण्याबद्दलचं ज्ञान देईन आणि जर त्याच्या हाती काळा गोटा लागला तर तुला मी आध्यात्मिक ज्ञान देईन.'

त्या तरुणानं लगेच खाली वाकून वाळूतून दोन गोटे निवडले आणि ते आपल्या झोळीत ठेवले. कौटिल्यांचं आणि त्यांच्या एका शिष्याचं त्या तरुणाकडे लक्ष होतं. त्यानं दोन्ही पांढरे गोटेच निवडले हे त्यांच्या लक्षात आलं. त्या तरुणाला धन कमवण्यातच रस आहे हे त्यांनी जाणलं. ज्या शिष्यानं त्या तरुणाने निवडलेले गोटे पाहिले होते त्याला कौटिल्यांनी बोलावलं आणि त्या तरुणाच्या झोळीतून एक गोटा काढून आणण्यास सांगितलं. शिष्यानं त्या तरुणाच्या झोळीत हात घातला आणि एक गोटा हातात घेऊन मूठ बंद केली आणि हात बाहेर काढला. मूठ बंद ठेवूनच तो गुरुंच्या दिशेनं निघाला. पण चालता चालता त्याला ठेच लागली आणि तो पडला. त्याची मूठ उघडली आणि त्यातील गोटा वाळूत अदृश्य झाला. आता तो पुन्हा शोधणं शक्य नव्हतं.

तो तरुण घाबरला. त्याला वाटलं आता आपलं बिंग फुटणार. पण कौटिल्य त्याला म्हणाले, 'घाबरू



नकोस. आपण तुझ्या पिशवीतला गोटा काढून पाहू आणि माझ्या शिष्यानं उचललेला दुसरा गोटा कोणत्या रंगाचा होता ते ठरवू.' त्या तरुणाच्या झोळीतून पांढऱ्या रंगाचा गोटा निघाला. कौटिल्य म्हणाले, 'याचा अर्थ माझ्या शिष्यानं काळया रंगाचा गोटा उचलला होता, म्हणजे तुला आध्यात्मिक ज्ञानाची गरज आहे. ठीक आहे, आजपासून तू माझा शिष्य झालास.' त्या तरुणाच्या डोळयांतून अश्रूच्या धारा वाहू लागल्या. धावत जाऊन त्यानं कौटिल्यांचे पाय धरले. आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल सांगितलं. माफी मागितली.

कौटिल्य त्याला म्हणाले, 'आपल्या शिष्याला खरोखर कोणत्या गोष्टीची गरज आहे ते सच्चा गुरु जाणतो.'

# स्वप्न, सत्य आणि न्याय

चोमा नावाचा एक लाकूडफोड्या होता. एकदा लाकडं तोडण्यासाठी जंगलात गेला असता एक भयभीत हरण अचानक त्याच्यासमोर आलं. ते इतकं भेदरलेलं होतं की त्याची शिकार करण्यासाठी चोमाला फार कष्ट पडले नाहीत. पण मग एक समस्या आली. लाकडांचा भारा आणि हरण एकदम नेणं चोमाला जमणार नव्हतं. थोडा वेळ विचार करून चोमानं ठरवलं की एरवीही हरणाकडे लक्ष द्यायला आपल्याकडे संध्याकाळपर्यंत वेळ नाही, तेव्हा - आधी आपण बाजारात नेऊन लाकडं विकू, मिळणाऱ्या पैशांतून खरेदी आटोपून, खरेदी केलेल्या वस्तू घरी ठेवू आणि मग सावकाश येऊन हरण घरी नेऊ. त्यानं मग पटपट एक खड्डा खोदला आणि त्यात हरण पुरलं. ठरल्याप्रमाणे सगळी कामं आटोपून तो जेव्हा पुन्हा जंगलात आला तेव्हा मात्र त्याला त्यानं पुरलेलं हरण मिळालं नाही.

बरीच शोधाशोध केल्यानंतर आपण शिकार खरंच केली होती का, असा संशय चोमाच्या मनात निर्माण झाला. थोड्या वेळानं संशय पक्का झाला आणि हरण मिळालं नाही तेव्हा तो घरी परतला. संध्याकाळच्या वेळी मित्र भेटले तेव्हा त्यानं त्या सगळयांसमोर आपल्याला झालेल्या भासाची गोष्ट सांगितली.


चोमाचा एक मित्र होता चानी. इतरांनी चोमानं सांगितलं ते खरं मानलं तरी चानीला मात्र चोमा जे सांगत होता ते पटलं नाही. त्याला वाटलं, चोमानं खरंच शिकार केली असावी आणि जमिनीत पुरलेलं हरण त्याला मिळालं नसावं.रात्री चानी जंगलात गेला आणि त्यानं थोडी शोधोध केल्यावर त्याला चोमानं पुरलेलं हरण मिळालं. घरी आणून त्यानं हरणाच्या मांसाचे तुकडे केले, त्याचं मांस आणि कातडं विकून चानीनं बक्कळ पैसा कमावला. चोमाला जेव्हा हे समजलं तेव्हा तो चानीच्या घरी आला आणि त्यानं त्याच्याकडे आपला पैसा मागितला. हरणाची शिकार आपण केलेली असल्यानं त्या पैशांवर आपला अधिकार असल्याचं त्याचं म्हणणं होतं. पण चानी त्याचं म्हणणं मान्य करायला तयार नव्हता. त्याचं म्हणणं की, चोमानं प्रत्यक्षात शिकार केलीच नाही, शिकारीचं त्यानं फक्त स्वप्न पाहिलं. म्हणून हरणापासून मिळालेल्या पैशांवर त्याचा काहीही अधिकार नाही. चोमानं गावच्या पंचायतीत तक्रार केली. पंचायत निवाडा करण्यासाठी बसली. दोन्ही बाजूंचं म्हणणं ऐकून घेतल्यानंतर पंचांनी न्याय दिला, "चोमानं शिकार केली पण आपण केलेल्या शिकारीला स्वप्न समजण्याची चूकही त्याच्याकडून झाली. हरणाच्या शिकारीचं स्वप्नच जर चोमानं पाहिलं होतं तर मग हरणाचं मांस आणि चामडं विकून मिळणाऱ्या पैशांत त्याचा वाटा नाही. सत्य आणि स्वप्न यात गफलत केली चोमानं. चानी हा चोमाचा मित्र. खरं तर त्यानं चोमाला त्याची चूक दाखवून देऊन हरण शोधण्यास मदत करावयास हवी होती, परंतु लोभापोटी त्यानं तसं न करता स्वतः हरण शोधून काढून ते परस्पर विकून पैसे गाठीला बांधले. ही चानीची चूक. अशारीतीने, दोघांचीही चूक असल्याकारणानं हरणामुळे मिळालेल्या पैशांवर आता दोघांचाही हक्क रहाणार नाही. चानीने ते धन आणून पंचांच्या सुपूर्द करावं." अशा रीतीनं चोमाच्या भाबडेपणामुळे आणि चानीच्या बेरकीपणामुळे त्या दोघांचंही नुकसान झालं.

# इंद्र-वृत्रासुर युद्ध

वारंवार होणाऱ्या युद्धांमुळे देव आणि दानव जेरीस आले होते. म्हणून त्यांनी आपसात एक तह केला. दोन्ही पक्षांनी ठरवलं की आता यापुढे युद्ध टाळायचं. त्यासाठी उपाय म्हणून सगळी शस्त्रास्त्रं दधीची ऋषींच्या आश्रमात ठेवायचं ठरलं. महर्षी दधीचींनी सगळ्या शस्त्रास्त्रांचं आपल्या तपोबलानं पाण्यात रूपांतर केलं आणि ते पाणी ते प्यायले. त्यामुळे त्यांची हाडे अतिशय बळकट आणि अभेद्य बनली. पण काही काळाने दानवांना स्वस्थ राहवेना. आधीच्या युद्धांमुळे आलेली क्षीणता भरून निघाली आणि त्यांनी पुन्हा देवांशी भांडण उकरून काढायचा प्रयत्न सुरू केला.

इंद्राकडून विश्वरूप असुराची हत्या घडली होती. याचंच असुरांनी मग निमित्त केलं. विश्वरूपाचा लहान भाऊ असलेल्या वृत्रासुराच्या नेतृत्वात त्यांनी पुन्हा स्वर्गावर आक्रमण करायचं ठरवलं. पुन्हा इंद्रासमोर युद्धाचं संकट उभं राहिलं.

स्वर्गाच्या रक्षणासाठी वृत्रासुराची हत्या करणं अपरिहार्यच झालं. पण ब्राह्मण होता म्हणून विश्वरूपाच्या हत्येमुळे इंद्राला शिक्षा भोगावी लागली होती. त्याच्या भावाची हत्या करून पुन्हा ब्रह्महत्येच्या पातकाची शिक्षा भोगायची त्याची तयारी नव्हती. आपली समस्या घेऊन इंद्र सल्ला मागण्यासाठी ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवानं इंद्राला समजावताना सांगितलं, "देवराज, हत्या करण्याच्या उद्देशानं जर कुणी आपल्यावर चाल करून आलं तर तो ब्राह्मण असला तरी आत्मरक्षणासाठी त्याची हत्या करणं हा दोष नव्हे. शिवाय आपण केवळ स्वतःचं रक्षण करण्यासाठी हे करत नसून ब्रह्मांडाच्या रक्षणासाठी हे युद्ध करणार आहात." ब्रह्मदेवानं समजावलं तेव्हा इंद्राला थोडं हायसं वाटलं. त्यानं मग दधीची ऋषींच्या हाडांनी बनलेल्या शस्त्रानं असुरांचा नाश केला.



या घटनेमुळे देवांना आणखी एक गोष्ट समजली - आपल्या सोयीनुसार निर्णय फिरवणाऱ्या धूर्त आणि कपटी लोकांवर कधीही विश्वास ठेवू नये.

# एकाग्रता

झेन गुरु बोकोजू आपल्या शिष्यांना ध्यानधारणा शिकविण्यासाठी जी पद्धत वापरीत असत ती लोकांना थोडी विचित्र वाटे.

एकदा एक राजपुत्र त्यांच्याकडे ध्यानधारणा शिकण्यासाठी आला. बोकोजूंनी त्याला एका उंच झाडावर चढायला सांगितलं. राजपुत्राचं सारं आयुष्य महालात गेलेलं. झाडावर वगैरे तो कधी चढला नव्हता. शिवाय गुरूने ज्या झाडावर चढायला सांगितले त्याची उंची पाहून तो घाबरला. बोकोजूंना तो म्हणाला, 'मला झाडावर चढता येत नाही. पडलो तर?' बोकोजू त्याला म्हणाले, 'झाडावर चढता येणाऱ्यांना झाडावरून पडताना मी काही वेळा पाहिलंय, पण झाडावर न चढता येणाऱ्यांना झाडावर चढण्याचा प्रयत्न करताना पडलेलं मी अजून पाहिलं नाहीय. तू चढ बिनधास्त.' चढावंच लागेल हे लक्षात आल्यावर राजपुत्र झाडावर चढू लागला. शे-सव्वाशे फूट उंचीचं झाड होतं ते. गुरुजींनी त्याला पार शेंड्यापर्यंत चढायला सांगितलं होतं.

अतिशय सावधपणे तो हळू हळू चढू लागला. त्याला वाटलं होतं की आपल्याला चढताना गुरू मार्गदर्शन करतील. असं कर, तसं करू नको असं सांगत राहातील. पण अधून-मधून जेव्हा त्याची नजर खाली जमिनीवर जाई तेव्हा गुरुचं आपल्याकडे लक्षच नाही हे त्याला जाणवे. शेवटी एकदाचा तो शेंड्यापर्यंत पोहोचला.

मग पुन्हा खाली उतरू लागला. गुरु अजूनही डोळे मिटूनच बसले होते. राजपुत्र जमिनीपासून साधारण पंचवीसेक फुटांवर आला तेव्हा गुरुंनी त्याला सूचना केली, 'जपून उतर रे!' राजपुत्र खाली उतरला आणि गुरुजींना त्यानं आपली शंका विचारली.

बोकोजू त्याला म्हणाले, 'तू जेव्हा बिनधास्त होताना दिसलास तेव्हाच मी तुला सावध केलं. जमीन आता जवळ आली असं जेव्हा तुला वाटलं तेव्हाच तुझा तोल जाण्याची शक्यता वाढली होती. झाडाच्या शेंड्याजवळ असताना तू स्वतःच अतिशय सावध होतास. त्यावेळी तुला माझी गरज नव्हती. जमीन जवळ येऊ लागली तेव्हा तुझी एकाग्रता थोडी ढळू लागली. त्यावेळीच तुझ्याकडून चूक होण्याची शक्यता होती. म्हणून मी तुला सावध केलं.'

राजपुत्राला आठवलं, बोकोजूंचं म्हणणं अगदी बरोबर होतं. झाडावर चढताना, शेंड्याजवळ पोहोचताना आणि उतरावयास सुरवात करताना तो अतिशय सावध होता. जमीन जवळ दिसू लागली आणि त्याचा जीव थोडा फुशारला. आता आपली जीत पक्की असं त्याच्या मनाला वाटलं. उतरल्यानंतर गुरुंना काय काय विचारायचं याबद्दलचे विचार त्याच्या मनात येऊ लागले होते आणि झाडावरून उतरण्याच्या क्रियेकडे त्याचं क्षणकाल दुर्लक्ष होऊ लागलं होतं. त्याच वेळी गुरुजींचा आवाज त्याच्या कानांवर आला आणि इकडे-तिकडे भरकटणारं त्याचं मन पुन्हा कामावर केंद्रीत झालं होतं. हे उमजलं अन गुरुजींबद्दल त्याच्या मनातले सारे प्रश्न विरघळून गेले.

# राजा भर्तृहरी


उज्जैनच्या राजा विक्रमादित्याचे सावत्र वडील बंधू राजा भर्तृहरी कवी होते.. श्रृंगार शतक, वैराग्य शतक आणि नीती शतक हे त्यांनी लिहीलेले तीन काव्यग्रंथ. त्यांच्या जीवनाचा पहिला भाग अक्षरशः सर्व प्रकारच्या सुखांचा भोग घेण्यात गेला. भोगाची त्यांनी अती गाठली होती.

पण अचानक त्यांच्या जीवनाची गाडी वैराग्याच्या वळणार वळली. घोर वैराग्य त्यांनी पत्करलं. त्यामुळे भोग आणि वैराग्याचं उदाहरण देताना हटकून त्यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. तर अशा या भोगात लिप्त असणाऱ्या राजाला अचानक विरक्ती कशी झाली याबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते.

राजा भर्तृहरींचा विवाह राजकुमारी पिंगलेशी झाला. नवविवाहितेच्या प्रेमात राजे आकंठ बुडाले. त्यादरम्यान दरबारात एका ब्राह्मणानं राजाला आशिर्वादस्वरूप एक फळ दिलं. ते फळ खाणारी व्यक्ती दीर्घायुषी होणार होती. राजा भर्तृहरींचं आपल्या पत्नीवर जीवापाड प्रेम होतं. त्यामुळे त्यांनी ते फळ स्वतः खाण्याऐवजी पत्नीला दिलं. पण पिंगलेचं प्रेम राजाच्या सारथ्यावर होतं. म्हणून मग, त्याच्या दीर्घायुष्याची कामना मनी बाळगून तिनं ते फळ सारथ्याला दिलं.

सारथ्याचं एका वेश्येवर प्रेम होतं. दीर्घायुष्य देणारं ते फळ सारथ्यानं त्या वेश्येला दिलं. वेश्या चरित्रवान होती. तिनं विचार केला, माझं आयुष्य वाढून काय होणार? दीर्घायुष्य खरं तर राजाला लाभायला हवं. तोच प्रजेचं पालन करतो, देशाचं रक्षण करतो. ती ते फळ घेऊन दरबारात हजर झाली. फळाच्या गुणाचं वर्णन करून तिनं ते फळ राजाला अर्पण केलं.

राजे मात्र थक्क झाले. त्यांनी ते फळ आपल्या प्रिय राणीला, पिंगलेला दिलं होतं ना! विचारपूस झाली, उलटतपासण्या झाल्या आणि खरं काय ते सगळ्यांसमोर उघड झालं. भर्तृहरीना जीवनाच्या एकूण व्यर्थतेचा साक्षात्कार झाला. आतापर्यंत ज्या ऐशआरामात, ज्या सुखोपभोगात ते लोळत होते त्याची निरर्थकता त्यांना जाणवली. नात्यांचा फोलपणाची त्यांना ओळख पटली राजा भर्तृहरीनं मग संन्यास घेतला आणि ते तडक वनात निघून गेले. घोर श्रृंगारी राजा भर्तृहरी घोर वैरागी बनला.




# ब्रह्मज्ञानाची परीक्षा

एकदा आदि शंकराचार्य गंगानदीत स्नानासाठी निघाले होते. रस्त्यात एक चांडाळ (डोंब) आपल्या चार कुत्र्यांना घेऊन रस्ता अडवून बसला होता. त्याला पहाताच शंकराचार्यांनी जरबेनं म्हटलं, 'दूर हो! दूर हो!'

पण त्यांच्या या बोलण्याचा त्या डोंबावर काहीही परिणाम झाला नाही. तो शंकराचार्यांना म्हणाला, 'हे महात्मा! वेदांतामधून आपण ब्रह्म आणि जीव एकच असं प्रतिपादन करता. एकीकडे आपण सांगता की ब्रह्म एक आहे आणि ते सत्, चित्, आनंद, दोषविरहित, असंग, अखंड, आकाशासारखं व्यापक आहे आणि दुसरीकडे त्याच अद्वैत ब्रह्मामध्ये आपण भेदाचीही कल्पना करता. 'मी पवित्र ब्राह्मण आहे, तू डोम आहेस, म्हणून माझ्या मार्गातून दूर हो असा आग्रह आपण का करता?' मला सांगा, माझ्या भौतिक शरीरानं आपल्या भौतिक शरीराच्या मार्गातून दूर व्हायचं की या शरीरामध्ये असणाऱ्या चेतनेनं आपल्या चेतनेच्या मार्गातून बाजूला व्हायचं? सर्व शरीरांना व्यापून असणाऱ्या ब्रह्माची आपण अवहेलना करताहात, महात्मन्!' डोंबाच्या बोलण्यानं शंकराचार्यांना जणू जाग आली. आपल्या हातून घडत असलेली चूक त्यांच्या लक्षात आली. डोंबाला ते म्हणाले की, आपण आत्मज्ञानी आहात. आपण जे म्हणताय ते पूर्णपणे सत्य आहे.

शंकराचार्यांनी डोंबाच्या स्तुतीदाखल जे पाच श्लोक म्हटले ते 'मनीषा पंचक' नावानं प्रसिद्ध आहेत. मनीषा पंचकात शंकराचार्यांनी जे सांगितलं त्याचा सारांश असा, - मी ब्रह्म आहे आणि संपूर्ण जगही ब्रह्मरूप आहे असं दृढपणे मानणारे - मग ते डोम असोत वा ब्राह्मण, ते माझे गुरू होत.



---

'मनीषा पंचक' बद्दल अधिक माहिती पुढील लिंक वर मिळेल –

http://www.bhagavadgitausa.com/HYMNS%20OF%20SANKARA.htm

यू-ट्यूबवर या प्रसंगाचा वीडियो पाहाण्यासाठी पुढील लिंक वापरा-

http://www.youtube.com/watch?v=Ewta7YJCmyw

# सहानुभूती

एका दुकानदारानं आपल्या दुकानाच्या दारावर पाटी लावली, 'कुत्र्याची पिल्ले विकणे आहेत.'

थोड्या वेळानं एका छोट्या मुलानं काउंटरपलीकडून त्यांना विचारलं, 'पिल्लाची किंमत किती आहे?' '400 रुपए,' दुकानदार त्याला म्हणाला. मग त्यानं त्या मुलाला विचारलं, 'तुला खरेदी करायचंय का एखादं पिल्लू?'

मुलगा थोड़ा विचारात पडलेला दिसला. मग त्यानं आपल्या खिशात हात घालून पैसे बाहेर काढले. काही रुपये आणि काही सुटी नाणी. 400 रुपए नव्हते त्याच्याजवळ. क्षणभर झाकोळलेला त्याचा चेहरा पुन्हा चमकला., त्यानं दुकानदाराला विचारलं, 'एवढ्या पैशात मी पिल्लं एकदा पाहू शकतो का?'

'जरूर!' दुकानदारानं मोलकरणीला हाक मारली आणि त्या मुलाला पिल्लं दाखव असं तिला सांगितलं. पिल्लं तिथेच एका बॉक्समध्ये ठेवलेली होती. मोलकरणीनं तिच्याजवळ असलेली शिट्टी वाजवली आणि लगेच पाच-सहा गोंडस पिल्लं धडपडत बॉक्सबाहेर पडली आणि लुडबुडत धावू लागली. एक पिल्लू मात्र सगळयांच्या शेवटी हळू हळू चालत निघालं. मुलानं लक्ष देऊन पाहिलं तेव्हा ते लंगडे आहे हे त्याच्या ध्यानात आलं. मुलानं दुकानदाराला त्या पिल्लाबद्दल विचारलं. दुकानदार म्हणाला, 'आम्ही त्याला डॉक्टरांकडेही नेलं होतं, पण ते म्हणाले की या पिल्लाच्या एका पायात जन्मजात काहीतरी उणीव आहे. बहुधा तो जन्मभर बरा होणार नाही. लंगडाच राहील.'


'मी हे पिल्लू खरेदी करू शकतो का?' त्या मुलानं विचारलं. दुकानदाराची उत्सुकताही चाळवली गेली. तो मुलाला समजावत म्हणाला, 'पोरा, हे पिल्लू तुझ्या कामाचं नाही. ते तुझ्याबरोबर पळू शकणार नाही, खेळू शकणार नाही, उड्या मारू शकणार



नाही.... तरीही तुला जर हेच पिल्लू हवं असेल तर मी ते तुला मोफत दिलं. घेऊन जा तू त्याला.'

तो मुलगा म्हणाला, 'नको, असं नको. मी याला घेऊन जाईन पण इतर पिल्लांसाठी तुम्ही जेव्हढी किंमत ठेवलीत तेव्हढ्याच किंमतीला मी हे घेईन. आत्ता माझ्याजवळ पैसे नाहीत, पण घरी जाऊन वडिलांकडून घेऊन मी आपणास पैसे आणून देईन.'

दुकानदाराला आश्चर्य वाटलं. त्यानं मुलाला विचारलं,'खरंच का तुला हे पिल्लू विकत घ्यायचंय?' मुलानं थोडं मागे सरकून आपला पायजामा एका पायावरून थोडा वर उचलून धरला. दुकानदाराला तो म्हणाला, 'पाहिलंत? ' त्या मुलाचा पाय पार वाकडा मुरगळलेला होता. स्टीलच्या पट्ट्याच्या आधारे तो कसाबसा उभा होता. गोड हसत मुलगा दुकानदाराला म्हणाला, 'मलासुद्धा धावता येत नाही काका. या पिल्लाला कधी वाटलं की आपल्याला समजून घेणारं कुणी असायला हवं, तर मी त्याच्यासोबत असेन ना!'



# बिन बुडाचं भांडं

एक शिष्य एकदा एका योग्याला भेटायला आला. त्यानं मागणी केली, 'मोक्ष मिळावा अशी इच्छा घेऊन खूप दूरवरून मी आपल्यापाशी आलोय. मला मार्गदर्शन करा.'

योग्यानं त्याला विचारलं, 'श्रद्धा आहे का मनात? कारण श्रद्धा नसेल तर सत्य तुला पेलवणार नाही.'

शिष्य तरुण होता. त्यानं म्हटलं, 'श्रद्धेनं परिपूर्ण मन घेऊन मी आपल्यापाशी आलोय. आपण जे सांगाल ते मी स्वीकारेन.'

योग्यानं म्हटलं, 'ठीक आहे. आत्ता मी विहिरीवरून पाणी भरून आणायला निघालोय. चल माझ्या मागनं. मी जे काही करेन त्याचं निरीक्षण कर. प्रश्न विचारायचा नाही. श्रद्धा ठेवायची मनात आणि फक्त पाहायचं.'

तरुणाला वाटलं, 'यात काय अवघड आहे? हे तर आपण सहज करू.' तो त्या योग्यामागे निघाला.

विहिरीजवळ पोहोचल्यावर योग्यानं एक घागर विहीरीच्या काठावर ठेवली. तरुणाला थोडं आश्चर्य वाटलं कारण त्या घागरीला बूड नव्हतं. दुसऱ्या घागरीच्या गळयात दोर बांधून योग्यानं ती घागर विहिरीत लोटली. पाण्यानं भरलेली घागर शेंदून वर घेतली आणि त्यातील पाणी बिनबुडाच्या घागरीत ओतलं. सगळं पाणी लागलीच वाहून गेलं. पण योग्यानं तिकडे लक्ष दिलं नाही. त्यानं पुन्हा घागर विहिरीत सोडली, पाणी उपसलं आणि बिनबुडाच्या घागरीत भरलेली घागर रिकामी केली, पाणी पुन्हा वाहून गेलं. असं एकदा घडलं, दोनदा घडलं, तीनदा घडलं....तो तरुण हळूहळू अस्वस्थ होऊ लागला. त्याला वाटलं, ' हा माणूस वेडा आहे का? पाणी सगळं वाहून जातंय तिकडे याचं लक्षच नाही. हा आपला घागरींवर घागरी ओततोय त्या बिनबुडाच्या घागरीत. कशी भरणार ती घागर? आणि कधी?'

चौथ्यांदा योग्यानं घागर रिकामी केली, पाणी वाहून गेलं तेव्हा आपल्याला गप्प राहायचंय हे तो तरुण विसरला. त्यानं योग्याला विचारलं, 'अशा रीतीनं जन्मभर पाणी ओतत राहिल्यानंतरही हे पात्र कधी नाही भरणार. या घागरीला तर तळच नाहीय.'

योगी म्हणाला, 'बस्स! तुझा माझा संबंध संपला. मी तुला आधीच बजावलं होतं, मनात श्रद्धा ठेव. फक्त पाहा. काहीही बोलू नकोस. अरे, बुडाशी आपल्याला काय प्रयोजन? आपल्याला फक्त ही घागर भरायची होती. पाणी कधी वर येईल याकडे माझं लक्ष होतंच.'

'आपण जे करताय ते मला उलगडत नाहीय....' तो तरुण म्हणाला.

योगी त्याला म्हणाला, '.....जा तू आता. पुन्हा इकडे परतू नकोस. पहिल्याच परीक्षेत नापास झालास. पुढे याहून मोठमोठ्या परीक्षा व्हायच्या होत्या.' तो तरुण माघारी परतला. ......पण त्याला चैन पडेना. चैन पडेना, झोप येईना, भूक लागेना....

त्याच्या मनात आलं, 'बिनबुडाच्या घागरीत पाणी भरणं शक्य नाही ही कुणाही सोम्या-गोम्याच्या लक्षात येईल अशी गोष्ट. या माणसाला वेगळंच काहीतरी समजावायचं असणार. मी गप्प रहायला हवं होतं. किती वेळ असं चाललं असतं? मी घाई केली विचारायची. चुकलंच माझं.' दुसऱ्या दिवशी तो तरुण पुन्हा त्या योग्याकडे परतला. पाय धरून त्यानं योग्याकडे क्षमा मागितली. योगी त्याला म्हणाला, 'हा विचार करण्यात तू जेव्हढा शहाणपणा दाखवला तेव्हढा जीवनातही दाखवला असतास तर तुला माझ्याकडे यावंच लागलं नसतं. मला तुला एव्हढंच सांगायचं होतं. बूड नसलेलं पात्र भरता येत नाही. आजपर्यंत या शरीर रूपी पात्रात तू इच्छा-वासनांची भर घालत राहिलास. कधी हे पात्र भरलं का? इच्छा-वासनांनी आपण जे भरायचा प्रयत्न करतोय ते शरीराचं पात्र बिनबुडाचं आहे, असा विचार कधी तुझ्या मनात आला का?' योगी जे बोलला ते ऐकून त्या तरुणाचे डोळे उघडले. श्रद्धेनं तो गुरुचरणी लीन झाला.



# छोटीशी चूक

दुर्वास ऋषी अतिशय कोपिष्ट. एकदा ते श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या महालात गेले. श्रीकृष्ण-रुक्मिणीनं त्यांचा खूप आदर-सत्कार केला. दुर्वासांसारख्या शीघ्रकोपी ऋषींचं मन जिंकून घेणं अतिशय कठिण. पण श्रीकृष्ण-रुक्मिणीनं घरी आलेल्या अतिथीच्या आदरसत्कारात यत्किंचितही उणीव येऊ दिली नाही.

एकदा संध्याकाळच्या वेळी दुर्वासा श्रीकृष्णाच्या रथात बसले. त्यांची फेरफटका मारण्याची इच्छा श्रीकृष्णानं ओळखली. श्रीकृष्ण सारथ्याला रथ हाकण्याचा इशारा करणार तेवढ्यात दुर्वास ऋषी म्हणाले की, रथ तू आणि रुक्मिणी दोघांनी मिळून खेचायचा.

श्रीकृष्ण-रुक्मिणीनं मग घोड्यांची जागा घेतली. त्या दोघांच्या सेवेनं दुर्वास मुनी प्रसन्न झाले. त्यांनी श्रीकृष्णाला एक प्रकारचा लेप दिला आणि सांगितलं की, हा पायस लेप आहे. हा लेप शरीराच्या ज्या भागावर लावशील त्या भागावर अस्त्र-शस्त्रांचा परिणाम होणार नाही.

श्रीकृष्णानं आपल्या संपूर्ण शरीरावर तो लेप लावला पण पायांच्या तळव्यांवर लेप लावणं विसरला. शिवपुराणात उल्लेख आहे की यामुळेच श्रीकृष्णाचे तळवे कमजोर राहिले. म्हणूनच जरा व्याधाचे बाण त्यांना भेदू शकले. आणि यादवकुळाचा नाश झाला.

बाण लागला त्यावेळी श्रीकृष्ण एका झाडाखाली पहुडले होते. एका पायाच्या उभ्या केलेल्या गुडघ्यावर त्यांनी दुसऱ्या पायाचं पाऊल टेकवलं होतं. रात्र झाली तशी त्यांच्या तळव्यावरील पद्म लकाकू लागलं.

त्यावेळी जरा व्याध शिकार करण्यासाठी निघाला होता. श्रीकृष्णाच्या पावलावरील चमकतं पद्म त्याला हरिणाच्या लुकलुकणाऱ्या डोळयांसारखं वाटलं आणि त्यानं नेम धरून बाण सोडला. याच बाणानं श्रीकृष्णाची इहलीला समाप्त झाली.

# इतरांचंही भलं चिंता

नारद ब्रह्मचारी आहेत हे खरं, पण एकदा श्रीमतीवर त्यांची नजर गेली आणि ते मनोमन तिच्यावर फिदा झाले. श्रीमतीबरोबर आपला विवाह घडावा अशी इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली.

योगायोग असा की, तुंबरूंचीही नजर श्रीमतीवर पडली आणि श्रीमतीशी आपला विवाह व्हावा असं नारदांसारखंच त्यांनाही वाटू लागलं. एकमेकांच्या इच्छांबद्दल जेव्हा त्या दोघांना समजलं तेव्हा त्यांच्या मनात परस्परांबद्दल ईर्ष्या निर्माण झाली. दुसऱ्यावर मात करून आपली इच्छा पूर्ण करण्याचा दोघांनी निश्चयच केला. दोघेही विष्णूचे भक्त होते. दुसऱ्याला मात देण्यासाठी विष्णूची मदत घेण्याचा दोघांनी निर्णय घेतला. नारदांनी विष्णूकडे मदत मागितली, 'स्वयंवराच्या वेळी श्रीमतीला तुंबरूचा चेहरा अस्वलासारखा दिसो.' तुंबरूंनी विष्णूला म्हटलं, 'स्वयंवराच्या वेळी श्रीमतीला नारदाचा चेहरा माकडासारखा दिसो.' नेहमीसारखं विष्णूंनी 'तथास्तु!' म्हटलं.

त्यांना खूप गंमत वाटत होती. स्वयंवराच्या वेळी काय घडते हे पाहाण्यासाठी ते स्वतःही उपस्थित राहिले. स्वयंवराच्या वेळी हातात वरमाला घेऊन श्रीमती आली तेव्हा इच्छुक वरांच्या रांगेत अगदी शेवटी उभे असलेल्या नारद-तुंबरूंवर तिची नजर गेली. दुरून दोघेही अगदी उत्तम शरीरयष्टीचे वाटत होते. पण ती जेव्हा इतर इच्छुक वरांना ओलांडून त्यांच्याजवळ पोहोचली तेव्हा त्यांच्यापैकी एकाचं डोकं अस्वलाचं आणि दुसऱ्याचं डोकं माकडाचं असलेलं पाहून ती चपापली.

तेवढ्यात तिची नजर विष्णूवर गेली. माणसाचा चेहरा पाहून तिला हायसं वाटलं आणि तिने विष्णूच्या गळयात वरमाला घातली. नंतर जे झालं त्यानुसार, स्वयंवराच्या वेळी जे घडलं होतं त्यामुळे नारद खुश होते कारण श्रीमतीने तुंबरूच्या गळयात वरमाला गातलेली नव्हती आणि तुंबरू खुश होते कारण श्रीमतीने नारदाच्या गळयात वरमाला घातेली न्हती. नारदांना श्रीमती मिळाली नाही म्हणून तुंबरू खुश होते तर तुंबरूचा श्रीमतीने स्वाकर नाही केला म्हणून नारद खुश होते.




असंच होतं, इतरांचं भलं न होवो अशी इच्छा बाळगणाऱ्यांना बहुतेक वेळा स्वतःलाच नुकसान सहन करावं लागतं.

# ईश्वराला ओळखणं कठीण आहे

प्रसिद्ध रशियन साहित्यिक दोस्तोवस्की यांची एक कथा आहे. कथेत ते म्हणतात की, येशूला मृत्यूनंतर तब्बल अठराशे वर्षांनंतर एकदा वाटलं की आपण जगात योग्य वेळी गेलो नव्हतो. वेळ योग्य नव्हती त्यामुळे लोक आपलं म्हणणं समजू शकले नाहीत आणि म्हणूनच आपल्याला सुळावर चढविण्यात आलं. आता प्रत्येक गावात चर्च बांधली गेलीत. तिथं सकाळ-संध्याकाळ आपलं स्मरण केलं जातं, आपल्या नावानं अगरबत्या, मेणबत्या लावल्या जातात. ही आपल्या आविर्भावासाठी योग्य वेळ आहे. त्यांना वाटलं, आता जावं, लोक आपल्याला नक्की ओळखतील, आपल्या उपदेशाचं मर्म त्यांना कळेल. त्यानुसार एके रविवारी, सकाळी येशू आपल्या जन्मगावी बॅथलहॅममध्ये अवतरले. ती रविवारची सकाळ होती. नुकतीच प्रार्थना आटोपून लोक चर्चमधून बाहेर पडत होते.

येशूला वाटलं, आता आपल्याला आपला परिचय देण्याचीही गरज पडणार नाही. घरां-घरांत आपल्या तसबिरी लावलेल्या आहेत. येशूंना आठवलं, आधी ते जेव्हा या जगात आले होते तेव्हा त्यांनी, 'मी ईश्वराचा पुत्र आहे आणि आपल्यासाठी जीवनाचा संदेश घेऊन आलो आहे. माझा संदेश जाणून घेणाऱ्यांचा उद्धार होईल,' असं लोकांना आग्रहानं ठासून ठासून सांगितलं होतं. पण त्यावेळी त्यांना सुळी देण्यात आलं.'आता मात्र ते आपल्याला नक्की ओळखतील,' असं येशूला वाटलं.पण लोक त्यांना पाहून हसू लागले. लोकांना वाटलं, आहे कुणी माथेफिरू. येशूचा वेश धारण करून उभा आहे चर्चच्या दारात.


शेवटी येशूला सांगावंच लागलं की, बाबांनो, ज्याची पूजा करून तुम्ही चर्चमधून बाहेर पडताहात तो मीच. पण लोक त्यांचं म्हणणं ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. हसत हसतच ते येशूंना म्हणाले, 'पादरी यायच्या आत इथून निघून जा नाहीतर तुझी काही धडगत नाही.' येशूंनी सांगण्याचा प्रयत्न केला, 'आधी मी यहूद्यांच्या गर्दीत होतो त्यामुळे मला समजण्यात तुमची चूक झाली होती. आता मी केवळ आपल्याच लोकांत आहे. तरीही




आपल्याला माझी ओळख लागत नाही का?' तेवढ्यात चर्चचा पादरी तेथे आला. येशूला पाहून हसणारे लोक पादरींना वाकून नमस्कार करू लागले.

पादरी मला नक्की ओळखेल असं येशूला वाटलं. पण झालं भलतंच. पादरीने येशूला पकडून नेलं आणि चर्चमधील एका खोलीत कोंडून ठेवलं. मध्यरात्री तोच पादरी हातात कंदिल घेऊन येत असल्याचं येशूला दिसलं.

आल्या आल्या त्यानं येशूच्या पावलांवर डोकं टेकलं. म्हणाला, 'मी लागलीच आपल्याला ओळखलं होतं. पण आपण जातीचे अराजक आहात हे सुद्धा माझ्या लक्षात होतं. आपण पुन्हा सत्य सांगायचा प्रयत्न कराल आणि सगळी घडी विस्कटून टाकाल हे मला माहीत होतं. खरं तर आता आपली काहीही गरज नाहीय इथे. आणि तरीही आपल्याला जर काही करायचं-सांगायचं असेल तर आमच्याकरवी करवा. माणसं आणि आपण यामधील दुवा आहोत आम्ही.... आणि हो, काही गडबड वगैरे करायचा विचार असेल तर मात्र... अठराशे वर्षांपूर्वी जे इतर पादरींनी केलं होतं तेच आम्हालाही करावं लागेल. आपल्या मूर्तीची पूजा आम्ही करू शकतो, पण खुद्द आपली उपस्थिती घातकच ठरेल हे आम्ही जाणतो.'




# दीर्घायुष्याचं रहस्य

भारतरत्न ही पदवी मिळविणारे प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ मोक्षगुंडम विश्वैश्वरैय्या यांना 100 वर्षांहून अधिक काळाचं आयुष्य लाभलं. शेवटपर्यंत ते अतिशय सक्रीय  जीवन जगले. त्यांना कुणी त्यांच्या दीर्घायुष्याचं रहस्य विचारलं की ते हसत हसत म्हणायचे, "मृत्यू माझ्या शरीराचं दार जेव्हा ठोठावतो तेव्हा -'मी आत नाही'- असं मी त्याला आतून उत्तर देतो. निराश होऊन मृत्यू उलटपावली परत जातो."

एके दिवशी त्यांच्या एका मित्रानं त्यांना निरंतर तरुण, उत्साही आणि सक्रीय रहाण्यामागील रहस्य काय असं विचारलं तेव्हा ते त्याला म्हणाले,'अरे, म्हातारपण शरीराचं नसतं, मनाचं असतं. मनानं आपण जोवर तरुण राहू तोवर आपलं शरीर मनाच्या भावनिक तारुण्याची साथ देत रहातं. यौवन असो वा म्हातारपण या पूर्णपणे मानसिक अवस्था आहेत.' काही अंशी त्यांचं म्हणणं बरोबर होतं. अर्थात्, त्यांच्या उत्तम तब्बेतीला कारणीभूत ठरणाऱ्या इतरही काही गोष्टी होत्या.

डॉ विश्वेश्वरैय्या यांनी आपल्या दीर्घ जीवनात कधीही धूम्रपान केलं नाही आणि कधीही मांस किंवा मदिरेचं सेवन केलं नाही. स्वीडनमध्ये असताना ते एकदा आजारी पडले. थंडीपासून बचाव व्हावा म्हणून डॉक्टरांनी त्यांना काही थेंब ब्रँडी घेण्यास सांगितलं. यावर ते डॉक्टरांना म्हणाले, 'ब्रँडीच्या थेंबांनीच इलाज होणार असेल तर मग जाऊ द्या.'



भारतात परतल्यानंतर म्हैसूर सरकारनं त्यांना भोजनाचं आमंत्रण दिलं. ते परदेशवारी करून परतले होते, त्यामुळं मदिरापान आणि सामिष भोजन  ते करत असावेत असं या भोजनाचा बेत आखताना गृहित धरण्यात आलं होतं. त्यांनी जेव्हा नम्रपणानं नकार दिला तेव्हा त्यांचं  आतिथ्य करणाऱ्या मंत्र्यांनी त्यांना विचारलं, 'आपण निदान सिगारेट तरी पीत असालच.' यावर हसत ते म्हणाले, नाही, मी अजून एवढा सुसंस्कृत झालेलो नाही.'

# डोळे आणि भ्रम

खलील जिब्रान यांची एक छोटी कथा आहे.

कथेचं नाव आहे - डोळे.

कथा अशी-

एकदा डोळे म्हणाले, 'या समोरच्या दरीपलीकडे एक डोंगर आहे. किती सुंदर दिसतोय तो. पाहा तर, आत्ता त्याला चारही बाजूंनी दाट धुक्यानं वेढलंय. पण एकूण दृश्य फारच सुरेख दिसतंय.' डोळयांचं बोलणं ऐकून कान म्हणाले, 'डोंगर? कुठे आहे डोंगर? मला कोणताही डोंगर ऐकू येत नाहीए!' कानांचं म्हणणं ऐकून हात म्हणाले, 'हो रे कानूटल्यांनो. डोळोबांचं बोलणं ऐकलं आणि मी डोंगराला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला, पण मला  डोंगर जाणवत नाहीय. डोंगर असेल असं मला तरी वाटत नाही!' यावर नाक म्हणालं, 'बरोबर बोललात हातभाऊ. डोंगर कुठेही नाहीय. असता तर मला त्याचा वास नसता का आला?'

या सगळयांचं बोलणं ऐकून डोळे उदास झाले. त्यांनी डोंगरावरून नजर वळवून बाजूला नेली.

आता त्यांच्यालेखीही डोंगर दृष्टीआडची सृष्टी झाले. डोळयांनी नजर वळवली आणि लगेच इतरांची आपापसात कुजबूज सुरू झाली - डोळयांना बहुतेक भ्रम झालाय. डोळयांमध्ये काहीतरी बिघाड झालाय राव. घोटाळा आहे.

# मन लावून काम करावं

प्रसिद्ध ग्रीक गणितज्ञ पायथॅगोरस यांच्या बालपणाबद्दलची एक गोष्ट सांगतात. त्यांचं बालपण अतिशय गरीबीत गेलं. ते अनाथ होते. पोट भरण्यासाठी त्यांना जंगलात जाऊन लाकडं गोळा करून आणून ती विकावी लागायची. याच मिळकतीवर त्यांचा उदरनिर्वाह चाले. एकदा दिवसभर जंगलात लाकडं गोळा करून आणल्यानंतर ती विकण्यासाठी लागलेल्या रांगेत ते आपली पाळी येण्याची वाट पाहात उभे होते.

लाकडं खरेदी करण्यासाठी आलेले प्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञानी डेमॉक्रेटीस यांचं या अनाथ मुलाकडे लक्ष गेलं. त्यानं अतिशय नेटकेपणानं लाकडाची मोळी बांधली होती. खरं तर त्या मोळीच्या नेटकेपणानंच त्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. पायथॅगोरससमोर येऊन उभे रहात डेमॉक्रेटीस यांनी विचारलं, 'ही मोळी उलगडून तू पुन्हा अशीच बांधून दाखवशील का?'

'हो, दाखवतो,' पायथॅगोरस म्हणाला, 'मी स्वतः ही मोळी बांधलीय. पुन्हा एकदा नक्की बांधू शकतो.' त्यानं मोळी उलगडून लाकडं वेगळी वेगळी पसरवली आणि पुन्हा अतिशय तन्मयतेनं एक एक लाकूड रचत मोळी बांधली. खाली सगळयात जाड लाकडं, त्यापेक्षा थोडी बारीक असलेली त्यानंतर, अधिक बारीक लाकडं वर या क्रमानं त्यानं मोळी रचली. आपलं काम तो अतिशय मन लावून करत होता. काम करतानाचा त्याचा तल्लीनपणा पाहून डेमॉक्रेटीसनी त्याला विचारलं, 'शिक्षण घ्यायची इच्छा आहे का? शिकशील तू?' त्या छोट्या मुलानं - पायथॅगोरसनं म्हटलं, 'हो, शिकेन मी.' तो अनाथ मुलगा मग डेमॉक्रेटीससोबत निघाला. मन लावून, मेहनतीनं त्यानं शिक्षण घेतलं. पुढे हाच गरीब, अनाथ मुलगा प्रसिद्ध गणितज्ञ पायथॅगोरस बनला.

# महामूर्ख कोण?

एकदा एक धोबी जंगलातून चालला होता. त्याच्यासोबत त्याचं गाढवही होतं. आपल्या गाढवावर त्या धोब्याचं खूप प्रेम होतं. दहा रुपये मोजून गावच्या बाजारातून त्यानं एक लखलखतं लॉकेट खरेदी करून ते त्या गाढवाच्या गळयात बांधलं होतं.

त्या दिवशी धोबी आणि गाढव जंगलातून चालले असता एका मुशाफिराची नजर गाढवाच्या गळयात बांधलेल्या लॉकेटवर पडली. त्यानं धोब्याला थांबवलं. धोब्याला वाटलं, आता हा माझं गाढव मागणार. धोबी त्या मुशाफिराला म्हणाला, 'हे पहा, या गाढवावर माझं खूप प्रेम आहे. तुमच्याकडे सामानाचं ओझं बरंच आहे असं दिसतंय, पण काहीही झालं तरी मी हे गाढव विकणार नाही. त्याच्याशिवाय माझा कामधंदा चालणार नाही.'

धोब्याचं बोलणं ऐकून मुशाफिराला हसू आलं. तो मुशाफिर एक निष्णात जवाहिऱ्या होता - लोभी, कंजूस आणि लबाड. त्याला गाढव नको होतं- त्या गाढवाच्या गळयातील लॉकेटमधला मणी हवा होता. त्या मण्याची किंमत त्याला ठाऊक होती. धोब्याची खुशामत करत तो म्हणाला, 'नाही नाही, गैरसमज करून घेऊ नका. मला तुमचं गाढव नकोय. त्याच्या गळयात तुम्ही जे हे लॉकेट बांधलंय ना, त्यावर मी फिदा आहे. किती सुंदर मणी आहे यात. तो मणी मला हवाय. तुम्ही तो मणी मला विकाल का?' धोबी फुशारला आणि त्यानं त्या मण्याची किंमत शंभर रुपये सांगितली. धोब्याला संशय येऊ नये म्हणून मग मुशाफिर भावात घासाघीस करू लागला. त्यानं त्या मण्याची किंमत पन्नास रुपये लावली. धोब्यानं मणी विकायला नकार दिला आणि तो पुढे चालला. थोडं पुढे गेल्यानंतर धोब्याला आणखी एक व्यक्ती भेटली. त्या व्यक्तीलाही तो मणी खरेदी करायचा होता. यावेळी धोब्यानं मण्याची किंमत 200 रुपये सांगितली. त्या व्यक्तीनं मोजून दोनशे रुपये धोब्याच्या हातावर टिकवले आणि मणी घेऊन तो तेथून निघून गेला. धोबी काही पावलं पुढे चालला असेल नसेल, तेव्हढ्यात मागनं धावत येऊन पहिल्या मुशाफिरानं त्याला गाठलं. धापा टाकत तो म्हणाला, 'चल, तू म्हणशील ती किंमत. हे घे शंभर रुपये आणि दे तो मणी मला....'

पण आता वेळ निघून गेली होती. कुठे माघार घ्यायची हे त्या मुशाफिराला उमगलं नव्हतं.

आपण 200 रुपयांना तो मणी विकला असं धोब्यानं हसत हसत त्याला सांगितलं. त्या मुशाफिरानं स्वतःच्या कपाळावर हात मारला. म्हणाला, 'अरे मूर्खा, काय केलंस तू हे! दोन लाख रुपयांचा हिरा तू दोनशे रुपयांना विकलास?' धोबी त्याला म्हणाला, 'मी नाही, आपण मूर्ख आहात... महामूर्ख. मला त्या मण्याची किंमत ठाऊकच नव्हती. मी तो फक्त दहा रुपयांना लॉकेटसह खरेदी केला होता. माझा फायदाच झाला. पण माहीत असूनसुद्धा लाखो रुपये किंमतीचा मणी शंभर रुपयांत खरेदी केला नाहीत हा आपला महामूर्खपणाच नव्हे का?'

# चाणक्याने दिलेला तर्क

मौर्य साम्राज्याची स्थापना करणारा श्रेष्ठ सेनापती म्हणून सम्राट चंद्रगुप्ताचा उल्लेख केला जातो. भारताच्या इतिहासात मौर्य साम्राज्य युगाला सुवर्णयुग मानलं जातं. या साम्राज्याच्या संस्थापनेची संकल्पना होती आचार्य चाणक्य यांची. ते सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांचे महामंत्री आणि गुरु होते. एका साधारण  झोपडीत ते रहात असत. त्यांची झोपडी सम्राट चंद्रगुप्ताच्या  महालासमोर होती.

एकदा चीन देशातून आलेले एक प्रसिद्ध प्रवासी  फाहियान  त्यांना भेटायला आले. चाणक्य एका झोपडीत रहातात हे पाहून त्यांना फारच आश्चर्य वाटले. चाणक्यांना ते म्हणाले, 'आश्चर्य! एवढ्या मोठ्या साम्राज्याचे महामात्य साध्या झोपडीत रहातात.'

फाहियान यांना नेमकं काय म्हणायचंय ते चाणक्यांच्या लक्षात आलं. चाणक्य त्यांना म्हणाले, 'ज्या देशाचा महामात्य साधारण झोपडीत रहातो त्या देशाचे नागरिक भव्य प्रासादात रहातात. पण ज्या देशाचा महामात्य भव्य महालात रहातो त्या देशाच्या नागरिकांना झोपड्यांमध्ये रहाणं भाग पडतं. माझ्या देशातील नागरिकांवर झोपड्यांमध्ये रहाण्याचं संकट येऊ नये असं मला वाटतं.' आचार्य चाणक्य  यांच्या उत्तरानं फाहियान अवाक् झाले.



# सूडाची आग

पंचतंत्रात भरुंड नावाच्या एका पक्षाची गोष्ट आहे. भरुंडला दोन डोकी होती. म्हणजे धड एकच, पण त्या धडावर दोन माना, त्या मानांवर दोन डोकी, आणि या दोन डोक्यांवर प्रत्येकी दोन डोळे, दोन तोंडं, दोन चोची आणि दोन कान.

आपल्या या दोन डोक्यांच्या शरीरामुळे भरुंड इतरांमध्ये उठून दिसायचा. त्यामुळं तो नेहमी वेगळ्याच ताठ्यात असायचा. स्वतःला नेहमी इतरांपेक्षा श्रेष्ठ मानायचा. एकदा भरुंडचं एक तोंड एक फळ खात होतं. खाता खाता ते तोंड उद्गारलं, 'वाः! किती स्वादिष्ट आहे हे फळ. अमृततुल्य चव आहे या फळाची. तोंडात सुखाची नुसतं कारंजं फुटतंय. चंदनाच्या की पारिजातकाच्या झाडाचं असेल?... कोणत्या झाडाचं फळ आहे कुणास ठाऊक. आधी मला हे खाऊन संपवू दे.' मग ते डोकं फळ खाण्यात अगदी पूर्णपणे रंगून गेलं.

पण त्याचं बोलणं ऐकून इकडे दुसऱ्या डोक्याच्या तोंडाला पाणी सुटलं. दुसऱ्या डोक्यानं पहिल्या डोक्याला म्हटलं, 'मलासुद्धा चव घेऊ दे ना रे, थोडं दे मला.' पहिल्या डोक्यानं म्हटलं, 'मी खाल्लं काय न् तू खाल्लं काय, सारखंच आहे. शेवटी फळ पोटातच जाणार ना? खाऊ दे मला. चवच घ्यायची म्हणतोयस तर तुला देऊन काय उपयोग, तू आणि मी एकच तर आहोत.' बोलता बोलता पहिल्या डोक्यानं पूर्ण फळ एकट्यानं फस्त केलं.

तेव्हापासूनच पहिल्या डोक्याबद्दलचा राग दुसऱ्या डोक्यात धुमसू लागला. सूड उगविण्याची संधी कधी मिळते याची दुसरं डोकं वाट पाहू लागलं. एके दिवशी दुसऱ्या डोक्याला एक विषारी फळ मिळालं. ते फळ त्यानं पहिल्या डोक्याला दाखवलं आणि म्हटलं, 'स्वार्थी डोक्या, हे फळ किती विषारी आहे हे ठाऊक आहे का तुला? खाल्लं की पार गारद होणार खाणारा. आता मी हे फळ एकट्यानं खाणार आणि तुला चांगली अद्दल घडवणार.'



पहिल्या डोक्यानं दुसऱ्या डोक्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. परोपरीनं त्याला पटवण्याचा प्रयत्न केला की बाबारे, तू हे फळ खाल्लंस तर आपल्या दोघांचेही प्राण निघून जाणार. पण दुसऱ्या डोक्याला सूड उगवायचा होता. सुडाच्या आगीत तो अगदी आंधळा झाला होता. त्यानं पहिल्या डोक्याचं म्हणणं अजिबात ऐकलं नाही आणि ते विषारी फळ खाल्लं. अशा रीतीनं दोन डोक्यांचा तो पक्षी मरण पावला. सूडाच्या आगीत सर्वस्वाची राखरांगोळी होते.

# शाश्वत सुखच खरं सुख

ख्रिस्तपूर्व 638-558 च्या काळात ग्रीसमध्ये सोलन नावाचे विचारक होऊन गेले. ते नेहमी खूप विचारपूर्वक, शब्द न शब्द तोलून-जोखून बोलायचे असं म्हणतात. ग्रीक सम्राट कारुंसुद्धा सोलन यांना खूप मानायचे. आपला भव्य राजमहाल, विशाल साम्राज्य आणि अपार संपदा सोलनने पाहावी, दोन कौतुकाचे शब्द बोलावे अशी त्यांची फार इच्छा होती. कारूंना वाटे, सोलनने आपल्याबद्दल म्हणावं की कारूंसारखा सुखी कुणी नाही. त्यांनीच असं म्हणावं अशी कारुंची इच्छा होती कारण ते कधीही तोंडदेखलं बोलत नाहीत अशी सोलन यांची ख्याती होती. कारुंला वाटायचं, सोलननी असं मत व्यक्त केलं तर लोकांचा आपल्याबद्दलचा आदर दुणावेल.


शेवटी एकदा कारुंनं सोलनला बोलावणं धाडलं. सम्राटानं बोलावलं तेव्हा सोलन आले. त्यांनी सम्राटाचं सारं वैभव पाहिलं. प्रत्येक गोष्ट दाखविल्यानंतर सोलन काहीतरी बोलतील म्हणून कारू वाट पाहायचे, पण सोलन काहीही बोलले नाहीत. उलट त्यांच्या चेहऱ्यावरचा गंभीर भाव आणखी आणखी वाढत गेला. शेवटी शेवटी तर त्यांचा चेहरा झाकोळू लागला. कारुंना आश्चर्य वाटलं. दुःखही झालं. ते सोलनला म्हणाले, 'आपण काही बोलत का नाही? मी सुखाची परमावधी गाठलीय असं नाही का वाटत आपल्याला?'

यावर सोलन कारुंना म्हणाले, 'मी गप्प आहे हेच उत्तम आहे. कारण माझं बोलणं तुम्हाला सहन होणार नाही.'

तरीही सम्राट कारुंनी सोलनला बोलतं करण्याचा प्रयत्न सोडला नाही.

शेवटी सोलन म्हणाले,'जे क्षणभंगुर आहे त्याला मी सुख मानत नाही. जे शाश्वत नाही ते सुखावह होऊच शकत नाही.' झालं. सोलन यांचं बोलणं ऐकताच सम्राट कारुंच्या रागाचा पारा चढला. त्यांनी लगेच सैनिकांना बोलावून सोलनचा शिरच्छेद करण्याचा आदेश दिला. मारण्याआधी सम्राटांनी सोलनला बऱ्याच वेळा म्हटलं, 'वाटल्यास अजूनही माफी माग. आणि म्हण की - सम्राट कारुं सगळयात जास्त सुखी आहे. आत्ता तुला मुक्त करतो.'


पण सोलन आपल्या मतावर अढळ होते. निश्चिंत मनानं ते सम्राटाला म्हणाले, 'मला माझे प्राण गमवावे लागले तरी बेहेत्तर, मी खोटं बोलू शकत नाही.' सोलनना माफ करण्याएवढं सम्राट कारुंचं मनही मोठं नव्हतं. शेवटी सोलनचं शीर धडावेगळं करण्यात आलं.




काही वर्षांनी पारस देशाचा राजा सायरसनं सम्राट कारुंला युद्धात पराजित केलं आणि त्यांच्या राज्यावर ताबा मिळविला. त्यानं कारुंला एका खांबाला बांधलं आणि आपल्या सैनिकांना आज्ञा दिली- 'याच्या शरीराच्या चिंधड्या करा.' तेव्हा सम्राट कारुंला सोलनच्या म्हणण्यातील शब्द न् शब्द पटला. सोलनचे शब्द आठवल्यानं शेवटच्या क्षणीसुद्धा सम्राट कारुंच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होतं. शेवटी त्यांच्या तोंडून शब्द निघाले - 'सोलन, मला माफ करा. आपलं म्हणणं बरोबर होतं.'

कारुंचं बोलणं ऐकून सायरसनं कारुंकडे सोलनबद्दल विचारपूस केली. सोलनबद्दल ऐकून सायरस इतका प्रभावित झाला की त्यानं सम्राट कारूंला जीवनदान दिलं.

---



# शांती

मिथिलेचे राजा नेमी यांनी कधी शास्त्राभ्यास केला नव्हता. किंवा त्यांना आध्यात्मातही रस नव्हता. म्हातारपणी त्यांना घोर दाहक ज्वर झाला. थोडा थंडावा मिळावा म्हणून त्यांच्या राण्या त्यांना चंदन आणि केशराचा लेप लावू लागल्या. लेप लावताना त्यांच्या हातातील बांगड्या वाजू लागल्या. नेमींना तो आवाज त्रासदायक वाटू लागला. राण्यांना त्यांनी हातातील बांगड्या काढून मगच लेप लावायला सांगितलं.

बांगड्या म्हणजे सौभाग्याचं लक्षण. राण्यांना पेच पडला, बांगड्या उतरवायच्या कशा? पण सम्राटाचं म्हणणं टाळताही येत नव्हतं. म्हणून मग त्यांनी सौभाग्याचं निशाण म्हणून एक एक बांगडी हातात ठेवून बाकीच्या बांगड्या उतरवल्या. बांगड्यांचा आवाज येणं थांबलं.

सम्राटाचं मन शांत झालं आणि त्यांच्या मनात एक विचार आला - 'हातात दहा-दहा बांगड्या होत्या तेव्हा त्या वाजत होत्या. एक एक राहिली आणि आवाज बंद झाला.' नेमींना साक्षात्कार झाला. अनेक असतील तर गजबजाट अटळ असतो. शांती हवी असेल तर एकच असणं अपरिहार्य आहे. महाराज नेमी उठून बसले. म्हणाले, 'मला जाऊ द्या.'

राण्यांना भोगी राजा नेमी ठाऊक होते, योगी नेमींना त्या ओळखत नव्हत्या. त्यांना वाटलं, तापामुळे महाराज विक्षिप्त झाले. त्या घाबरल्या. नेमींना रोखण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महाराज नेमींनी त्यांना समजावलं - 'घाबरू नका. मला ज्वर झाल्यानं मी बरळत नाहीय. ही सगळी तुमच्या बांगड्यांची कृपा आहे. ईश्वर कोणत्या माध्यमातून ज्ञान देईल ते सांगता येत नाही. तुम्ही बऱ्याच बांगड्या घातल्या होत्या. आजारपणामुळे त्यातून येणारा कर्कश्श आवाज मला सहन होत नव्हता. एक एक बांगडी उरली आणि तो कर्कश्श आवाज बंद झाला. यावरूनच मला बोध झाला. मनात जोवर बऱ्याच आकांक्षा आहेत तोपर्यंत असा आवाज येतच रहाणार. एकच आकांक्षा असायला हवी- मुक्तीची. वासना अनंत. अभीप्सीत एकच असायला हवं- परमात्याच्या मीलनाचं.

जागरुकता हवी, संकेत कुठूनही मिळू शकतो.

# अंगुलीमाल

बौद्ध त्रिपिटकात अंगुलीमालची कथा आहे. अंगुलीमाल अतिशय क्रूर होता. तो जंगलात रहायचा आणि जाणा-येणाऱ्या वाटसरूंना आधी लुटायचा आणि मग ठार मारून त्यांच्या बोटांची माळ गळयात बांधायचा. एक हजार लोकांना मारून त्यांच्या बोटांची माळ गळयात बांधायची त्यानं प्रतिज्ञा केली होती. त्यामुळेच त्याचं नाव अंगुलीमाल पडलं होतं. त्यानं नऊशे नव्याण्णव लोकांना ठार मारलं होतं. प्रतिज्ञा पूर्ण होण्यासाठी फक्त एकाचीच उणीव होती. त्या दरम्यान भगवान बुद्ध भ्रमण करत त्या भागात पोहोचले होते. ज्या रस्त्यावर अंगुलीमालशी गाठ पडायची शक्यता होती त्या रस्त्यानं ते निघाले तेव्हा गावकऱ्यांनी त्यांना पुढे न जाण्याविषयी सांगितलं. बौद्ध भिक्षुंनीही त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. भगवान बुद्ध म्हणाले, 'मला माहीत नसतं तर कदाचित मी दुसऱ्या मार्गानं गेलोही असतो, पण आता अजिबात नाही. या वाटेनं मलाच गेलं पाहिजे. इतर कुणी जाणार नाही.'

भगवान बुद्ध निघाले. सोबत भिक्षुही निघाले पण नेहमी बुद्धांची सावली होऊन चालणारे शिष्य घाबरून चार पावलं मागेच चालत होते. बुद्ध एकटेच अंगुलीमालच्या भेटीला निघाले. त्यांना येताना पाहून अंगुलीमाल दुरूनच ओरडला, 'भिक्षु, आहेस तिथेच थांब! मी कोण आहे हे कदाचित तुला माहीत नाही असं दिसतंय!'

त्याचं बोलणं ऐकून भगवान बुद्ध हसले. म्हणाले, 'तुलाही कदाचित मी कोण आहे हे माहीत नाही असं दिसतंय! खरं तर, आपण कोण हे ही तुला ठाऊक नाहीय!'

गौतम बुद्धांचं उत्तर ऐकून अंगुलीमाल चपापला. एवढ्या आत्मविश्वासानं बोलणारा माणूस त्यानं याआधी पाहिला नव्हता. तेवढ्यात गौतम बुद्ध त्याच्या पुढ्यात येऊन उभे राहिले. म्हणाले, 'हे पाहा, कसलीही घाई नाही. मला तू निवांतपणे कधीही मारू शकतोस. पण मारण्याआधी माझी एक छोटीशी इच्छा पूर्ण कर. या झाडाची काही पानं मला तोडून आणून दे.'



अंगुलीमाल वृक्षाची मोठी फांदीच तोडून घेऊन आला. भगवान बुद्ध त्याला म्हणाले, 'माझी अर्धी इच्छा पूर्ण झाली. आता उरलेली इच्छाही पूर्ण कर. ही पानं पुन्हा झाडाला जोड.' अंगुलीमाल म्हणाला, 'तुटलेली फांदी पुन्हा झाडाला जोडणार कशी?' भगवान बुद्ध त्याला म्हणाले, 'जोडू शकत नाहीस तर तोडण्याचं काम का करतोस? एवढ्या लोकांना मारलंस तू, पण एखाद्या मुंगीला तरी जिवंत करता येतं का तुला? ज्याला आपण पुन्हा जिवंत करू शकत नाही त्याला मारण्याचा अधिकार आपल्याकडे आहे का?'

भगवान बुद्धांचं बोलणं ऐकून अंगुलीमालला आपली चूक जाणवली. त्याच्या हातून फरसा निखळला. आणि त्यानं भगवान बुद्धांच्या पायांवर लोटांगण घातलं.


# मिथ्या अभिमान

युद्धचातुरी आणि अफाट ताकदीमुळे भरत चक्रवर्ती सम्राट बनला. सम्राट झाल्यानंतर त्याला आपल्या या गुणांबद्दल गर्व झाला. आपली बरोबरी इतर कोणताही राजा करू शकत नाही असं त्याला वाटायचं. अमर होण्याचे विचार त्याच्या मनात घोळू लागले आणि त्यासाठीच्या उपायांच्या शोधास तो लागला.

वृषभ पर्वताच्या उंच शिखरावर आपलं नाव लिहून अमर होण्याचा मार्ग त्याला पटला. त्यानुसार आपल्या प्रचंड लव्याजम्यानिशी तो वृषभ पर्वतावर गेला. या पर्वताची चढण अतिशय कठीण होती. त्याला वाटत होतं, या पर्वताचं शिखर काबीज करणारे आपण केवळ एकमेव. पण शिखरावरील दृश्य पाहून त्याची थोडी निराशा झाली. आपली समजूत चुकीची होती हे त्याच्या लक्षात आलं. वृषभ पर्वत पादाक्रांत करणाऱ्या कित्येक चक्रवर्ती सम्राटांची नावं त्या दुरूह शिखरावर आधीपासूनच अंकित केलेली होती. आणखी एखादं नाव जोडण्यासाठीसुद्धा तेथे जागा शिल्लक नव्हती. भरत खिन्न झाला. पण आपलं नाव तिथे अंकित करायचंच हा त्याचा निर्धार होता. शेवटी त्यानं शिखरावरील एका सम्राटाचं नाव पुसून त्या जागी आपलं नाव कोरलं आणि तो आपल्या राज्यात परतला.

त्यानंतर बराच काळ लोटला तरी त्याच्या मनातून वृषभाचलाबद्दलची आठवण पुसली जात नव्हती आणि आठवण आली की त्याला खूप अस्वस्थ वाटायचं. आपल्या राजपुरोहिताला बोलावलं आणि आपल्या खिन्नतेचं कारण काय असू शकेल? - अशी विचारणा केली.

वयोवृद्ध राजपुरोहित म्हणाले, 'राजन्, आपण खिन्न आहात त्यामागील कारण थोडं वेगळं आहे. आपल्याला ज्या गोष्टीचा ध्यास होता ती गोष्टच आपण नष्ट केलीत. वृषभ पर्वताच्या अत्युच्च शिखरावर आपलं नाव लिहून ते अजरामर करायची आपली इच्छा होती. पण प्रत्यक्ष तिथे गेल्यावर इतर व्यक्तीचं नाव पुसून आपल्याला आपलं नाव तिथे लिहावं लागलं. यामुळे आपल्या इच्छेचा आधारच नष्ट झाला. आपली इच्छा फोल आहे हे आपणांस कळून चुकलं.



आपण पर्वतशिखरावर लिहिललेलं आपलं नावही कुणी ना कुणी पुसून टाकणार ही शंका आज आपल्या मनात आहे. जीवनाच्या क्षणभंगूरतेचा असा अचानक साक्षात्कार झाल्याने आपण अस्वस्थ झालात महाराज! राजपुरोहिताचं बोलणं ऐकून भरत राजाला जीवनाच्या क्षणभंगुरतेबरोबरच आपल्या गर्वाची जाणीव झाली. त्यातील फोलपणा उमगला.

# श्रद्धा आणि तर्क

एकदा केशव चंद्र सेन रामकृष्ण परमहंसांना भेटायला गेले. त्यांच्याशी ईश्वराबद्दल वादविवाद करायचा केशवचंद्रांचा विचार होता. केशव चंद्र सेन यांच्यावर त्याकाळी नास्तिकतेचा पगडा होता. त्यांच्यासोबत समाजातील पाच-पन्नास प्रतिष्ठित व्यक्तीही होत्या.

चर्चा सुरू करताना केशवचंद्र परमहंसांना म्हणाले, 'ईश्वराचं अस्तित्वच नाही.'

त्यावर परमहंस त्यांना म्हणाले, 'बरोबर आहे आपलं म्हणणं.'


त्यांचं उत्तर ऐकून केशवचंद्रांना धक्काच बसला. त्यांना वाटलं, हे स्वतःला परमहंस आणि भक्त मानतात, तर मग माझं विरोधी मत बरोबर आहे असं कसं काय म्हणतात? त्यांनी माझं म्हणणं जर मान्य केलं तर वादविवाद घडेल कसा? विवादाचं मूळच त्यांनी उपटून टाकलं.

तरीही आपला प्रयत्न पुढे सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत केशवचंद्र परमहंसांना म्हणाले, 'स्वर्ग आणि नरक या केवळ थापा आहेत.'

यावर परमहंस म्हणाले, 'वा, अगदी बरोबर बोललात आपण.'

आता केशवचंद्रांसोबत आलेले लोकही बुचकळ्यात पडले. केशवचंद्रही थोडे उदास झाले. परमहंसांना त्यांनी विचारलं, 'चर्चा व्हावी, वादविवाद घडावा म्हणून मी आलो होतो. पण आपण माझा प्रत्येक तर्क मान्य करत आहात. अशानं चर्चा घडणार कशी?'

यावर परमहंस केशवचंद्रांना म्हणाले,'तुमची तर्कशक्ती, वादविवाद करण्याची क्षमता, तुमची कुशाग्रबुद्धी हे सगळं माझ्या दृष्टीनं ईश्वराच्या अस्तित्वाची साक्ष आहे. ईश्वराशिवाय केशवचंद्र होणे नाही. एखादं फूल जरी पाहिलं तरी मला त्यात परमेश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा मिळतो. तुम्ही तर एव्हढं अद्भुत फूल आहात, तुम्हाला पाहून परमेश्वराची आठवण नाही झाली तरच नवल. म्हणूनच मी त्या परमेश्वराचे आभार मानतो. किती अद्भुत माणूस पाठवला त्यानं. तुमच्या तोंडून तोच बोलतोय. मग मी नकार कसा देऊ? त्याला जर असा डाव मांडायचा असेल तरी चालेल, आपला विरोध नाही...'




त्या रात्री केशवचंद्रांना झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच ते परमहंसांना भेटायला गेले. भेट झाली तेव्हा म्हणाले, 'आपण मला हरवलंत. एक गोष्ट मी मान्य करतो की माझे सगळे तर्क वायफळ आहेत. कारण, काल आपल्या डोळ्यांत मी जो आनंद अनुभवला तसा आनंद माझ्या तर्कांमुळे मला कधीही मिळाला नाही. तो आनंद हाच खरा पुरावा आहे. तर्कांमुळे तसा आनंद मिळत नसेल तर त्याचा उपयोगच काय? आपल्याला भेटून तर्कांपलीकडेही काही आहे हे मला समजलं.'

# अलेक्झांडर अणि संन्यासी

अलेक्झांडर जेव्हा भारतविजयाच्या मोहिमेवर निघाला तेव्हा त्याचे गुरु अरिस्टॉटल यांनी त्याला सांगितलं परत येताना भारतातील एक संन्यासी सोबत आण. बरंच ऐकलंय मी तिथल्या संन्याशांबद्दल, मला संन्यासी पाहायचाय. भारतातून परतण्याच्या वेळी अलेक्झांडरला आपल्या गुरुची इच्छा आठवली. त्यानं आपल्या सैनिकांना आज्ञा दिली, 'जा, एक संन्यासी पकडून आणा.' सैनिक निघाले. गावात पोहचल्यावर त्यांनी संन्याशाबद्दल विचारपूस केली. गावकऱ्यांनी त्यांना सांगितलं की, नदीकिनारी एका नग्न संन्याशाचा मुक्काम आहे. सैनिक नदीकिनारी संन्याशाजवळ पोहोचले आणि त्यांनी संन्याशाला सांगितलं, 'आपण आमच्यासोबत ग्रीसला चलावं अशी जगज्जेत्या अलेक्झांडरची आज्ञा आहे. आम्ही आपणांस राजकीय इतमामांसह, अतिशय थाटामाटानं सोबत घेऊन जाऊ. सगळी सुखं आपल्या पायांशी लोळण घेतील. महान, विश्वविजेत्या अलेक्झांडरचे आपण विशेष अतिथी बनून राजसुखं उपभोगाल.'

सैनिकांचं बोलणं ऐकून संन्यासी हसू लागला. म्हणाला, 'आम्ही फक्त स्वतःच्या मर्जीनं चालतो. इतरांचे हुकूम मानणं आम्ही फार पूर्वीच सोडून दिलंय. तुम्हाला हवी असलेली व्यक्ती मी नव्हे.'

शिपायांनी कैक प्रकारे संन्याशाची मनधरणी केली. त्यांच्यापैकी एक म्हणाला, 'आपण अलेक्झांडरला ओळखत नाही. तो अतिशय क्रोधी आणि भयंकर राजा आहे. तुम्ही त्याचं म्हणणं मान्य केलं नाही तर तो तुमचं शीर धडावेगळं करेल.'

संन्यासी म्हणाला, 'तुम्ही आपल्या त्या राजालाच घेऊन या इथे. तो काय करतो ते पाहू.'

संन्याशाचं बोलणं ऐकलं आणि अलेक्झांडर आपल्या संपूर्ण सैन्यबळासह त्याला भेटायला निघाला. संन्याशावर नजर पडताच त्यानं म्यानातून आपली तलवार खेचली आणि धमकी देत तो म्हणाला, 'मुकाट्यानं चल आमच्याबरोबर. नकार ऐकून घेण्याची मला सवय नाही. चल ऊठ, नाहीतर तुझी मान कापून तुझ्याच हातात देईन.'

संन्यासी त्याला म्हणाला, 'मान कापणार म्हणतोस? ठीक आहे, काप. माझ्याबद्दल म्हणशील तर ज्या दिवशी संन्यास घेतला त्याच दिवशी मी या मानेपासून फारकत घेतलीय. कर हे शीर धडावेगळं. ते जमिनीवर पडताना तूही पाहाशील आणि मीसुद्धा पाहीन. कारण मी त्या शिरापासून कधीचाच वेगळा झालोय. म्हणून म्हणतो, अजिबात वेळ नको दवडूस. उचल तुझी तलवार आणि घाल घाव या मानेवर.'

संन्याशाचं धाडस पाहून अलेक्झांडर जणू नव्यानं शुद्धीवर आला. त्यानं तलवार म्यानेत ठेवली. सैनिकांना तो म्हणाला, 'या माणसाला मारण्यात काही हशील नाही. याच्यावर कुणाचा हुकूमही चालणं शक्य नाही. मरणाला घाबरणाऱ्यालाच आपण मरणाची भीती घालू शकतो.'

# सत्कर्म टाळू नका

एकदा एक याचक युधिष्ठिराकडे आला. त्यावेळी युधिष्ठिर कामात गुंतला होता. वेळ नसल्याचं सांगून त्याने याचकाला दुसऱ्या दिवशी येण्याची विनंती केली. दुसऱ्या दिवशी आल्यावर त्याला जे हवं ते दिलं जाईल असं आश्वासनही युधिष्ठिरानं त्या याचकाला दिलं. याचक निघून गेला. भीम जवळच बसला होता. युधिष्ठिर आणि याचकामध्ये झालेलं बोलणं त्यानं ऐकलं. अशा रीतीनं याचकाला परत पाठवणं त्याला पटेना.

भीम उठून प्रवेशद्वारापाशी गेला. तेथील सेवकांना त्यानं मंगलवाद्ये वाजविण्याची आज्ञा दिली. प्रवेशद्वारापाशी अडकवलेली दुंदुभी उतरवून तो स्वतःही ती वाजवू लागला. अचानक मंगलवाद्यांचा स्वर कानी पडताच युधिष्ठिर चक्रावला. त्यानं विचारणा केली, 'आज अचानक मंगलवाद्ये का वाजताहेत? काही विशेष आनंदाची बातमी आहे का?' भीमाने दिलेल्या आदेशानुसार मंगलवाद्ये वाजत आहेत हे एका सेवकाकडून त्याला समजलं. धर्मराजानं मग भीमाला बोलावलं. मंगलवाद्ये वाजविण्याचं कारण त्याला विचारलं.

भीम म्हणाला, 'दादा, आपण काळावर विजय मिळविलात, याहून महत्कार्य ते काय असणार?'

युधिष्ठिरानं आश्चर्यानं विचारलं, 'मी काळावर विजय मिळविला? कधी? कुठे? कसा? तुझं बोलणं माझ्या लक्षात येत नाहीय!'

भीम म्हणाला, 'आपण कधीही खोटं बोलत नाही हे अवघ्या जगाला माहीत आहे. दाराशी आलेल्या याचकाला आपण उद्या दान देण्याचं आश्वासन दिलं. याचा अर्थ आपण निदान उद्यापर्यंत तरी काळावर मात केलीय असा होत नाही का?'

भीमाचं बोलणं ऐकून युधिष्ठिराला आपली चूक उमगली. तो भीमाला म्हणाला, 'खरंय तुझं, सत्कर्म करणं कधीही टाळू नये. तू त्या याचकाला परत बोलावून आण.'

# दोन पैशांचा चमत्कार

बरीच वर्षे परिश्रम करून एक माणूस पाण्यावर चालायला शिकला. दूरवर त्याची ख्याती पसरली. पाण्यावर चालणारा योगी म्हणून लोक त्याला ओळखू लागले, त्याला मान देऊ लागले. एकदा तो माणूस रामकृष्ण परमहंसांना भेटायला गेला. आपला चमत्कार दाखवून त्यांना हिणवायचा त्याचा विचार होता. मनात त्यानं स्वतःशी कित्येक वेळा संवाद म्हटले होते, - 'तुम्ही कसचे परमहंस, मी अस्सल परमहंस आहे! मी पाण्यावरसुद्धा चालू शकतो.' त्यादरम्यान परहंसांचा मुक्काम नदीकिनारी दक्षिणेश्वराजवळ होता. भेट झाली तेव्हा योगी त्यांना म्हणाला, 'चला गंगेजवळ, मी तिथेच तुम्हाला माझा चमत्कार दाखवतो.'

रामकृष्णांनी त्याला विचारलं, 'काय चमत्कार आहे तुझा?'

तो म्हणाला, 'मी पाण्यावर चालू शकतो.'

रामकृष्ण म्हणाले, 'हे अजबच आहे. इतरांसारखा पोहायला का बरं शिकला नाहीस तू? पाण्यावर तरंगणं शिकायला तुला किती वर्षं लागली?'

तो म्हणाला, 'तब्बल वीस वर्षे लागली.'

रामकृष्ण त्याला म्हणाले, 'हद्द आहे तुझी. वीस वर्षे फुकट घालवलीस तू. अरे, मला जेव्हा पैलतीरावर जायचं असतं तेव्हा मी नावाड्याला दोन पैसे देतो. दोन पैशात तो मला आपल्या नावेत बसवून पैलतीरावर सोडतो. दोन पैशांच्या सोयीसाठी तू आपल्या आयुष्याची वीस वर्षे वाया घालवलीस? शिवाय, आपल्याला दररोज पैलतीरावर जावंच लागतं असंही नाही. वीस वर्षात मी जास्तीत जास्त दहा-पंधरा वेळा पैलतीरावर गेलो असेन. चार-सहा आणे किंमतीचं कौशल्य तू मला महान चमत्कार म्हणून दाखवायला आला आहेस? कमाल आहे तुझी.'

घमेंड उतरल्यानं खजील झालेल्या त्या योग्यानं परमहंसांचे पाय धरले. क्षमा मागितली. त्याच्या अहंकाराचा मुखवटा गळून पडला.

# द्रौपदीला हसू का आलं?

महाभारताचं युद्ध संपल्यानंतरची ही कथा आहे.

धर्मराज युधिष्ठिर एकछत्री सम्राट झाले. युद्धभूमीतील शरशय्येवर पडून भीष्म सूर्याच्या उत्तरायणात प्रवेश करण्याची वाट पाहात होते. श्रीकृष्णाच्या आज्ञेनुसार युधिष्ठिर, द्रौपदी आणि आपल्या भावांसह पितामह भीष्मांकडून उपदेश ग्रहण करण्यासाठी युद्धभूमीवर आले होते. युधिष्ठिरांनी पितामहांना वर्णाश्रम, राजा-प्रजा, धर्म इ. बद्दल प्रश्न विचारले. भीष्म युधिष्ठिराला धर्माबद्दल उपदेश देत होते तेव्हा द्रौपदीला अचानक हसू आलं.

तेव्हा पितामह भीष्म यांनी द्रौपदीला विचारलं, 'पोरी, तू का हसलीस?'

द्रौपदी संकोचून म्हणाली, 'चूक झाली पितामह, क्षमा करा.'

द्रौपदीच्या क्षमा मागण्यानं भीष्मांचं समाधान झालं नाही. ते द्रौपदीला म्हणाले, 'तुझ्या हसण्यामागे काहीतरी कारण आहे हे निश्चित. संकोचू नको, स्पष्ट सांग.'

द्रौपदीनं हात जोडून भीष्मांना वंदन केलं. म्हणाली, 'आपला आग्रह मी टाळू शकत नाही. आपण धर्मोपदेश देत होता तेव्हा माझ्या मनात एक विचार आला. वाटलं, आज आपण धर्माची उत्तम व्याख्या करता. धर्म समजावून सांगताय. पण दुर्योधनाच्या सभेत जेव्हा दुःशासन मला निर्वस्त्र करत होता तेव्हा धर्माबद्दलचं हे तुमचं ज्ञान कुठे गेलं होतं? हा विचार मनात आला आणि मला हसू आलं. क्षमा करा मला.'

द्रौपदीचं बोलणं ऐकून भीष्म म्हणाले, 'यात क्षमा मागण्यासारखं काहीही नाही. त्यावेळीसुद्धा माझ्याजवळ धर्माचं ज्ञान होतं. पण अन्यायी दुर्योधनाचं अन्न खाल्ल्यामुळे माझी बुद्धि कुंद पडली होती. म्हणूनच त्यावेळी मी योग्य निर्णय करू शकलो नाही. अर्जुनाचा बाण लागला आणि माझ्या शरीरातील सगळं दूषित रक्त वाहून गेलं. बुद्धी झळझळीत शुद्ध झाली. धर्माचं योग्य विवेचन करणं त्यामुळेच मला शक्य होत आहे.'

# बुखारा आणि समरकंदची कुरवंडी केलीच कशी!

प्रसिद्ध सूफी संत हाफीज कवीही होते. त्यांनी एक गीत लिहिलंय. आपल्या या गीतात ते म्हणतात, 'तुझ्या हनुवटीवर जो तीळ आहेत त्यावर मी बुखारा आणि समरकंदही कुरवंडून टाकेन.' बुखारा आणि समरकंद प्रेयसीच्या हनुवटीवरील तिळावर ओवाळून टाकायची इच्छा त्यांनी व्यक्त केली पण ते तैमूरलंगला आवडलं नाही. कारण तैमूरलंग बुखारा आणि समरकंदचा बादशहा होता. हाफीजचं गीत ऐकल्यावर त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तो म्हणाला, 'बुखारा आणि समरकंदचा सर्वेसर्वा आहे मी. हा कोण उपटसुंभ आला त्यांची कुरवंडी करणारा?' हाफीजना अटक करून आणण्याची त्यानं आपल्या सैनिकांना आज्ञा केली.

त्याच्या हुकुमानुसार हाफीजना दरबारात हजर करण्यात आलं. तैमूरलंग हाफीजना म्हणाला, 'बुखारा आणि समरकंद कुरवंडून टाकण्याएवढा कोणत्याही स्त्रीच्या हनुवटीवरील तीळ महान नसतो. दुसरी गोष्ट, बुखारा आणि समरकंद तुझ्या बापाची जहागीर आहे का? चालला कुणा स्त्रीच्या हनुवटीवर खुशाल त्यांची कुरवंडी करायला! मी जिवंत आहे अजून. मला विचारल्याशिवाय तू ही कविता लिहीलीसच कशी?'

तैमूरलंगचा अहंकार आणि मूर्खपणा पाहून हाफीजना हसू आलं. तैमूरलंगला ते म्हणाले, 'ऐक तैमूरलंगा! मी जिच्या हनुवटीवरच्या तिळाचा उल्लेख केलाय, बुखारा आणि समरकंदसुद्धा त्याचेच आहेत. तू उगीच का मध्ये पडतोस? तू आज आहेस, उद्या कदाचित नसशीलही. ज्याची वस्तू त्याला परत केली तर काय बिघडणार आहे?' सूफी कवी परमेश्वराला प्रेयसी मानतात. त्यानुसार हाफीजनी प्रेयसीच्या मिषानं ईश्वरालाच आळवलं होतं.

हाफीज पुढे तैमूरलंगला म्हणाला, 'मी गरीब फकीर आहे पण माझं मन पाहा किती विशाल आहे! माझ्या झोळीत काहीही नसताना मी बुखारा आणि समरकंद दिले. तुझ्याजवळ सर्व काही आहे, पण तू किती कृपण आहेस पाहा!' खरं तर, चंगेज खानचा वंशज असलेला तैमूर हाफीजचं बोलणं ऐकून त्यांचा शिरच्छेदच करणार असं लोकांना वाटलं होतं. हसणं सोडा, तैमूरलंगला कधी कुणी स्मितहास्य करतानाही पाहिलेलं नव्हतं. पण घडलं उलट. हाफीजचं बोलणं ऐकून तैमूर खळाळून हसला.

# थोडं आइस्क्रीम.. आत्म्यासाठी!

एकदा एक बाबा आपल्या छोट्याला घेऊन हॉटेलात जेवायला गेले. रोज घरी जेवणाला सुरवात करण्याआधी त्याला 'वदनी कवळ घेता...' म्हणायची सवय होती. हॉटेलात जेवण समोर आलं तेव्हा त्यानं बाबाला विचारलं, 'बाबा, प्रार्थना म्हणू?' क्षणभरातच सावरून हात जोडत बाबा म्हणाला, 'जरूर बाळा.' प्रार्थना करून झाल्यावर जोडलेले हात कपाळाशी नेत छोट्या म्हणाला, '...देवा, आज जेवणानंतर मला आइस्क्रीम हवं. देशील ना? मी पुन्हा एकदा तुला धन्यवाद देईन.'

त्याचं निरागस बोलणं ऐकून हॉटेलातील मंडळी हसू लागली. एक बाई आपलं थोरपण मिरवत म्हणाल्या, 'आजकालची मुलं ही अशीच. त्यांना नीट प्रार्थनाही करता येत नाही. देवाकडे आइस्क्रीम मागणं म्हणजे हद्द झाली बाई. मी नव्हती कधी मागितली!' ऐकलं आणि त्या छोट्याच्या डोळयात पाणी आलं. वडिलांनी त्याला लगेच कडेवर घेतलं तेव्हा तो रडवेल्या सुरात म्हणाला, 'बाबा, चूक झाली ना? आइस्क्रीम मागायला नको होती. आता देव रागावेल माझ्यावर...'

बाबाला काय बोलावं सुचेना त्यांच्या शेजारच्या टेबलावर एक म्हातारे गृहस्थ बसले होते. ते उठून मुलाजवळ आले. म्हणाले, 'माझी देवाशी ओळख आहे. तो म्हणाला, तू खूप छान प्रार्थना केलीस. तुला तो नक्की आइस्क्रीम देणार.' मग छोट्याच्या कानाजवळ तोंड नेऊन ते कुजबुजत म्हणाले, 'त्या बाइंनी देवाजवळ कधी आइस्क्रीम मागितली नाही हे बरं नाही केलं, अधून मधून थोडं आईसक्रीम आत्म्याला सुखी करतं.'

किंचित अविश्वासानं त्यांच्याकडे पाहात छोट्या उद्गारला, 'खरंच?'

आजोबा म्हणाले, 'अगदी खरं, शप्पथ!' छोट्या निवळला.

जेवण झाल्यावर बाबांनी त्याच्यासाठी आइस्क्रीम मागवलं. पण त्यानंतर जे त्या मुलानं केलं ते खरोखर अनपेक्षित होतं. त्यानं आइस्क्रीमची प्लेट त्या बाईसमोर नेऊन ठेवली. मग हसत तो त्यांना म्हणाला, 'अधून मधून थोडं आईसक्रीम आत्म्याला सुखी करतं असं आजोबा म्हणाले. मी बाबांच्या प्लेटमधून खाईन. हे तुम्ही खा कारण तुम्ही देवाकडे आइस्क्रीम मागत नाही ना!'

# गुरूविना कोण दाखविल वाट...

एकदा एका गुराख्याला रानात सिंहाचा एक चुकार छावा मिळाला. तो खूप लहान होता आणि अगदी गोंडस दिसत होता. गुराख्याला तो इतका आवडला की तो त्याला घेऊन घरी आला. आपल्या शेळयांबरोबर त्यानं त्याचंही संगोपन करायचं असं ठरवलं.

हळूहळू सिंहाचा तो छावा मोठा झाला. त्याच्या जाणिवा जाग्या झाल्या, त्याला जेव्हा समज आली तेव्हा त्याच्या आसपास शेळया-मेंढ्यांचाच वावर होता. आपणही त्यांच्यापैकीच एक आहोत अशी त्याची समजूत झाली. त्यांच्या सगळया सवयी त्यानं आत्मसात केल्या. त्यांच्या घोळक्यात तो एकमेकांना खेटत चालायचा. बें-बें करत बोलायचा. इतकंच नव्हे तर शेळयांचा स्थायीभावही त्यानं उचलला - तोसुद्धा घाबरट बनला. कुठे काही खुट्ट झालं की कळपासोबत तोही भेदरून जायचा.

एके दिवशी एका सिंहानं या कळपावर हल्ला केला. कळप सैरावैरा धावू लागला.

हल्ला करणारा सिंह मात्र अवाक् होऊन उभा राहिला.

शेळया-मेंढ्यांच्या त्या कळपासोबत एक सिंहही जीव मुठीत घेऊन धावतोय यावर त्याचा क्षणभर विश्वासच बसेना. आपल्याला शिकार करायचीय हे तो विसरून गेला. झडप टाकून शेळयांबरोबर धावणाऱ्या सिंहाला त्यानं पकडलं.

बकऱ्यांसारखाच गायावाया करत कळपातला सिंह जंगलातल्या सिंहाला म्हणाला, 'जाऊ दे रे मला, माझे सगळे साथीदार चाललेयत...' सिंहानं त्याच्या मानेवरची पकड आणखी आवळली. म्हणाला, 'अरे नालायका, हे तुझे साथीदार आहेत का रे?' पण भीतीमुळे प्राण कंठाशी आलेला कळपातील सिंह काहीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. जीव वाचवून धूम ठोकण्याची त्याला अगदी घाई झाली होती. प्रयत्नांची पराकाष्ठा करून जंगलातल्या सिंहानं कळपातल्या अवाढव्य वाढलेल्या त्या सिंहाचं धूड खेचत नदीकाठावर आणलं. नदीच्या पाण्यात त्यानं त्याला दोघांमधलं साम्य दाखवलं.

क्षणभर कळपातला सिंह गोंधळला. पण आपलं खरं स्वरूप ओळखायला त्याला वेळ लागला नाही. आपणही सिंहच आहोत याची त्याला जाणीव झाली. आपण शेळी नाही न् मेंढीही नाही याबद्दल खात्री पटायला मग फारसा वेळ लागला नाही. ज्या क्षणी आपणही सिंह आहोत याची त्याला जाणीव झाली त्या क्षणी त्याच्या तोंडून अशी डरकाळी फुटली की आसपासचे सारे डोंगर आणि झाडे दणाणली. त्याची डरकाळी ऐकून जंगलातल्या सिंहाच्या तोंडूनही आश्चर्योद्गार निघाला - 'बापरे!'

जागा झालेला सिंह त्याला म्हणाला, 'जन्मल्यापासून डरकाळी फोडली नव्हती. आपण मला जागं केलीत ही आपली मोठी कृपा.'

# एकनाथांची आस्तिकता

एकदा एक नास्तिक माणूस एकनाथांना भेटायला आला. त्याच्या मनात बऱ्याच शंका होत्या. आपल्या मगदुराप्रमाणे विद्वान शोधून त्यांना आपले प्रश्न विचारून त्यांच्याकडून उत्तरं मिळवण्याचा त्यानं प्रयत्न केला होता. पण त्यांच्यापैकी कुणीही दिलेली उत्तरं त्याला समाधानकारक वाटली नव्हती. कुणी त्याला सांगितलं की फक्त एकनाथच काय ते तुझ्या शंकांचं निरसन करू शकतील. म्हणून मग तो एकनाथांना भेटायला आला होता.

तो गावात पोचला तेव्हा सकाळचे नऊ वाजले होते. त्यानं गावकऱ्यांकडे एकनाथांबद्दल चवकशी केली. गावकरी म्हणाले की एकनाथ नदीकिनाऱ्यावरच्या एखाद्या मंदिरात झोपलेला असेल. तो माणूस थोडा गडबडला. 'आपण चुकीच्या ठिकाणी तर पोहोचलो नाहीय ना?' - अशी शंका त्याच्या मनात डोकावली. साधू-संत ब्राह्म मुहूर्तावर उठतात असं तो ऐकून होता. पण इलाज नव्हता. त्याला आपल्या प्रश्नांची उत्तरं मिळवायची होती. तो एकनाथांना शोधण्यासाठी नदीकिनारी पोहोचला.

शेवटी, किनाऱ्याजवळच्या एका शंकराच्या मंदिरात त्याला एकनाथ दिसले. एकनाथ अजून झोपलेले होते. आपले दोन्ही पाय त्यांनी शंकराच्या पिंडीवर टेकवले होते. त्यांना असं झोपलेलं पाहून तो माणूस चरकला. त्याला वाटलं, आपण नास्तिक जरी असलो तरी शंकराच्या पिंडीवर पाय टाकून झोपणं काही आपल्याला जमणार नाही. अशा अवलियाला जागं करण्याचा धीर काही त्याला झाला नाही. म्हणून मग तो त्यांच्या जागे होण्याची वाट पाहात तिथेच बसून राहिला.

त्याच्या मनात विचारांचं चक्र सुरूच होतं. त्याला वाटलं की, शंकर नाही हे तर खरंच, पण म्हणून त्याच्या पिंडीवर असं खुशाल पाय पसरून झोपणं म्हणजे जरा अतीच झालं. समजा शंकर असलाच तर?

तासाभरानं एकनाथांना जाग आली. झटकन् पुढे होत तो माणूस त्यांना म्हणाला, 'आपणास ज्ञानाच्या चार गोष्टी विचाराव्या म्हणून मी आलो होतो. पण आधी मला एक सांगा, ही काय उठायची वेळ झाली? साधू-संत तर प्रभातसमयी, सूर्योदयापूर्वी उठतात.'

एकनाथ त्याला म्हणाले, 'साधू संत ज्यावेळी उठतात तोच ब्राह्ममुहूर्त असतो. आम्ही न झोपतो, न जागे होतो. ब्रह्माला जेव्हा नीज येते तेव्हा तो झोपतो आणि जाग आली की जागा होतो.'

तो माणूस म्हणाला, 'कमाल आहे. अहो मी तुम्हाला ब्रह्म आहे का हे विचारायला आलोय. अन् तुम्ही तर - मीच ब्रह्म आहे असं म्हणताय.'

यावर एकनाथ त्याला म्हणाले, 'फक्त मीच ब्रह्म आहे असं नव्हे. तू सुद्धा ब्रह्म आहेस. फरक फक्त एव्हढाच की, आपण ब्रह्म आहोत याची तुला जाणीव नाहीय न् मला ते ठाऊक आहे.'

तो माणूस वैतागला. म्हणाला, 'चलतो मी. थोडं ज्ञान मिळेल या आशेनं आलो होतो. पण तुम्ही माझ्याहून थोर नास्तिक आहात असं दिसतंय.'

एकनाथ म्हणाले,'जायचं तर जा बापडा. पण जेवणाची वेळ झालीय. उन्हं पण चढली आहेत. मी स्वैपाक करतो. खा न् मग जा.'

एकनाथांनी स्वैपाक केला. तूप आणि पोळयांचा बेत होता. दोघे जेवायला बसले. तेवढ्यात कुत्र्याने एक पोळी पळवली. हातात तुपाची वाटी घेऊन एकनाथ त्याच्या मागे धावले. उत्सुकतेपोटी तो माणूसही मागे धावू लागला.

बरंच अंतर धावल्यानंतर कुत्रा एकनाथांच्या हाती आला. एकनाथांनी त्याच्या तोंडातून पोळी काढली. म्हणाले, 'रामा, तुपाशिवाय पोळी खाणं मला आवडत नाही म्हणजे तुलाही आवडत नसावं. रोज सांगतो की तूप लावल्यानंतर पोळी खा, पण मला पळवल्याशिवाय तुला चैन पडत नाही.' बोलता बोलता एकनाथांनी कुत्र्याच्या तोंडातून काढलेली पोळी तुपाच्या वाटीत बुचकळली आणि कुत्र्यास भरवली.

हे सर्व पाहून तो माणूस थक्क झाला. शंकराच्या पिंडीवर पाय टाकून बसण्याचं धाडस एकनाथामध्ये कुठून आलं हे आत्ता त्याला कळालं. जो कुत्र्याला राम मानू शकतो तो शंकराच्या पिंडीवर पाय टाकून झोपू शकतो. भक्तीरसात भिजलेल्या मनाला दोन्ही सारखेच वाटतात हे त्यानं प्रत्यक्ष पाहिलं, त्याला पटलं. एकनाथांपुढे तो नतमस्तक झाला.

# कंदिलाची किमया

एका गावात एक माणूस रहायचा. त्याच्या घरापासून जवळच एक पर्वत होता. जवळ जाऊन, फिरून तो पर्वत पाहायची त्या माणसाची खूप इच्छा होती. कारण तो पर्वत यात्रेकरूंची इच्छा पूर्ण करतो अशी ख्याती होती. खूप दूरवरून लोक खास त्या पर्वताची यात्रा करण्यासाठी येत असत. या माणसाच्या घरापासून तो पर्वत जवळच होता. फक्त 15 मैलांच्या अंतरावर. मनात आणलं तर सकाळी निघून तो संध्याकाळी घरी परतू शकला असता. पण जाऊ कधीतरी अशा विचारानं त्याचं जाणं नेहमी टळत गेलं.

मग त्याला वाटू लागलं की, अशानं ज्या पर्वताची यात्रा करण्यासाठी लोक दूरवरून येतात त्या पर्वताची यात्रा आपण त्याच्या इतक्या जवळ असूनही कधीही करू शकणार नाही. शेवटी एकदा त्यानं निर्धार केला. आज रात्री आपण पर्वतावर जायचंच. रात्री सारी कामं आटोपल्यावर त्यानं कंदील पेटवला आणि तो घेऊन यात्रेला निघाला.

गावाबाहेर येता येता त्याच्या मनात विचार आला - आपल्याला पंधरा मैल चालायचंय. या कंदिलाचा उजेड जेमतेम चार पावलांपर्यंत जातोय. अशा गडद अंधारात, एवढ्याशा कंदिलाच्या प्रकाशात आपण कुठवर पोहोचू शकू? आपण या अंधारात गडप होऊन जाऊ. हा विचार मनात आला आणि तो एवढा निराश झाला की हातातील कंदील शेजारी ठेवून त्यानं जमिनीवर बसकण मारली. काय करावं त्याला काही सुचेना.

तेवढ्यात त्याला एक साधू त्या मार्गानं येताना दिसला. जवळ आल्यावर साधूनं त्या माणसाला विचारलं, 'काय झालं? तू अगदी निराश झालेला दिसतोयस.'

तो माणूस म्हणाला, 'मी अभागी आहे हेच खरं. कित्येक वर्षांपासून या पर्वताची यात्रा करायची ठरवत होतो पण कधी घरातून निघायची सवडच झाली नाही. आज शेवटी निर्धारानं निघालो तर माझ्या या कंदिलानं दगा दिला. एव्हढासा कंदील, त्यातून प्रकाशही किती मंद निघतोय.'

साधू त्याला म्हणाला, 'तू माझ्याबरोबर चल.'

तो मग साधूसोबत निघाला. पाहातो तर काय, प्रकाशही त्याच्यासोबत पुढे चालला होता. जसजसा तो पुढे जायचा तसतसा प्रकाशही पुढे पुढे सरकायचा. त्याच्या वाटेवरील अंधार सरला होता. त्यानं साधूचे आभार मानले.

साधू म्हणाला, 'सरळ सोपी गोष्ट आहे. तू चार पावलं चाललास की उजेडही चार पावलं पुढे चालेल. बसल्या ठिकाणी हिशोब लावत राहिलास तर हाती काहीही यायचं नाही. अरे वेड्या, पंधरा मैलच काय, या कंदिलाच्या प्रकाशात तू हजारो मैलांचं अंतर सुखेनैव कापू शकतोस.'

# ब्रह्मर्षी विश्वामित्र

विश्वामित्र स्वतःला ब्रह्मर्षी म्हणवून  घेऊ इच्छीत होते. पण वशिष्ठ मुनी त्यांना नेहमी राजर्षीच म्हणायचे. वशिष्ठांनी ब्रह्मर्षी म्हटल्याशिवाय लोक त्यांना ब्रह्मर्षी कसे म्हणणार? वशिष्ठांकडून मान्यता मिळेपर्यंत लोकही विश्वामित्रांना ब्रह्मर्षी मानायला तयार नव्हते. त्यामुळे तेढ वाढतच गेली. गोष्ट इतक्या गंभीर थराला गेली की एक दिवस विश्वामित्र तलवार घेऊन ब्रह्मर्षींच्या आश्रमात पोहोचले. आज काय तो सोक्षमोक्ष लावायचाच असा त्यांनी पक्का निर्धार केला होता. आज वशिष्ठांनी आपल्याला जर ब्रह्मर्षी म्हटलं नाही तर, त्यांची मान धडावेगळी करायचा निर्णयच त्यांनी घेतला होता.

वशिष्ठ विश्वामित्रांना ब्रह्मर्षी म्हणायला तयार नव्हते कारण त्यांना वाटे की, विश्वामित्राच्या मनात आपल्या तपस्येबद्दल गर्वाची भावना आहे. विश्वामित्र जेव्हा वशिष्ठांच्या आश्रमात पोहोचले तेव्हा वशिष्ठ मुनी आणि त्यांच्या  शिष्यांमध्ये चर्चा चाललेली होती.  विश्वामित्र जवळच्या झाडीत लपून बसले आणि संधीची वाट पाहू लागले. संधी मिळाली की वार करायचा असं त्यांनी ठरवलं होतं.

तेवढ्यात एका शिष्यानं  वशिष्ठांना  प्रश्न विचारला, 'विश्वामित्रांनी एवढी कठोर तपस्या केली तरी आपण त्यांना ब्रह्मर्षी का म्हणत नाही?'

त्यावर वशिष्ठ म्हणाले, 'विश्वामित्र श्रेष्ठ तपस्वी आहेत यात शंकाच नाही. ते ब्रह्मर्षी होतील अशी मला आशा वाटतेही. पण म्हणून मी त्यांना आधीपासून ब्रह्मर्षी म्हणणार नाही. ते जेव्हा त्या पदाला पोहोचतील तेव्हाच मी त्यांना ब्रह्मर्षी म्हणेन. अजूनही त्यांच्यात क्षत्रियाची घमेंड शिल्लक आहे. तलवार अजून त्यांच्या हातून सुटली नाहीय. ज्या दिवशी त्यांच्या हातून तलवार सुटेल त्या दिवशी मी त्यांना ब्रह्मर्षी म्हणेन. मी काही त्यांचा दुस्वास करत नाही.'

गुरुशिष्यातील हा संवाद झाडीमागे लपलेल्या विश्वामित्रांनी ऐकला. वशिष्ठ आपल्याबद्दल इतक्या प्रेमानं बोलत असतील यावर त्यांचा विश्वासच बसेना.  त्यांच्या हातून तलवार गळून पडली. धावत जाऊन त्यांनी वशिष्ठांचे पाय पकडले. वशिष्ठांनी त्यांना उठवलं, म्हणाले, 'ब्रह्मर्षी, उठा!'

वशिष्ठांच्या तोंडून आपल्यासाठी ब्रह्मर्षी शब्द ऐकून विश्वामित्रांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. ते वशिष्ठांना म्हणाले, 'ब्रह्मर्षी म्हणवून घेण्यासाठी मी लायक नाही. आज मी काय करायला आलो होतो हे तुम्हाला माहीत नाही.'

वशिष्ठ म्हणाले, 'तुम्ही काय करण्यासाठी आला होतात ते महत्वाचं नाही, तुम्ही काय केलंत हे महत्वाचं. अहंकार सोडून तुम्ही विनम्र झालात. अहंकाराचा पूर्णपणे त्याग करणं म्हणजे ब्राह्मण होणं. म्हणूनच आज मी तुम्हाला ब्रह्मर्षी म्हटलं.'

# इप्सितसाध्यासाठी नेमकेपणा हवाच

ईसाप एकदा असाच जाणाऱ्या-येणाऱ्यांकडे पाहात रस्त्याच्या कडेला बसला होता. एक माणूस त्याच्याजवळ आला आणि त्यानं ईसापला विचारलं, 'काहो, गावातलं मंदिर इथून कितीसं दूर आहे? मला जायचंय मंदिरात, पोचायला साधारण किती वेळ लागेल?'

ईसापनं एकदा त्या माणसावर नजर टाकली आणि कपडे झटकत तो उठून उभा राहिला. यात्रेकरू संकोचला. त्याला वाटलं, उगाच आपण याला त्रास दिला. शिवाय, याची उत्तर देण्याची इच्छा आहे की नाही कुणास ठाऊक. काही बोलतच नाहीय हा. तो चालू लागला. ईसापही त्याच्यासोबत चालू लागला.

गोंधळलेला यात्रेकरू त्याला म्हणाला, 'अहो, मला सोबतीची गरज नाहीय. कशाला उगाच तसदी घेता. नुसतं सांगितलंत तरी चालेल.'

ईसापने त्याचं बोलणं ऐकून न ऐकल्यासारखं केलं आणि तो त्या यात्रेकरूसोबत चालत राहिला. पंधरा-एक मिनिटं चालल्यानंतर ईसापनं यात्रेकरूला थांबवलं. म्हणाला, 'तुम्हाला मंदिरापर्तयंत पोहोचायला साधारण पंधरा मिनिटं लागतील.'

यात्रेकरूला वाटलं, विक्षिप्तच आहे वल्ली. तो म्हणाला, 'आपण हे मला तिथे बसल्या बसल्यासुद्धा सांगू शकला असतात. उगाच मैलभर पायपीट घडली आपल्याला.'

ईसाप त्याला म्हणाला, 'बाबा रे, तुझ्या चालण्याचा वेग मला जोवर ठाऊक नव्हता तोवर इप्सित स्थळी तू किती वेळात पोहोचणार हे मी कसा सांगणार?'

ध्येय कधी गाठणार हे तुम्ही त्याच्या दिशेनं किती वेगात निघाला आहात यावरच अवलंबून असतं.

# जीवनसंगीत

राजकुमार श्रोणनं भगवान बुद्धांकडून दीक्षा घेतली आणि तो संन्यासी झाला. संन्यासी होण्याआधी त्यानं जीवनात कैक सुखं उपभोगली होती. भोगातच त्याचं जीवन गुरफटलेलं होतं. संन्यासी झाल्यानंतर मात्र त्यानं त्यागाची अति गाठली. इतर भिक्षु राजरस्त्यावरून चालले की कधीकाळी गालिच्यांवर चालणारा हा राजकुमार काट्यांनी भरलेल्या पायवाटेवरून चालू लागायचा. विश्रांतीसाठी इतर भिक्षु वृक्षांच्या सावलीत बसले की हा उन्हात उभा रहायचा.दिवसातून एकदा इतर जेवत असतपण भिक्षु बनल्यानंतर श्रोण कित्येक दिवसपर्यंत उपाशीच रहायचा. सहा महिन्यांत तो अगदी सुकून गेला. अशा कठिण दिनचर्येमुळं त्याचा देहही काळवंडला.

एके दिवशी भगवान बुद्ध त्याला म्हणाले, 'श्रोण! मी असं ऐकलंय की राजकुमार असताना तू वीणा वाजवायचास, अतिशय कुशल वीणावादक आहेस तू. खरंय का हे?'

श्रोणनं उत्तर दिलं,'होय. लोक मला म्हणायचे की तू सुरेख वीणा वाजवतोस.'

बुद्ध श्रोणला म्हणाले, 'मग मला एक सांग, वीणेच्या तारा ढिल्या पडल्या तर त्यांच्यातून झंकार उमटेल का?'

श्रोण हसला, म्हणाला - 'नाही गुरुदेव. वीणेच्या तारा ढिल्या पडल्या तर त्यांच्यातून झंकार निघणारच नाही.'

बुद्ध म्हणाले, 'आणि जर जास्त ताण असेल तर?'

श्रोण म्हणाला, 'जास्त ताणलेल्या तारांमधूनही संगीत उमटत नाही. कारण अती ताणलेल्या तारा स्पर्श होताच तुटतात.' पुढे तो म्हणाला, 'संगीत निर्माण होण्यासाठी तारा ताणलेल्या किंवा ढिल्या असलेल्या चालत नाही....'

त्याला मध्येच थांबवून भगवान बुद्ध म्हणाले, 'वीणेचा नियम जीवनवीणेवरही लागू आहे, श्रोण. जीवनवीणेच्या तारा ताणलेल्या किंवा ढिल्या असतील तर संगीत निर्माण होत नाही. जीवनाचं संगीत अतीवर नव्हे, मध्यावरच - समेवरच साधता येतं.' ऐकलं आणि श्रोणला आपली चूक उमगली.

# मनोगत



तर, सांगायची गोष्ट ही की गोष्टी ऐकायला सगळयांनाच आवडतं. मलासुद्धा अगदी लहान असल्यापासून गोष्टी वाचण्याचा, ऐकण्याचा, पाहाण्याचा छंद आहे. ज्यांच्या मनात उत्सुकता जागृत असते त्या सगळयांना गोष्टी आवडतातच. गोष्टी आवडतात म्हणून मग भाषेची आवड मनात निर्माण झाली आणि इंजीनियर किंवा डॉक्टर होण्याच्या स्वप्नांऐवजी मी शिक्षिका होण्याची स्वप्नं पाहिली. त्यावेळी हे स्वप्न पाहाण्यामागील तर्कामागचं मी मांडलेलं गणित अगदी सरळ होतं – शिक्षकांना खूप वेळ मिळतो, त्या मोकळया वेळात खूप वाचता येईल. शिवाय वाचलेलं शेयर करायला आयते श्रोतेही मिळतील! आपलं सुरवातीपासूनच सगळं हे असं रोखठोक बरं का!!

अर्थात, आपण योजलेलं सगळंच घडून नाही येत. मी शिक्षिकाच झाले, पण कॉलेजमध्ये. सायंस कॉलेजमध्ये भाषेच्या शिक्षकांची गत काय असते हे जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे. तरीही, केवळ गोष्टींच्या बळावर माझ्या वर्गांमध्ये खच्चून गर्दी असायची. कारण, “या मॅडम हातात पुस्तक न घेता अगदी गोष्ट सांगितल्यासारखं शिकवतात,“ असं मुलांचं मत होतं. आर्टसच्या विद्यार्थ्यांना महाकाव्य किंवा खंडकाव्य किंवा एखादा बोजड निबंध शिकवताना मध्येच एखादा संदर्भ त्यांना नीट कळावा म्हणून जर मी म्हटलं की- एका गोष्टीवरून तुम्हाला ही गोष्ट सहज समजेल, की संपूर्ण क्लासमध्ये उत्साहाची लाट हळूच सरकायची, मुलं सरसावून बसायची. इतकंच नव्हे तर गोष्ट सांगताना कधी माझी भुवई उडते, कधी माझे डोळे बारीक होतात, कधी माझ्या ओठांवर हसू येतं हे मला अगदी आरशात पाहिल्यासारखं समोर बसलेल्या विद्यार्थ्यांच्या चेह्ऱ्यावर दिसायचं. हा अनुभव अंगावर आनंदाचा काटा फुलवत रहायचा. मध्येच एखादं कुणी ‘पण असं कसं?’ किंवा तत्सम काही विचारू लागलं की इतर सगळे त्यांना गप्प करत. गोष्ट ऐकण्याच्या प्रवाहात कुणालाही खंड पडलेला चालत नसे. पुढे चिन्मयला, म्हणजे माझ्या मुलाला तो पाचेक वर्षांचा असताना हत्तींच्या जीवनावरची मी अनुवाद करत असलेली एक कादंबरी वाचून दाखवली होती. नायक हत्तीच्या मृत्यूचा प्रसंग वाचला तेव्हा त्यानं मला थांबवून म्हटलं होतं, “नहीं नहीं, वह मरा नहीं होगा मम्मी, फिर से पढ़ो तो ठीक से…” गोष्टीत पाच वर्षांची असो वा पंचावन्न वर्षांची असो, व्यक्ती अशी अगदी समरसून जाते.

मला लहानपणी आजी गोष्टी सांगायची. आजी नसायची तेव्हा आई-अण्णा गोष्टी सांगायचे. अण्णा तर आजही गोष्टी सांगतात. वाचता येऊ लागलं तेव्हापासून आजपर्यंत गोष्टीची पुस्तकं वाचणं, गोष्टी ऐकणं हा माझा अतिशय जिव्हाळयाचा छंद आहे. पण गोष्टी लिहिण्यासाठी प्रेरित केलं ते माझ्या जोडीदारानं- सतीशनं. चिन्मयच्या रूपात मी स्वतः लिहिलेल्या-कल्पिलेल्या गोष्टींना एक कायमस्वरूपी हक्काचा, संवेदनशील आणि प्रिय श्रोता मिळाला.

खरंच, भाजी-भाकरीनं पोट भरतं, शरीराच्या इतरही भुका वेगवेगळया पद्धतीनं भागतात, पण एक तरल संवेदना मनात जागी करणारी आणि माणसाला माणूस बनण्यासाठी प्रेरित करण्याची शक्ती असते गोष्टींत. गोष्ट आपल्याला इतरांच्या भावनांशी समरस होणं शिकवते.

लहान-मोठ्या, तलम-भरड पोताच्या, सुखांत-दुःखांत, गंमतीदार, रहस्यमयी, शोधकथा, विज्ञानकथा, लोककथा अशा बऱ्याच, वेगवेगळया प्रकारच्या गोष्टी आपण याआधीही वाचल्या असणारच. आपल्यासारख्या सुज्ञ वाचकांच्या हाती या प्रमाणबद्ध, छोट्या गोष्टी मी अतिशय संकोचानं सोपवत आहे. कशा वाटल्या ते जरूर कळवा.

याशिवायही बरंच काही उरतं स्वतःबद्दल सांगण्याचं, पण ते सध्या इथे संदर्भहीन आहे. एकाच भेटीत माणूस उमगतो थोडाच? आणखी जाणून घ्यायचं असेल माझ्याबद्दल तर गोष्टींच्या पुढल्या संचाची वाट पाहा. भेटूच पुन्हा.

-संध्या पेडणेकर (sandhyaship@gmail.com)

9-9-2014

(Sandhya Pednekar is a professinal Author/Translator/Editor with dozens of titles to her credit. Esahity pratishthan is thankful to her for offering this book free for readers. Her books published so far are given below… )

(शीघ्र प्रकाश्य -संत तुकाराम का जीवन दर्शन (For Prabhat Prakashan, Delhi) * TRANSLATIONS - WORKING ON -Translation of Dr Babasaheb Ambedkar Speeches and Writings Vol 18 Part 2. COMPLETED - Dr Babasaheb Ambedkar Speeches and Writings Vol 18 Part 1 and Part 3. MARATHI Titles- (For Penguin India and Yatra Books) - शंकर (Namita Gokhale) अयोध्या 1992 (P V Narasinha Rao); सॅक्रेड गेम्स (Vikram Chandra); स्वर्ग आणि इतर कथा (Khushwant Singh); वधिकाच्या आठवणी (Shashi Warrior); देवा तूचि गणेशा (Royina grewal); चतुर चतुर नाना (Manhar Chauhan). For 'Loksatta'- हत्ती हरला! हत्ती जिंकला!!, जादूचा खड्डू, मुंग्यांच्या देशात (Manhar Chauhan). Also - डंख, वध, यशाची गुरुकिल्ली (Manhar Chauhan); Apoorv Diwali visheshank - (for Two consecutive issues) डिंपल, रेखा (A S Mehta); For National Book Trust - सामाजिक बदलासाठी शिक्षण –एम व्ही फाउंडेशन (Sucheta Mahajan); कमलादेवी चट्टोपाध्याय (Jasleen Dhamija); नारायण गुरु (Murkot Kannappa) HINDI Titles- मिट्टी, पंख और आकाश (Dnyaneshwar Mulay), बहुत बहुत दूर(P R Madhav Panikkar); कोंटिकी(K Radhakrishnan), विज्ञान और उन्मुक्तता (D D Kosambi);भीमसेन (Vasant Potdar); ये धुआं कहां से उठता है (Parvez Ahmed) Shyam Ki Ma (Sane Guruji))

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान